

अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत


ऑक्टोबर २०१० | किंमत १५ रुपये









# उत्सव पुस्तकांचा

साहित्याची रत्ने । साहित्याचा मेवा ।।
ठेवा पुस्तकांचा । रसिकांनी लुटावा ।।

## रसिक वाचकांना सस्नेह आमंत्रण !

दि. ९ ते १५ ऑक्टोबर, सकाळी ९.३० ते रात्री ८ पर्यंत

**या विकत घ्या ! संग्रही ठेवा ! भेट द्या !**

**४०%** सूट रोज पहिल्या ५० ग्राहकांना*

**३५%** सूट सभासदांना*

**२०%** सूट सभासदेतरांना*

**५%** सूट सभासद नोंदणीवर *

*अटी लागू

(तेव्हा आमचे सभासद व्हायची संधीही दवडू नका.)




## मेहता पब्लिशिंग हाऊस

१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोन भवन समोर, पुणे-३०

*(स्वामी, श्रीमानयोगी, संभाजी, रूचिरा, ययाति व वितरणाची पुस्तके सोडून)

बाहेरगावच्या वाचकांसाठी आम्ही या योजनेची मुदत २५ नोव्हेंबर पर्यंत वाढवत आहोत. पण दि. १६ ते २५ नोव्हेंबर दरम्यान खरेदी करण्यासाठी सोबत हे कात्रण असणे गरजेचे आहे. किंवा डी डी पाठवल्यास त्यासोबत हे कात्रण गरजेचे आहे.

◆ ऑक्टोबर २०१०
◆ वर्ष दहावे
◆ अंक दहावा

# मेहता मराठी ग्रंथजगत

## — अनुक्रमणिका —


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | २० |
| **पुस्तक परिचय** | |
| **अरुणाची गोष्ट :** अनु. मीना कर्णिक | ५२ |
| **मीरा एक वसंत आहे** | |
| : अनु. स्वाती चांदोरकर | ५८ |
| **द फर्म :** अनु. अनिल काळे | ६६ |
| **द मिथ कॉल्ड वेल्थ** | |
| : राजेश वत्तमवार | ७० |
| **पुरस्कार** | ८२ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ९१ |
| **श्रद्धांजली** | ९३ |
| **बालनगरी** | ९९ |


संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
वंदना घाटगे

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
**Email -** info@mehtapublishinghouse.com
**Website - www.mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु. ३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

## भारतीय नियतकालिकांची संघटना

दिवाळी जवळ येत आहे आणि महाराष्ट्रात दिवाळी अंकांचीही तयारी जोरात सुरू आहे. मराठीत मासिक-नियतकालिकांची शतकाहून जास्त काळापासूनची परंपरा आहे. दिवा ही संस्था दिवाळी अंकांच्या संपादक-प्रकाशकांसाठी काम करते.

भारतात हजारो नियतकालिके प्रकाशित होतात. ती विविध विषय हाताळतात. हजार-दोन हजार प्रतींपासून लक्ष-दशलक्ष प्रतींपर्यंत खपतात. कोट्यवधी रुपयांच्या जाहिराती त्यांना मिळतात. विक्रीपेक्षाही जाहिरातींवर त्यांचा डोलारा उभा असतो. या नियतकालिकांच्या संपादक- मालकांची 'असोसिएशन ऑफ इंडियन मॅगेझिन्स' (AIM) ही एक मध्यवर्ती संघटना आहे. या संस्थेतर्फे मुंबई नगरीत ६-७ सप्टेंबर रोजी 'इंडियन मॅगेझिन काँग्रेस २०१०' या नावाने एक परिषद घेण्यात आली. या परिषदेला 'इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ दि पिरिऑडिकल प्रेस' या आंतरराष्ट्रीय संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी क्रिस लेवेलिन हे उपस्थित होते. मल्याळम मनोरमा या वृत्तपत्रसमूहाच्या 'दि वीक' या साप्ताहिकाने मुंबईतील या परिषदेचे प्रायोजकत्व स्वीकारले होते. विविध नियतकालिकांच्या संपादकांच्या आणि संचालकांच्या उपस्थितीने या परिषदेला एक भारदस्त रूप प्राप्त झाले होते. दोन दिवसातील अनेकविध सत्रांमध्ये नियतकालिकांसमोरील समस्या आणि आव्हाने यासंबंधी नामवंत व्यक्तींनी आपले विचार मांडले आणि सद्य:कालीन मंदीच्या वातावरणातून बाहेर पडण्यासाठी काय उपाययोजना करता येईल याविषयी आपापल्या परीने विधायक सूचना केल्या. एकूणच परिषदेतील वातावरण इतके उत्साहदायक आणि आशावादी होते की पुढच्या वर्षी होणारी 'वर्ल्ड मॅगेझिन काँग्रेस' भारतात घेण्याचा निर्णय क्रिस लेवेलिन यांनी जाहीर केला. जगातील प्रमुख नियतकालिकांच्या प्रतिनिधींचे त्यानिमित्ताने भारतात आगमन होईल आणि भारताच्या सर्वांगीण प्रगतीचे तसेच वैविध्यपूर्ण निसर्ग वैभवाचे दर्शन त्यांना घडेल; त्यामुळे परदेशातील नियतकालिकांतून भारताविषयी अधिक फीचर्स येऊ लागतील, भारताच्या पर्यटन उद्योगाला त्यामुळे चालना मिळेल. भारतात भयाण दारिद्र्य आहे, सगळीकडे झोपडपट्ट्या आणि अस्वच्छता आहे, रस्त्यावर साप आणि श्वापदे हिंडताना दिसतात यासारख्या भाकडकथा अजूनही

अमेरिकेसारख्या देशात प्रचलित आहेत. त्यातील फोलपणा या परिषदेच्या निमित्ताने भारतात आलेल्या नियतकालिकांच्या संपादकांना आणि प्रतिनिधींना जाणवेल आणि त्याचे पडसाद त्यांच्या प्रकाशनात उमटतील अशी आशा बाळगायला हरकत नाही. अर्थात हे पुढच्या वर्षी होणाऱ्या 'वर्ल्ड मॅगेझिन काँग्रेस'च्या माध्यमातून होणे शक्य आहे. मुंबईतील परिषदेत झालेले विचारमंथनही तसेच महत्त्वपूर्ण आणि बळ वाढवणारे ठरेल असे मानायला हरकत नाही. ग्रंथप्रकाशन, नियतकालिकांचे प्रकाशन, विविध माध्यमे, इंटरनेट, सोशल वेबसाईट्स, कला, क्रीडा, पर्यटन या सर्व गोष्टी आता परस्परांशी निगडित झाल्या आहेत आणि त्यांनी एकमेकांचा आधार घेत एकमेकांना बलवान करायला हवे हा विचार आता रुजत आहे.

मुंबईच्या या परिषदेत 'मल्याळम मनोरमा' दैनिकाचे ज्येष्ठ सहसंपादक रियाद मॅथ्यू यांनी स्वागतपर भाषणात म्हटले की, नियतकालिकांच्या व्यवसायाला गेल्या दोन वर्षांतील आर्थिक मंदीचा मोठा फटका बसला असून अनेक साप्ताहिकांचे आणि मासिकांचे खप घसरले, जाहिरातींचे उत्पन्न कमी झाले, त्यामुळे कर्मचाऱ्यांना काढावे लागले. या वास्तवाचे वर्णन करून झाल्यावर मात्र ते अभिमानाने म्हणाले, ''आमच्या वृत्तपत्रसमूहातर्फे निघणाऱ्या 'दि वीक'या साप्ताहिकाने या काळातही तग धरला एवढेच नव्हे तर खप आणि जाहिरात या दोन्ही आघाड्यांवर लक्षणीय प्रगती केली. आमचा आमच्या प्रॉडक्टवर विश्वास आहे. तसाच तो आमचे वाचक आणि जाहिरातदार आणि सहकारी यांचाही आहे. त्या बळावरच गेल्या वर्षी आम्हाला नऊ आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. बदलत्या वातावरणानुसार आणि तंत्रज्ञानानुसार बदलायची लवचिकता आणि प्रयोगशीलता आमच्यात आहे आणि वृत्तसंकलन व मांडणी याबाबतही आम्ही जागरूक असतो. वितरणाच्या व प्रसिद्धीच्या वेगवेगळ्या कल्पना आम्ही राबवत असतो.''

त्यांच्या या आशावादी दृष्टिकोनाचाच पुनरुच्चार करीत क्रिस लेवेलिन म्हणाले, ''गेल्या १८ महिन्यात अत्यंत वाईट अशा आर्थिक मंदीला तोंड देण्याची पाळी आमच्यावर आली. परंतु आमची खात्री होती की ही मंदी फार काळ टिकणार नाही. पुढे उज्ज्वल भविष्य निश्चित असणार आहे. आमच्या तज्ज्ञांनी उत्पन्नाचे पर्यायी मार्ग शोधण्यावर भर दिला. इव्हेंट मॅनेजमेंट, डिजिटल मिडीया यांचा उपयोग करून घ्यावा मात्र आपल्या नियतकालिकांच्या मजकुराच्या दर्जेदारपणात किंचितही उणेपणा येऊ देऊ नये याविषयी आम्ही आग्रही राहिलो.''

माहिती आणि नभोवणी खात्याचे सचिव रघू मेनन यांनी मुद्रण तसेच अभिव्यक्ती स्वातंत्र्य टिकवून धरण्यासाठी मासिकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजवावी असे सांगून माध्यमांच्या विकासासाठी सरकार विविध उपाययोजना करीत राहील अशी ग्वाही दिली.

मंदीच्या काळात आपले अस्तित्व टिकवण्याचे मार्ग, माहितीच्या जागतिक भडिमाराच्या काळात संपादकापुढे उभी राहणारी आव्हाने, सोशल नेटवर्किंगच्या

प्रभावाचा वापर करून घेण्याची गरज, नवा वाचकवर्ग मिळवण्यासाठी चोखाळावे असे मार्ग वगैरे विषयांवर या परिषदेत चर्चा झाल्या. मासिकांच्या वितरणासाठी नेहमीच्या मार्गाबरोबर पेट्रोलपंप, सुपर मार्केट, व्हेंडिंग मशीन्स वगैरेंचा वापर केला तर नवा वाचकवर्ग मिळवण्यास चालना मिळेल असे सुचवण्यात आले.

अमेरिकेत व युरोपमध्ये हजारो नियतकालिके निघतात. त्यांनी आपला असा खास वाचकवर्ग निर्माण केला आहे. तो वर्षानुवर्षे सांभाळून ठेवला आहे. परंतु त्याबरोबर नवे वाचक मिळवण्यासाठी सतत नावीन्यपूर्ण मोहिमा राबवलेल्या आहेत. रोज २ डॉलर किंमत असलेला वॉल स्ट्रीट जर्नलसारखा पेपर आठवड्याला दीड-दोन डॉलरमध्ये घरपोच दिला जातो. फोटोग्राफीचे मासिक दरमहा ५.९५ डॉलर्स किंमतीचे पण त्याचे वर्षाचे १२ अंक फक्त ५ डॉलर्सना सवलतीत देण्यात येतात... त्यामुळे नवे ग्राहक त्याकडे आकृष्ट होतात.

मासिकांबाबतचे हे प्रयोग ग्रंथव्यवहारालाही पोषक ठरू शकतील याकडे लक्ष वेधावेसे वाटते. ग्रंथप्रकाशनाबरोबर मासिकेही काढण्याकडे आता अनेक प्रकाशन संस्थांचा कल आहे. माहिती-ज्ञानक्षेत्राची क्षितिजे विस्तारत आहेत. आपण त्यात मागे पडता कामा नये.




**कोल्हापूर येथील सर्व वाचक, सभासदांनी वर्गणी भरण्यासाठी व पुस्तके मागविण्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा**

**मेहता बुक सेलर्स**

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी
मंडपाजवळ, कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९ ते रात्री ८
(शनिवारी बंद)
फोन : (०२३१)२५४२९०१.
टेलिफॅक्स : (०२३१)२५४१८८१.
Email : mehtabooks@eth.net

# दखल



## वि. स. खांडेकरांच्या साहित्याचे हक्क

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने कॉपीराइट कायद्याबाबत एक ऐतिहासिक निवाडा नुकताच दिला आहे. तो लेखकाच्या स्वामीत्वाची बूज राखणारा आहे. मराठीतील एक अग्रगण्य कादंबरीकार वि. स. खांडेकर यांच्या साहित्याचे हक्क खांडेकरांच्या वारसांकडे आहेत की त्यांच्या प्रकाशकांकडे या बद्दलच्या वादाचा निकाल सुप्रीम कोर्टाने वारसांच्या बाजूने देऊन कॉपीराइट कायद्याच्या अंमलबजावणाबाबतची कायदेशीर भूमिका स्पष्ट केली आहे.

एखाद्या लेखकाने लिहिलेल्या पुस्तकांवर त्याची मालकी असते; आणि त्याने काही मानधन घेऊन प्रकाशकाला त्या पुस्तकाच्या एक वा अनेक आवृत्त्यांचे हक्क करारान्वये दिलेले असतात. त्याच्या मृत्यूनंतर त्या पुस्तकांचे हक्क त्याच्या वारसाकडे येतात. लेखकाने प्रकाशकाशी आपल्या हयातीत केलेल्या करारानुसार लेखकाच्या मृत्यूनंतर करारात ठरलेले मानधन लेखकाच्या वारसांना देऊनच वारसांशी नव्याने करार करून प्रकाशकाला पुस्तके काढता येतात. लेखकाशी झालेल्या मूळ करारातील अटींची पूर्तता प्रकाशकाने केली नाही तर त्याच्या वारसांना त्या प्रकाशकाला पुस्तके काढण्यास मज्जाव करून ती पुस्तके इतर प्रकाशकाला प्रकाशनासाठी देण्याचा हक्क वा अधिकार लेखकाच्या वारसांचा असतो असे सुप्रीम कोर्टाने नि:संदिग्धपणे प्रकट केले आहे. कॉपीराइट कायद्याच्या दृष्टीने हा निर्णय लँडमार्क ठरणारा आहे.

खांडेकरांची बहुतेक पुस्तके त्यांच्या हयातीत पुण्याच्या देशमुख आणि कंपनीने काढलेली होती.

देशमुख आणि कंपनीचे रा. ज. देशमुख यांनी खांडेकरांची ७२ पुस्तके प्रकाशित - पुनर्प्रकाशित करण्याचा करार केला होता, परंतु फक्त १२च पुस्तके प्रकाशित केली. ययाती, अमृतवेल वगैरे बेस्टसेलर पुस्तकांचा त्यात समावेश होता. इतर ६०पुस्तके त्यांनी काढलीच नाहीत. करारानुसार खांडेकरांच्या निधनानंतर त्यांच्या वारसांना मानधनही दिले नाही. रा.ज. देशमुखांच्या निधनानंतर काही काळ देशमुख आणि कंपनीचे सर्वच व्यवहार ठप्प होते. त्यामुळे आपले आर्थिक नुकसान होत आहे असे वारसांना वाटणे स्वाभाविक होते. तशात देशमुखांनी 'एका पानाची कहाणी' या खांडेकरांच्या आत्मवृत्तात काही स्वत:चा मजकूर टाकल्याने खांडेकरांची व वारसांची बदनामी होत आहे अशी मंदाकिनी खांडेकरांची भावना झाली. कोल्हापूर न्यायालयात त्यांनी खटला भरला. आक्षेपार्ह मजकूर वगळूनच त्या पुस्तकाचे प्रकाशन करावे असा निर्णय न्यायालयाने दिला. अपीलात खांडेकरांच्या करारापैकी जी ६०पुस्तके देशमुखांनी काढली नव्हती त्यांचे हक्क वारसांना मिळाले. पण १२पुस्तकांचे प्रकाशन देशमुख आणि कंपनीकडेच राहिले. त्यावरील रॉयल्टी देशमुखांच्या निधनानंतर त्यांच्या प्रकाशनाचा कारभार पाहणाऱ्या सुलोचनाबाईंनी देण्याचे टाळले. त्यामुळे वारसांनी ययाती, अमृतवेलचे प्रकाशन करण्याची एका अन्य प्रकाशकाला परवानगी दिली. त्यावर देशमुखांनी आक्षेप घेऊन त्या प्रकाशकावर खटला दाखल केला... त्या १२ पुस्तकांचे हक्क कायमचे आपल्याकडे आहेत असा युक्तिवाद देशमुख आणि कंपनीने केला... सुलोचनाबाईंचे १९९७ मध्ये निधन झाले. हायकोर्टाने हा युक्तिवाद अमान्य केला. हक्क खांडेकरांच्या वारसांकडेच आहेत असा निर्णय दिला. देशमुख आणि कंपनीने सुप्रीम कोर्टात अपील केले. आपल्याकडे पुस्तकांचे हक्क असल्याचा पुरावा देशमुख आणि कंपनीला सादर करता आला नाही. रा. ज. देशमुखांचे तथाकथित मृत्युपत्र कोर्टात सादर न केल्याने न्यायमूर्तींनी 'ज्या आधारावर देशमुख आणि कंपनी या पुस्तकाचे हक्क आपल्याकडे असल्याचा दावा करीत आहे, तोच अस्तित्वात नसल्याने प्रकाशकाचे हक्क शाबूत धरता येत नाहीत' असे कारण देऊन न्यायालयाने खांडेकरांच्या वारसांकडेच खांडेकरांच्या साहित्याचे सर्व हक्क असल्याचा निर्णय दिला.

यापुढे देशमुख आणि कंपनीला खांडेकरांची पुस्तके काढता येणार नाहीत.

एखाद्या लेखकाच्या पुस्तकाचे सर्व हक्क आपल्याकडे आहेत असे प्रकाशक म्हणतो तेव्हा योग्य ते करारपत्र त्याने करून घेतलेले हवे. ते पुरावा म्हणून सादर करता यायला हवे. तसे नसेल तर लेखकाकडे आणि त्यानंतर त्याच्या वारसाकडेच ते हक्क असतात हे गृहीत धरायला हवे.

कॉपीराइट कायद्याच्या दृष्टीने हा निर्णय सर्वच लेखक-कवींना दिलासा देणारा आहे आणि लेखक-प्रकाशक संबंधात पारदर्शकता राहण्यासाठी तो उपयुक्त व पथप्रदर्शक ठरेल.


या प्रकरणात खांडेकरांच्या वारसांना सुमारे तीस वर्षे वेगवेगळ्या न्यायालयांत दाद मागावी लागली; त्यासाठी बराच मनस्ताप भोगावा लागला.

अनिल मेहता हे खांडेकरांच्या वारसांच्या बाजूने भक्कमपणे उभे राहिले. सुप्रीम कोर्टात निवृत्त न्या. सुरेश नाईक आणि ॲड. कल्याणी पाठक यांनी खांडेकरांच्या वारसांच्या वतीने बिनतोड युक्तिवाद केला. कॉपीराइट कायद्यातील एखाद्या तात्त्विक मुद्द्याबाबतची सुप्रीम कोर्टापर्यंत गेलेली ही पहिलीच केस असावी.

**शंकर सारडा**

ई १०, पाटील रिजन्सी,
पुणे ४११ ००४.
मो.९८२३२६१०२३





## सभासदांना सूचना

भारतीय टपाल खात्याच्या नवीन अधिनियमानुसार मासिकाचे वितरण करताना पिनकोड सहित संपूर्ण पत्ता टाकणे अनिवार्य झाले आहे. आपला अंक वितरित होण्यासाठी कृपया पिनकोडसह आपला संपूर्ण पत्ता लिहून पोस्टकार्डद्वारे मासिकाच्या पत्त्यावर पाठवावा. ही विनंती.

## टी बुक क्लब १९ मधील पहिले पुस्तक




# पिरॅमिड

**टॉम मार्टिन** अनु. उदय भिडे

सांकेतिक संदेशामुळे रहस्यानं कळस गाठला, तरी त्याची उकल तर 'पिरॅमिड'च पोटातूनच होईल ना! चला तर मग, कॅथरीन आणि जेम्स बरोबर ...रहस्यभेद करायला!

**३००रु.**
टी बुक क्लब सभासदांना **१५०रु.**
**पोस्टेज ३०रु.**

# T बुक क्लब १९

नोंदणी सुरू

**सभासद फी ५०रु. आजच सभासद व्हा!**


जगप्रसिद्ध इंग्रजी कादंबऱ्यांचे सरस मराठी अनुवाद आणि तेही निम्म्या किमतीत! एका क्लबमध्ये ६ पुस्तके,
ही सहाही पुस्तके घेणे आवश्यक!

## टी बुक क्लब १९ मधून प्रकाशित होणारी पुस्तके

| **पुस्तकाचे नाव** | **मूळ लेखक** | **अनुवाद** | **किंमत** (अंदाजे) |
|---|---|---|---|
| द असोशिएट | जॉन ग्रिशॅम | अनु. अशोक पाथरकर | ३०० |
| द गिफ्ट ऑफ रेन | टॅन ट्वॅन इंग | अनु. अशोक पाथरकर | ४०० |
| नथिंग टू लूज | ली चाइल्ड | अनु. उदय कुलकर्णी | ३५० |
| डिजिटल फोर्ट्रेस | डॅन ब्राऊन | अनु. अशोक पाध्ये | ४८० |

वाचकांनी आपली सभासद फी (५०रु.) डी.डी. अथवा मनीऑर्डरने
'मेहता पब्लिशिंग हाऊस' येथे पाठवावी.

## टी बुक क्लब १९ मधील दुसरे पुस्तक




# सीविच

**ॲलिस्टर मॅक्लीन**
अनु. अशोक पाध्ये

**२४०रु.**
टी बुक क्लब सभासदांना **१२०रु.**
**पोस्टेज २५रु.**

समुद्र म्हटला की संघर्ष! जीवन-मरणाचा संघर्ष! असा संघर्ष करून त्यातून संपत्ती मिळवणाऱ्यांचा एक वर्ग तयार होतो. मग त्या वर्गात अंतर्गत संघर्षाचे अंगार फुलतात.

समुद्र म्हटला की साहस!

...एका तेलसम्राटाची समुद्रातील तेलविहीर म्हणजे त्याच्या साम्राज्याचे केंद्र. हा तेलसम्राट. संपत्तीच्या जोरावर काहीही करण्याची हिंमत असणारा.

त्याची दोन मर्मस्थळे होती. ती तेलविहीर आणि त्याच्या दोन लाडक्या कन्या.

शेवटी त्यांच्यावरच घाला पडला. केवळ सूडापोटी!

संघर्ष, साहस, संपत्ती व सूड यांनी रंगलेले ॲलिस्टर मॅक्लीनने लिहिलेले हे समुद्रावरचे नाट्य.

**आगामी**




# बर्न्ट शॅडोज

**कमिला शामसी**

अनु. रेश्मा स. कुलकर्णी

९ ऑगस्ट १९४५, नागासाकी.

हिरोको तानाका आपल्या घराच्या ओसरीवर उभी राहून समोरचं निसर्गसौंदर्य न्याहाळत असते.

पाठीवर तीन काळ्या बगळ्यांची नक्षी असलेला किमोनो ल्यायलेली हिरोको २१ वर्षांची आहे आणि लवकरच प्रियकर कोनरॅड वेईसशी लग्न करणार आहे.

क्षणार्धात सगळं विश्व शुभ्र पडद्याखाली झाकलं जातं.

बॉम्बहल्ल्यामध्ये हिरोको तिचं सर्वस्व गमावते– उरतात फक्त तिच्या पाठीवर त्या तीन काळ्या बगळ्यांच्या भाजक्या खुणा... जणू तिला तिच्या जुन्या आयुष्याचं स्मरण देत राहण्यासाठी...

आगामी

# माय कझिन रेशेल




## डॅफने द्यू मोरियेर

अनु. **स्नेहल जोशी**

माय कझिन रेशेल.

ही गोष्ट आहे स्वरूपसुंदर आणि आकर्षक अशा स्त्रीची आणि तिच्यावर प्रेम करणाऱ्या दोन इंग्लिश तरुणांची!


ॲम्ब्रोसची काऊंटेस रेशेल संगलेट्टीशी इटालीत भेट झाली, आणि तिथं त्याने तिच्याशी लग्न केले. मात्र त्यानंतर तो कधीच घरी परतला नाही, परंतु त्याच्या चुलत भावाला आलेल्या पत्रांमध्ये त्याच्यावर विषप्रयोग होत असल्याचा संशय व्यक्त केला होता. शेवटच्या पत्रात त्याने फिलीपला ताबडतोब येण्याविषयी लिहिले होते.

जेव्हा फिलीप फ्लॉरेन्समध्ये पोहोचला तेव्हा ॲम्ब्रोस जिवंत नव्हता आणि रेशेल इंग्लंडला निघून गेलेली होती.

फिलीप तिला पाहाताच तिच्या आकर्षकतेला बळी पडतो. तिच्या प्रेमात आकंठ बुडालेल्या फिलीपलाही कसलातरी संशय येऊ लागतो, कारण ॲम्ब्रोसने जी लक्षणे आपल्या पत्रात वर्णन केलेली असतात तशाच तऱ्हेची लक्षणे त्यालाही त्रास देऊ लागतात. आपल्यावरही विषप्रयोग होत आहे असे त्याला वाटू लागते.

रेशेल त्याच्यावर आसक्त होती की ती त्याचा खून करण्याच्या प्रयत्नात होती? रेशेल देवदूत होती की सैतान?

**नवे कोरे**




# 'लेट्स किल गांधी!'

**तुषार अ. गांधी**
अनु. **अजित ठाकूर**

**६९५रु. पोस्टेज ६०रु.**


अशी व्यक्ती कधीच मरत नाही. ती जगते, ती उठते.
प्रत्येकाच्याच वाट्याला छोटीमोठी कामं येतात,
नशिबानंच त्याला ती दिलेली असतात; पण जो वैश्विक जिणं जगतो
आणि वैयक्तिक जीवनाचा त्याग करतो, तो मृत्यूनंतरही जिवंतच राहतो.
विचित्र जगाचं अवजड ओझं जो स्वत:च्या पाठीवर घेतो आणि वाहून नेतो.
जो दु:खंही आनंदानं भोगतो, तो कसा बरं मरेल?

मृत्यूचा त्याच्याशी काहीही संबंध नसतो, त्याची सत्ता त्याच्यावर चालत नाही
हे दिसल्यावर, तो मृत्यूनंतरच्या अनंत काळाला एका छोट्याशा
तासात बंदिस्त करतो आणि त्याला मृत्यू येतच नाही.

मग आता त्याच्यावरच नजरा रोखा आणि त्याचा 'मृत्युहीन' चेहेरा पाहा.
सर्व माणसांच्या डोळ्यांतून वाहणाऱ्या आणि स्मृतिगंधानं दरवळणाऱ्या
वसंतवाऱ्यांतून भूतकाळातील प्रत्येक गोष्ट
त्याच्या आयुष्याच्या तेजानं झळाळताना दिसते
मग तिथं... फक्त मृत्यूचाच मृत्यू होतो!

अल्जरनॉन सी. स्विनबर्न
('सुपर फ्ल्युमिना बॅबीलॉनीज'मधून)

नवे कोरे




# आवा मारू

टायटॅनिक ऑफ जपान

**रेई किमुरा**

**अनु.** चारुलता प्रभाकर पाटील

**२००रु. पोस्टेज २५रु.**

दुसऱ्या महायुद्धाचा वणवा पेटलेला... सिंगापूरमधली ब्रिटिशांची सत्ता उलथवून जपाननं तिथे आपले हातपाय पसरलेले... परंतु अल्पावधीतच जपानी साम्राज्याचा सूर्य ढळू लागला. सिंगापूरमधले सारे जपानी पराजयाच्या कल्पनेनं, त्यानंतर उसळणाऱ्या सूडाग्नीच्या दहशतीनं प्रचंड हादरले!

जीव वाचवण्यासाठी, जपानला पळण्यासाठी आटापिटा करू लागले.

जपाननं सिंगापूरमधल्या जपानी नागरिकांना परत आणण्यासाठी 'आवा मारू' नावाची बोट पाठवली. या बोटीला अमेरिकेकडून सुरक्षित प्रवासाची हमी मिळालेली होती. परंतु एकच बोट आणि जपानी असंख्य! बोटीत जागा मिळवण्यासाठी सारे जिवाच्या आकांतानं धडपडू लागले. अखेर, दोन हजार 'निवडक भाग्यवंतां'ना घेऊन बोट २८ मार्च १९४५ या दिवशी सिंगापूरहून निघाली.


परंतु १ एप्रिलच्या त्या भयाण रात्री काही वेगळंच घडलं!...

कुठे गेले हे सारे लोक?... तीन दशकांनंतर क्योको तानाका झपाटल्यासारखी या लोकांचा शोध घेऊ लागली.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळातली ही सत्य घटना काळजाचा ठाव घेते.

रेई किमुरांनी 'आवा मारू' या बोटीच्या घटनेभोवती कल्पित कथानकाचा एक दुपेडी गोफ विणला आहे. उत्कंठावर्धक रहस्यमयतेनं गतिमान होत जाणारं हे पुस्तक वाचकाला खिळवून ठेवतं!

**आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी तर्फे**
**उत्कृष्ट अनुवाद पुरस्कार २००७ प्राप्त**




# थैलीभर गोष्टी

**सुधा मूर्ती**

अनु. **लीना सोहोनी**

**१४०रु. पोस्टेज २५रु.**


राजेराजवाडे, महाराण्या, राजपुत्र, राजकन्या, कंजूष माणसं, जवळ फुटकी कवडीही नसलेली दरिद्री माणसं, शहाणी माणसं, विद्वान माणसं, चतुर माणसं, मूर्ख आणि अडाणी माणसं, चमत्कारिक स्त्रिया व पुरुष, चित्रविचित्र घटना या सुरस कथांमधून जिवंत होऊन आपल्या भेटीला येतात.
एका कथेतील बुद्धिमान राजकन्येला आपल्यापेक्षा हुशार पती हवा असतो, म्हणून ती सर्व विवाहोत्सुक तरुणांना प्रत्येकी नऊ प्रश्न विचारण्याची संधी देते, पण अखेर तिलाही निरुत्तर करणारा कोणीतरी भेटतोच... एक अनाथ मुलगा आपल्या दुष्ट काकांना चांगली अद्दल घडवतो... आणि संकटात सापडलेल्या एका वृद्ध जोडप्याला उपयोगी पडतो तो एक ढोल!
यातील काही कथा लेखिका सुधा मूर्ती यांनी आपल्या बालपणी आजी-आजोबांकडून ऐकल्या... तर काही कथा देशोदेशी केलेल्या भ्रमंतीच्या दरम्यान त्यांना ऐकायला मिळाल्या... काही कथा त्यांच्या स्वत:च्या कल्पनाशक्तीतून कागदावर उतरल्या... या सर्वच्या सर्व सुरस, कालातीत अशा लोककथा
गेली कित्येक वर्षं लेखिकेच्या मनात घर करून राहिलेल्या आहेत. वेळोवेळी आपल्या सहवासात आलेल्या लहान मुलामुलींना, आपल्या विद्यार्थ्यांना त्यांनी त्या सांगितल्या आहेत.
आज या कथासंग्रहाच्या रूपाने या सर्व कथा लहान मुलांपासून मोठ्या माणसांपर्यंत सर्वच वाचकांना वाचनासाठी उपलब्ध होत आहेत.

सुधा मूर्तींच्या सिद्धहस्त लेखणीतून साकार झालेल्या, मनात घर करून राहणाऱ्या, देश-विदेशच्या गमतीशीर आणि चटकदार कथा खास बालचमूंसाठी

# सुकेशिनी आणि इतर कथा

**सुधा मूर्ती**

अनु. **लीना सोहोनी**





**१३०रु. पोस्टेज २५रु.**

सुधा मूर्तींनी लिहिलेल्या बालकथांचं हे पुस्तक.
यात काही भारतीय आणि काही विदेशी कथा आहेत,
तर काही सुधा मूर्ती यांनी स्वत: लिहिलेल्या आहेत.
नेहमी लबाडपणा करणाऱ्या कोल्ह्याचं इथे परोपकारी रूप पहायला मिळेल. आजोबांनी केलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारी गाय, माकड आणि बुजगावणं इथे भेटतील.
आलेल्या संकटांनी घाबरून न जाता चतुराईने त्यांवर मात करणाऱ्या अनेक स्त्रिया पहायला मिळतील.
जादूच्या मदतीनं संपत्ती मिळू लागल्यावर
लोकांना मदत करणारे आणि तरीही
श्रमांवरच भिस्त ठेवणारे तरुणही भेटतील.
एका वेगळ्याच विश्वाची सफर
या गोष्टी घडवून आणतील.

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

# सुधा मूर्ती यांची साहित्यसंपदा




## वाइज अँड अदरवाइज

अनु. लीना सोहोनी

आपल्या व्यवसायात कार्यमग्न असतानाही सामाजिक भान ठेवून टिपलेल्या अनुभवांचे हे लेखन

**१५०रु. पोस्टेज २५रु.**




## गोष्टी माणसांच्या

अनु. लीना सोहोनी

सुधा मूर्ती यांना भेटलेल्या माणसांचे आणि अस्सल अनुभवांचे मार्मिक चित्रण

**१३०रु. पोस्टेज २५रु.**




## पुण्यभूमी भारत

अनु. लीना सोहोनी

मानवी स्वभाव आणि प्रवृत्तींच्या विविध पैलूंचे नेमके चित्रण

**१३०रु.पोस्टेज २५रु.**




## बकुळा


अनु. लीना सोहोनी

बकुळीच्या साक्षीने जन्मलेली श्रीमती आणि श्रीकांत यांची अनोखी प्रेमकहाणी...

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

# सुधा मूर्ती यांची साहित्यसंपदा

## महाश्वेता





अनु. उमा कुलकर्णी

संकटांशी सामना देणाऱ्या समर्थ स्त्रीची कहाणी

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

## डॉलर बहू





अनु. उमा कुलकर्णी

'अमेरिकाप्रेमी' भारतीयांच्या
मानसिकतेचा अचूक वेध

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

## सामान्यांतले असामान्य




अनु. उमा कुलकर्णी

कर्नाटकी पार्श्वभूमीतील सामान्य माणसातलं
वेगळेपण उलगडणारा वैविध्यपूर्ण कथाविष्कार!

**१३०रु. पोस्टेज २५रु.**

## पितृऋण





अनु. मंदाकिनी कट्टी

नियतीचा बळी ठरलेल्या पित्याची जबाबदारी स्वत:चं
अर्घ्य देऊन पूर्ण करणाऱ्या मुलाचं अस्वस्थपण...
आणि त्यासाठी खंबीर उभी राहिलेली कन्या
यांचं अतूट नातं

**७०रु. पोस्टेज २०रु.**

# साहित्यवार्ता



*** उद्ध्वस्त संस्कृतीकडे समीक्षकांचे दुर्लक्ष**

''राजकारणामुळे उद्ध्वस्त होणाऱ्या संस्कृतीकडे सध्याच्या समीक्षकांचे दुर्लक्ष होत आहे. तसेच आजची समीक्षा पूर्वीच्या समीक्षेसारखी न राहता ती अधिक प्रगल्भ व्हावी,'' असे मत ज्येष्ठ साहित्यिक-समीक्षक डॉ. के. रं. शिरवाडकर यांनी व्यक्त केले.

डॉ. व. दि. कुलकर्णी स्मृती समितीतर्फे 'आजचे मराठी साहित्य : समीक्षा थिटी आहे का?' या विषयावरील परिसंवादात समीक्षक प्रा. रा. ग. जाधव, डॉ. नीलिमा गुंडी आणि डॉ. विद्यागौरी टिळक यांनी भाग घेतला.

डॉ. शिरवाडकर म्हणाले, ''पूर्वीची समीक्षा आणि सध्याच्या काळातील समीक्षा याचा तौलनिक अभ्यास होणे आवश्यक आहे. पूर्वी समीक्षकांमध्ये मतभेद असले, तरी साहित्याच्या सिद्धांतावर ते ठाम होते. सध्याच्या काळातील समीक्षक मुख्य विषय सोडून अन्य विषयांत रस घेतात. हे त्यांचे सामर्थ्य असले, तरी साहित्यकृतीचा गाभा असलेल्या मुख्य विषयाचे काय?''

प्रा. जाधव म्हणाले, ''समीक्षेची समीक्षा हा एक ज्ञानव्यवहार आहे. याचा संबंध वैचारिक वातावरणाशी येतो. सध्या मराठीमध्ये वैचरिकतेची वानवा आहे, तशीच स्थिती समीक्षेचीदेखील वानवा आहे. साहित्याचा अभ्यास बहुभाषिय असावा. समीक्षा साहित्याच्या दोन पावले मागेच राहते. समीक्षेत चिंतन, मनन आणि समाजशास्त्राचा अभ्यास अंतर्भूत असतो. समीक्षा वाचून साहित्यनिर्मिती करता येत नाही. मात्र समीक्षेमुळे चिकित्सक डोळस वाचक निर्माण होतात.''

डॉ. गुंडी म्हणाल्या, ''साहित्यनिर्मितीचा वेग आणि समीक्षेचा वेग यामध्ये विलक्षण अंतर आहे. सर्वसामान्य वाचक आणि समीक्षा यात दरी निर्माण झाली, हे वास्तव असले तरी समीक्षेचे महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. समीक्षक हा वाचकांसोबतच कळत-नकळत लेखकांनाही मदत करतो. समीक्षेतील थिटेपण दूर करण्यासाठी साधनग्रंथांची पूर्तता करण्याबरोबरच समीक्षा अकादमी स्थापन करावी.''

डॉ. टिळक म्हणाल्या, ''वाचकांची अभिरुची वाढविणे हा मुख्य उद्देश असल्याने समीक्षा आवश्यकच आहे. पूर्वी वाचकवर्गाच्या गरजा लक्षात घेऊन समीक्षकाला

लेखन करावे लागे. समीक्षा समजायला वेळ लागतो, पण साहित्यकृतीतील आशय आणि विषयाचे पूर्ण आकलन होते.''

डॉ. वि. भा. देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

*** व्यंगचित्र म्हणजे केवळ थट्टामस्करीचे साधन नव्हे**

व्यंगचित्रांच्या माध्यमातून आपल्याला काहीही करता येते. विनोदाबरोबरच काव्यापासून श्रद्धांजली वाहण्यापर्यंत व्यंगचित्रांचा उपयोग करता येतो. व्यंगचित्र म्हणजे केवळ थट्टामस्करी करण्याचे साधन नव्हे, असे मत ज्येष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांनी व्यक्त केले.

'अक्षरधारा'च्या वतीने निगडीमध्ये स्वा. सावरकर सदन, सेक्टर २५, प्राधिकरण येथे भव्य पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते, त्याचे उद्‌घाटन तेंडुलकर यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून स्वा. सावरकर मंडळाचे कार्याध्यक्ष विनोद बन्सल उपस्थित होते.

उद्‌घाटनानंतर तेंडुलकर यांच्याशी श्रीकांत चौगुले यांनी संवाद साधला. या वेळी तेंडुलकर म्हणाले, चित्रपट, नाटक पाहण्यापेक्षा मला वाचायलाच आवडते. वाचताना त्यातील वातावरण मला माझ्या नजरेने बघता येते. मीच त्याचा दिग्दर्शक असतो. चित्रपटात आणि नाटकात वन्स मोअरची सोय नसते; मात्र पुस्तकात अनेक वेळा वन्समोअर घेता येतो. पुस्तक वाचण्याचा चांगला परिणाम आपल्या मनावर होतो. मी व्यंगचित्रकार असलो, तरी चित्रकलेच्या परीक्षेत नापास झालो होतो. मी लहान असताना वडिलांचा मार खाल्ल्यामुळे त्यांच्याबद्दल मनात राग होता. त्यामुळे पहिले व्यंगचित्र मी माझ्या वडिलांचेच काढले.

व्यंगचित्रं ही ठराविक वर्गासाठी नसून, प्रत्येक माणसाची भूक आहे. आपण माणूस म्हणून जगताना किती जगलो, यापेक्षा कसे जगलो हे महत्त्वाचे. आयुष्यात पश्चात्तापविरहित क्षण आला नाही, तर आपण माणूस म्हणून जगलो.

'अक्षरधारा'चे मुख्य व्यवस्थापक लक्ष्मण राठिवडेकर यांनी उपस्थित मान्यवरांना ग्रंथभेट देऊन स्वागत केले. भास्कर रिकामे यांनी सूत्रसंचालन केले.

*** काव्याच्या प्रकाशाने 'घटका-पळे' उजळली**

अंधत्वावर मात करून ताला-सुरात कवितेचे गायन करणाऱ्या युवा कलाकारांनी काव्याचा प्रकाश जागविला आणि काव्याची पखरण करीत 'घटकापळाने' हा कवितासंग्रह खुला केला.

'पद्मगंधा प्रकाशन'तर्फे संतोष शेणई लिखित 'घटकापळाने' या कवितासंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव आणि प्रसिद्ध कवयित्री डॉ. अरुणा ढेरे

यांच्या हस्ते, तर या संग्रहाच्या ब्रेल लिपीतील आवृत्तीचे प्रकाशन 'निवांत' संस्थेच्या मीरा बडवे यांच्या हस्ते झाले. अर्थशास्त्र विषयात एम. ए. आणि आता एम.बी.ए. करणारी मैथिली चव्हाण, अध्यापनाचे काम करणारे नितीन धवारे आणि नवीन परंदवाल यांनी या संग्रहातील कवितांचे उत्कृष्ट सादरीकरण करून रसिकतेचे डोळे जागे असल्याची प्रचिती दिली.

''कविता हे कवीचे आत्मकथन असते. हा खासगी अनुभव सार्वत्रिक होऊ नये, ही माझी इच्छा आहे.'' असे शेणई यांनी सांगितले. त्याविषयी डॉ. ढेरे म्हणाल्या, ''आपले आत्मकथन आणि त्यातील अनुभव हा अनेकांच्या आत्मचरित्राचादेखील अनुभव असतो. मग ही कविता केवळ कवीची न राहता ती सगळ्यांची होऊन जाते. विपरीताची जाणीव व्यक्त करणारी आणि जगण्याशी सशक्तपणे बांधली गेलेली शेणई यांची कविता आहे. गुंतागुंत आणि ताणांनी भरलेले आयुष्य १९९० नंतरच्या कालखंडातील कवितेमध्ये घट्टपणाने दिसते. स्वत्व शोधणारा माणूस हाच या कवितेचा नायक आहे. संवेदनेची बोथटता अस्वस्थ करणाऱ्या कवीला अनुभवाचा मथळा हेरण्याची किमया साधली आहे. जगण्याचे संदर्भ शोधण्याची धडपड, विश्वास आणि श्रद्धा ही या कवितेची वैशिष्ट्ये आहेत.''

प्रा. जाधव म्हणाले, ''कवितेच्या अभिव्यक्तीसाठी लय, रूप आणि बांधणी आवश्यक असते. घटका आणि पळे हे काळाचे लघुतम मापाचे प्रतीक आहे. काळ आणि अवकाश यामधील जीवनाचे भान या कवीला आहे. या कवितांतून जागतिकीकरणाचे आत्मचिंतन प्रकट होते.''

बडवे म्हणाल्या, ''अर्थपूर्ण कविता माझ्या मुलांना मिळावी, या उद्देशाने हा कवितासंग्रह ब्रेल लिपीत आणला. साहित्यातून तरी त्यांना नातलग मिळावेत, ही इच्छा त्यामागे आहे. त्यासाठी साहित्याचे दाणे माझ्या ओंजळीत टाकावेत.''

प्रकाशक अरुण जाखडे यांनी प्रास्ताविक केले. रोहित काळसेकर यांनी मराठी अभिमानगीत सादर केले. नचिकेत जोशी यांनी सूत्रसंचालन केले.




**तंत्रज्ञानाची मुळाक्षरे**

कविता भालेराव

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचा उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार २००६-०७

ख्रि. पू. ८००० ते २००२ मधील निवडक ९० शोधांची वैज्ञानिक आणि मनोरंजक माहिती

**२३०रु. पोस्टेज ३०रु.**

## * 'सुपरक्लोन' वैज्ञानिक कादंबरीचे प्रकाशन

डॉ. पंडित विद्यासागर लिखित 'सुपरक्लोन' या वैज्ञानिक कादंबरीच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रघुनाथ शेवगावकर, डॉ. मनोहर जाधव, ज्येष्ठ पत्रकार सदा डुंबरे, डायमंड पब्लिकेशनचे दत्तात्रेय पाष्टे या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

''सध्या निर्माण होत असणाऱ्या विज्ञानविषयक ललित लेखनातच भविष्यातील प्रगल्भ विज्ञानविषयक साहित्याची बीजे आहेत. अशा परिस्थितीत प्रतिभावंत ललित लेखकांनीसुद्धा वैज्ञानिक ललित लेखन करणे आवश्यक आहे,'' असे मत डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, ''साहित्य ही फक्त साहित्यिकांचीच जबाबदारी नाही, ही जाणीव आपल्या समाजात आता निर्माण होऊ लागली आहे. त्यामुळेच आता पत्रकार अथवा वैज्ञानिकांकडूनही होत असलेल्या साहित्य निर्मितीला प्रतिसाद मिळत आहे. विज्ञानाचा अभ्यास केलेल्या माणसाला वास्तवाकडे पाहण्याची विशिष्ट जीवनदृष्टी प्राप्त झालेली असते. ही दृष्टी साहित्यातून वाचकांपर्यंत पोचत असेल, तर वाचकांनाही त्यातून आनंद मिळत असतो. तसाच काहीसा आनंद या पुस्तकामुळे वाचकांना प्राप्त होतो.''

ते म्हणाले, ''आजचे विज्ञान साहित्यिक कुमार वाचकवर्ग डोळ्यासमोर ठेवून साहित्य निर्माण करत आहेत. नजीकच्या काळात त्यांनी 'अमृतानुभव' आणि आइन्स्टाइनच्या अनुभवांवरून प्रेरणा घेऊन लेखन केल्यास त्यांची प्रगती होणार हे नक्की; तसेच 'पुढे काय' यापेक्षा 'असे का' या प्रश्नाचे उत्तर देणारे अव्वल दर्जाचे विज्ञानविषयक साहित्य निर्माण झाल्यास त्यातून समाजापर्यंत पोचणारे ज्ञान अद्भुतच असेल.''

डॉ. शेवगावकर म्हणाले, ''विज्ञानाच्या प्रगती बरोबरच सर्वसामान्य जनतेमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी विज्ञान समजून घेऊन ते सर्वसामान्यांना समजेल अशा साहित्याच्या रूपात मांडणे आवश्यक आहे. तसे झाल्यास ते साहित्यिकांचे समाजाला मोठे योगदानच ठरेल.''

## * 'मुक्तांगणची गोष्ट' या पुस्तकाचे प्रकाशन

समकालीन प्रकाशनच्या वतीने प्रकाशित व 'मुक्तांगण'चे संस्थापक व ज्येष्ठ लेखक अनिल अवचट लिखित 'मुक्तांगणची गोष्ट' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. अजय बंग यांच्या हस्ते झाले. 'मुक्तांगण'चे आनंद नाडकर्णी, सदा डुंबरे, तसेच ए. पी. जोशी, समकालीन प्रकाशनचे संचालक आनंद अवधानी, डॉ. सुहास कुलकर्णी व

श्याम देशपांडे या वेळी उपस्थित होते. ‘मुक्तांगण’च्या रौप्यमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने या वेळी ‘आनंदयात्री’ नियतकालिकाचे प्रकाशनही डॉ. बंग यांच्या हस्ते करण्यात आले.

मुक्तांगणच्या कार्याबद्दल ते म्हणाले, आधुनिक महाराष्ट्राच्या समाजकार्याचा इतिहास लिहितेवेळी डॉ. अनिता व अनिल अवचट, तसेच डॉ. आनंद नाडकर्णी ही त्रिमूर्ती व्यसनमुक्ती कल्पनेची शिल्पकार म्हणून लक्षात राहील. हे पुस्तक म्हणजे राज्यभर पसरलेल्या मुक्तांगणच्या कुटुंबाची कहाणी आहे.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात सुमित्रा भावे व सुनील सुकथनकर यांनी अनिल अवचट यांच्याशी संवाद साधला. ‘‘एका मित्राच्या मुलाला जडलेले व्यसन सोडविण्याचे निमित्त झाले. त्यातून पुढे पत्नी अनिताने सुरू केलेल्या मुक्तांगणच्या कार्यात ती मुलांची आई झाली व आपोआपच मी बाबा झालो. आज २४ वर्षे झाली. येथेच आहे. अनिताच्या समर्पणाचे अधिष्ठान मुक्तांगणला आहे. एखादी अलिशान गाडी घेण्यापेक्षा दुसऱ्याच्या जीवनावर हास्य फुलविण्यात अधिक समाधान आहे, हे या कामातून कळले. मुक्तांगणमधील उपचार म्हणजे मैत्रीचा एक संस्कार. मनाला आणि शरीराला समृद्ध करणारा आनंद घ्यावा व माणसाने नादिष्ट व्हावे. ज्याला कोणी नाही, त्याच्यासाठी आम्ही आहोत याचे समाधान आहे. आमची पुढची पिढी मुक्तांगणसाठी चांगले काम करीत आहे.

### * ‘अजिंक्यवीर’

सातारा जिल्ह्यातील शहिदांची शौर्यगाथा सांगणारे ‘अजिंक्यवीर’ हे पुस्तक तरुणांना प्रेरणा देणारे आहे. जयवंत गंधाले यांनी प्रत्येक जवानाच्या घरी जाऊन माहितीचे संकलन केले. या पुस्तकाला प्रा. ग. प्र. प्रधान यांची प्रस्तावना आहे.

### * बॉलिवूड म्हणजे सर्वस्व नव्हे

देशातील संपूर्ण चित्रपट क्षेत्राचा बॉलिवूड हा एक छोटा भाग असूनही बॉलिवूड म्हणजेच भारतीय चित्रपट असे समजले जाते. सर्व तरुण लेखकदिग्दर्शकांना प्रादेशिक पातळीवर काम करण्यापेक्षा बॉलिवूडच्या व्यवस्थेत सामावले जाण्याची इच्छा असते. संपूर्ण देशातील सर्व चित्रपट बॉलिवूड या एकाच दिशेने का जात आहेत याचा विचार केला पाहिजे, असे मत ख्यातनाम चित्रपट लेखक व दिग्दर्शक अदूर गोपालकृष्णन यांनी व्यक्त केले.

फिल्म टेलिव्हिजन इन्स्टिटयूट ऑफ इंडिया (एफटीआयआय) संस्थेच्या सुवर्ण वर्षानिमित्ताने ‘युनिकनेस ऑफ इंडियन फिल्म स्क्रिप्ट’ या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन गोपालकृष्णन यांच्या हस्ते झाले.

चर्चासत्रामध्ये १९१३ मधील पहिल्या भारतीय चित्रपटापासून हिंदी चित्रपटांच्या बदलत जाणाऱ्या स्वरूपाचा आढावा घेण्यात आला.

### * संतूरवादक पं. शिवकुमार शर्मा


कर्म करत राहा, फळाची अपेक्षा धरू नका, या गीतेतील उपदेशावर श्रद्धा ठेवत मी संगीतक्षेत्रात मुशाफिरी केली. संतूर वाद्य लोकप्रिय करणे, ही परमेश्वराची योजना असून मी केवळ एक माध्यम आहे. संतूर वाद्य, जगभरात पोहोचले असे पं. शिवकुमार शर्मा यांनी मनोगत मांडले.

संतूरवादनाची किमया जगभर पोहोचवणाऱ्या पं. शर्मा यांनी १९५५-१९९८ पर्यंत– ४३ वर्षापूर्वीचा 'सारेगाम'साठी रेकॉर्डिंग केलेल्या १८ सीडींचा खजिना 'द कम्प्लिट वर्क्स' मधून सादर करण्यात आला. उत्तम तबलावादक असणाऱ्या पं. शर्मा यांनी १९६० मध्ये मुंबईत आल्यानंतर केवळ संतूरवादन हेच ध्येय पुढे ठेवून पहिला कार्यक्रम केला. त्यावेळी टीकाकारांच्या टीकेने अजिबात व्यथित न होता. संगीत दिग्दर्शनपासूनच्या ऑफर्सना नकार दिला. १९६७ मध्ये 'कॉल ऑफ द व्हॅली'ने निर्माण केलेली जादू आजही कायम आहे.

### * मदर टेरेसांवर कॉमिक बुक

प्रख्यात समाजसेविका मदर टेरेसा यांच्यावर अमर चित्रकथातर्फे जन्मशताब्दीदिनी म्हणजे २६ ऑगस्टला कॉमिक्सचे प्रकाशन करण्यात आले. आता दर दोन महिन्यांनी नवीन कॉमिक बुक प्रसिद्ध करण्यात येणार आहे. मदर टेरेसा यांनी मानवतावादी सेवेला वाहून घ्यायचा निश्चय आपल्या वयाच्या १२व्या वर्षी केलेला होता. युवा पिढीला मदर टेरेसांच्या आदर्श जीवनाचा परिचय करून देण्याच्या उद्देशानेच कॉमिक बुक प्रकाशित करण्यात येत आहे असे अमर चित्रकथांच्या संपादिका रिना पुरी यांनी सांगितले.


मदर टेरेसा - 'बियाँड द इमेज' हे ॲन सेबा या ज्यू पत्रकार लेखिकेने अलीकडे लिहिलेले मदर टेरेसांचे चरित्र खूपच गाजले आहे.




**मदर टेरेसा**
प्रतिमेच्या पलीकडे

**ॲना सेबा**
अनु. अनंत बेदरकर

**२५०रु.** पोस्टेज ३०रु.

## * स्नेहसुधा कुलकर्णी यांचा काव्यसंग्रह

''निरागस मनाचा स्वाभाविक आविष्कार करणारी नैसर्गिक निर्व्याजतेतून जन्माला आलेली कविता काळजाचा ठाव घेते,'' असे मत ज्येष्ठ कवी प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी यांनी व्यक्त केले.

नीहारा प्रकाशनतर्फे डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी यांच्या 'सावलीच्या शोधात' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन तांबोळी यांच्या हस्ते झाले. या वेळी अनुबंध प्रकाशनतर्फे 'पाच तीन दोन' या कथासंग्रहाचेही प्रकाशन माजी खासदार श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते झाले.

तांबोळी म्हणाले, ''कुटुंबकथा हा विस्मृतीत चाललेला कथाप्रकार सशक्तपणे लिहिणारी लेखिका म्हणून डॉ. कुलकर्णी यांचा उल्लेख केला पाहिजे. स्त्रीवादी नसलेली, मात्र स्त्रियांच्या भूमिकेस प्राधान्याने महत्त्व देणारी कथालेखिका हे त्यांच्या लेखनशैलीचे वैशिष्ट्य म्हणता येईल.''

## * 'नवा पूल' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

''तथाकथित प्रतिष्ठित प्रवाहापेक्षा 'नवा पूल' कवितासंग्रहातील कविता वेगळ्या वळणाची आहे. कवीच्या कंपूभोवती आत्मकेंद्री कविता मर्यादित राहिली. रांजणे यांनी 'नवा पूल' बांधून ही कविता माणसांत आणली आहे. सामाजिक आशय असलेल्या या कवितेत मानवतेचे व्यापक रूप पाहण्याची शक्ती आहे,'' असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांनी 'आडकर फाउंडेशन'च्या राम रांजणेलिखित 'नवा पूल' या कवितासंग्रहाचे प्रकाशन करताना व्यक्त केले. आमदार दीप्ती चौधरी, बंडा जोशी, धर्मराज निमसरकर आणि प्रमोद आडकर या वेळी उपस्थित होते.

निमरसकर म्हणाले, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सभेपूर्वी स्वागतगीत म्हणणारे रांजणे यांनी त्यांच्या वयाच्या दहाव्या वर्षीच प्रतिभेची चुणूक दाखविली होती. या महामानवाच्या करुणेची गाथा त्यांनी काव्यातून व्यक्त केली आहे.''

बंडा जोशी म्हणाले, ''कवीच्या जीवनाचे प्रतिबिंब असलेल्या या संग्रहामध्ये वैविध्यपूर्ण रचना आहेत. रसिकता, प्रगल्भता आणि कल्पकता यांचा संगम त्यांच्या कवितेमध्ये आहे.''

## * पुण्याचे पिनकोड गाइड

शहरीकरणामुळे पुण्याला मेट्रोचे रूप येत आहे. वाढत्या पुण्याचा विचार करता विशिष्ट ठिकाणापर्यंत पोहचणे सध्या अवघड बनले आहे. बाहेरून पुण्यामध्ये येणाऱ्यांची तर पुरती तारांबळ उडते. यावर उपाय म्हणून 'पुणे पिनकोड गाइड' बल्लाळ जोशी तयार करीत आहेत. पुण्यातील साठ पिनकोडनुसार हे गाइड

विभागण्यात येणार असून, त्या विभागातील सोसायट्या, महाविद्यालये, हॉस्पिटलसारखी महत्त्वाची ठिकाणे, रस्ते यांचा त्यात समावेश असणार आहे. प्रत्येक पानाच्या खाली डाव्या बाजूला पिनकोड असेल, त्यामुळे एखादे ठिकाण शोधणे सहज शक्य होईल. मुंबईचे असे गाइड नुकतेच प्रकाशित झाले आहे.

या गाइडसाठी लागणारी प्राथमिक माहिती गोळा करण्यासाठी जोशी शहरात स्वत: भ्रमंती करत आहेत. आतापर्यंत दहा हजार सोसायट्यांची माहिती त्यांनी मिळवली आहे.

या संदर्भात जोशी म्हणाले, ''पत्रव्यवहार करताना ४० टक्के लोक पिनकोडचा वापर करीत नसल्याने पोस्टाला पत्र विशिष्ट ठिकाणी पोहोचवणे गैरसोयीचे ठरते. वीजमंडळामध्ये नोकरी करत असताना पत्ते शोधणे किती अवघड आणि किचकट काम असते याचा मी अनुभव घेतला. तेव्हा पत्ता शोधणे सोयीस्कर व्हावे यासाठी मार्गदर्शक काढण्याचे विचार डोक्यात येऊ लागले. १९८० मध्ये एक पिनकोड गाइड मी प्रकाशितही केले, मात्र त्याचा उपयोग फारसा झाला नाही. शहरीकरणामुळे आणि निवडणुकांच्या वार्डस्तरीय फेरबदलांमुळे पुण्याचा कायापालट झाला आहे. एक ठिकाण किंवा भाग तीन ते चार पिनकोडमध्ये विभागला गेला आहे. त्यामुळे सोसायट्या, रस्ते आणि जवळची खूण यावर जास्त प्रकाश टाकला गेला आहे.''

*** कलादिग्दर्शक नितीन देसाई यांचा 'हॉलिवूड' गौरव**

आघाडीचे भारतीय कलादिग्दर्शक आणि निर्माते नितीन देसाई यांचा 'आर्ट डायरेक्टर्स गिल्ड फिल्म सोसायटी' आणि 'अमेरिकन सिनेमाथेक' या हॉलिवूडमधील अग्रगण्य संस्थांच्या वतीने २९ ऑगस्ट रोजी गौरव करण्यात आला. यावेळी त्यांचे कलादिग्दर्शन असलेल्या 'देवदास' चित्रपटाचा विशेष खेळ दाखविला गेला.

जगभरातील कलादिग्दर्शन आणि प्रॉडक्शन डिझायनिंगसाठी गौरविण्यात येणाऱ्या चित्रपट मालिकेत देवदासची निवड झाली आहे. गेली २२ वर्षे देसाई बॉलिवूडमध्ये कलादिग्दर्शक म्हणून प्रसिद्ध आहेत. 'हम दिल दे चुके सनम' (१९९९), 'जोधा अकबर' (२००८), 'लगान' (२००१) वगैरे ८५हून अधिक चित्रपटांना त्यांचे कला दिग्दर्शन लाभले आहे. 'सच ए लाँग जर्नी' या चित्रपटातीच्या कला दिग्दर्शनासाठी त्यांना यापूर्वीही हॉलिवूडकडून पुरस्कार मिळाला होता. १९९८ 'अलेक्झांडर' चित्रपटाच्या सेट्सनिर्मितीसाठी विख्यात दिग्दर्शक ऑलिव्हर स्टोन यांनी देसाई यांना पाचारण केले होते. 'स्लमडॉग मिलिनेअर' या ऑस्कर विजेत्या चित्रपटात 'कौन बनेगा करोडपती' आणि 'ताजमहाल'यांच्या दृश्यांकरिता उभारलेल्या सेट्सचेही कौतुक झाले होते.

*** गुरुदेवसिंग व कोरलापती श्रीराममूर्ती यांना 'भाषा सन्मान'**

पंजाबी साहित्यिक, बुद्धिमंत गुरुदेव सिंग आणि तेलुगू संशोधक व समीक्षक कोरलापती - श्रीराममूर्ती यांची साहित्य अकादमीच्या भाषा सन्मानासाठी निवड करण्यात आली आहे.

एक लाख रुपये रोख, मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. नोव्हेंबरमध्ये हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

सिंग यांनी सूफी पंजाबी काव्याचा इतिहास तसेच गुरुमुखी लिपीतील पुस्तके आणि पर्शियन व अरबी साहित्याच्या भाषांतराचे काम केले आहे.

साहित्य अकादमीने भाषांसाठी दिलेल्या अन्य पुरस्कारांमध्ये माधव जोशी-अश्क, कच्छीसाठी तेजपाल दर्शी, अवधीसाठी विश्वनाथ पाठक, बुंदेलीसाठी राम नारायण शर्मा व कैलाश नेहारी द्विवेदी आणि गढवालीसाठी सुदामप्रसाद प्रेमी व प्रेमलाल भट्ट यांचा समावेश आहे.

*** कथेचे सौंदर्य वाढविणारीच गाणी चित्रपटांमध्ये हवीत**

''पूर्वीचे संगीत हे सौंदर्यदृष्ट्या मनमोहक होते. कथा पुढे नेण्यासाठी गाण्यांचा वापर केला जात असे. मात्र सध्याच्या चित्रपटांमध्ये अनावश्यक गाण्यांचे चित्रण अधिक असते. कथेचे सौंदर्य वाढविणारीच गाणी हवीत.'' असे मत प्रसिद्ध गीतकार स्वानंद किरकिरे यांनी व्यक्त केले.

फिल्म टेलिव्हिजन अॅन्ड इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (एफटीआयआय) आणि द फिल्म रायटर्स असोसिएशनच्या वतीने 'द युनिकनेस ऑफ दि इंडियन फिल्म स्क्रिप्ट' या विषयावरील चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. त्या अंतर्गत 'ए साँग अॅन्ड डान्स अबाऊट एव्हरीथिंग, म्युझिक, साँग अॅन्ड लिरिक्स इन द स्क्रिप्ट' या विषयावर बोलताना ते म्हणाले,

''पूर्वीच्या संगीतात सौंदर्यदृष्टी होती. कथा सांगण्याच्या निमित्ताने गाण्यांचा वापर केला जात असे. सध्याच्या चित्रपटांमध्ये कथेशिवाय अनावश्यक गाण्यांचीच चलती दिसून येत आहे.''

*** गुगलची यशोगाथा आता झळकणार चित्रपटात**

गुगल हे सर्च इंजिन तयार करणारे लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांच्यावर एक चित्रपट तयार होत आहे. ग्राऊंडसवेल प्रॉडक्शन्सने सीन पेन यांची भूमिका असलेला 'मिल्क' हा चित्रपट तयार केला होता. आता त्याच निर्मात्या कंपनीने केन ऑलेटा यांच्या 'गुगल्ड-द-एन्ड ऑफ द वर्ल्ड अॅज वुई नो इट' या पुस्तकाचे हक्कही घेतले आहेत. कुठलाही अनुचित मार्ग न अवलंबता पैसा कसा मिळवता येईल यासाठी दोघेजण

कसा विचार करतात त्याचे चित्रण त्यात आहे. हे दोन तरुण एक कंपनी स्थापन करतात - ती कंपनी जगच बदलून टाकते.

सर्जेई व लॅरी यांनी स्टॅनफोर्ड विद्यापीठात पीएच.डी.चा अभ्यास करत असताना ही कंपनी स्थापन केली. गुगलची ही यशोगाथा आता आणखी बहरली आहे. गुगलकडून वेगवेगळ्या प्रकारच्या इंटरनेट सेवा दिल्या जातात. दररोज एक अब्ज सर्च रिक्वेस्टर्सना गुगल सर्च इंजिन उत्तरे देत असते.

*** रूपा ॲण्ड कंपनी अमृतमहोत्सव**

अन्य सर्व व्यवसायांप्रमाणे बदलत्या मार्केट ट्रेण्ड्सची दखल घेण्याची गरज प्रकाशन व्यवसायाला वाटू लागली आहे. ७५व्या वर्षात पदार्पण करणारी, 'रूपा ॲण्ड कंपनी' वाचकांना केंद्रस्थानी ठेवून, वैविध्यपूर्ण पुस्तकांचे प्रकाशन आणि परदेशात विस्तार अशा अनेक योजना प्रत्यक्षात आणत आहे. २० लाख प्रतींच्या खपाचा आकडा गाठलेल्या चेतन भगतच्या 'टू स्टेटस्'च्या यशाने वाचक पुस्तकांकडे वळत आहेत हे स्पष्ट झाले, असे 'रूपा'चे व्यवस्थापकीय संचालक कपिश मेहरा यांनी सांगितले. नॉन फिक्शन, सेल्फ हेल्प, मॅनेजमेंट अशी अनेक प्रकारची पुस्तके काढून पश्चिम तसेच पूर्व आशियायी देशांमध्ये 'रूपा'ने जम बसवला आहे. आता भारतातील लहान शहरांमध्ये तसेच सिंगापूर, मलेशिया, फिलिपाइन्स आदी देशांमध्ये विस्तार करण्याचा प्रकाशनाचा विचार आहे. 'रूपा'चा ताज्या दमाच्या लिखाणावर नेहमीच भर असतो. गेल्या वर्षभरात प्रकाशनाची १८ पुस्तके बेस्टसेलर ठरली आहेत. ७५व्या वर्षांत नवीन उपक्रम हाती घेणाऱ्या 'रूपा'ला शुभेच्छा!

*** सेतु माधवराव पगडी**

सेतु माधवराव पगडी हे संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर १९६० ते १९६९ या काळात गॅझेटिअर विभागाचे सचिव होते. त्यापूर्वी ते हैदराबाद संस्थानमध्ये सनदी अधिकारी होते. १९५१ मध्ये ते औरंगाबाद जिल्ह्याचे कलेक्टर होते. गुलबर्गा, हैदराबाद, वाराणसी, अलाहाबाद, वरंगळ, मराठवाडा, पुणे, मुंबई आदी ठिकाणी




**नॉट गॉन विथ द विंड**

विश्वास पाटील

महाराष्ट्र राज्य पुरस्कार २००८-०९
कै.रा.तु. पाटील पुरस्कार २००८,
विशेष लक्षणीय गद्य साहित्यकृती
पुरस्कार २००८,

वाऱ्यासोबत वाहून न जाता वाऱ्यावर स्वार झालेल्या जागतिक चित्रकृती व साहित्यकृती!

**४१०रु. पोस्टेज ३०रु.**

त्यांचा संपर्क असे. व्याख्यानाच्या निमित्ताने त्यांनी संपूर्ण भारतभर प्रवास केला. असाधारण स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण आणि अचूक भाष्य करण्याची क्षमता ही त्यांची खास वैशिष्ट्ये होती. मराठ्यांचा इतिहास नीट समजून घ्यावा, फारशी भाषेच्या अज्ञानामुळे होणाऱ्या चुका तशाच राहू नयेत, या जाणिवेतून त्यांनी शंभर फारसी इतिहासकार आणि कवी यांची चरित्रे मराठीत लिहिली.

मुंबईच्या वास्तव्यात पगडी यांनी १३ वर्षांत तेराशेवर ग्रंथ अभ्यासले. विविध भाषांमधील शंभरावर आत्मचरित्रे वाचली. इंग्रजी, मराठी, उर्दू, फारसी, बंगाली, अरबी, तेलुगू, कन्नड इत्यादी सतरा भाषा त्यांना अवगत होत्या. राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद औरंगाबादेत आले तेव्हा पगडींनी एक तास अस्खलित उर्दूमधून सूफी संप्रदायावर भाषण दिले. ते राष्ट्रपतींना इतके आवडले की, त्यांनी 'अ मोस्ट लर्नेड पर्सन' अशी पगडी यांची प्रशस्ती केली.

वाराणशीतील प्राचार्य पुणतांबेकर यांची कन्या उषा हिच्याशी विवाह करता यावा यासाठी म्हणून त्यांनी सनदी सेवेत प्रवेश केला. या दोघांचे परस्परांवरचे प्रेम निस्सीम होते.

पगडी यांनी १४ ऑक्टोबर, १९९४ रोजी जीवनयात्रा संपवली आणि त्यानंतर दोनच दिवसांनी १६ ऑक्टोबरला पगडी यांची जुनी मुलाखत दूरदर्शनवर पाहता पाहता उषाताईंनीही कायमचा निरोप घेतला.

पगडी हे विद्वान तसेच रसिक होते. त्यांच्या हयातीत ६४ पुस्तके प्रकाशित झाली. यातील काहींचा वानोळा पाहिला तर पगडी यांच्या चौफेर विद्वत्तेची साक्ष पटते. अमंग द गोंड्स ऑफ आदिलाबाद, समर्थ संप्रदाय, सूफी संपद्राय तत्त्वज्ञान आणि कार्य, महानुभाव साहित्यातून व्यक्त होणारे प्रतिष्ठान, मुघल आणि मराठे, छत्रपती शिवाजी, मराठे आणि निझाम...

हैदराबाद संस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास त्यांनी लिहिला. त्यांनी मौलिक संशोधन तर केलेच पण साहित्य संस्कृतीचे अभ्यासक म्हणूनही एक मानदंड निर्माण केला. मराठी वाचकाला फारसी व उर्दू साहित्याची ओळख त्यांच्यामुळेच झाली. वक्ता म्हणूनही पगडी तीन तीन तास रसाळ विवेचन करीत. अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या सेतु माधवराव श्रीनिवास पगडी यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांचे समग्र साहित्य प्रकाशित करून त्यांना उचित आदरांजली वाहिली जात आहे.

*** स्पनेमधील आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी स्वाती राजे**

बालसाहित्याच्या अभ्यासक व लेखिका स्वाती राजे स्पेन येथे ८ ते १२ सप्टेंबर रोजी झालेल्या बालसाहित्याच्या आंतरराष्ट्रीय परिषदेला उपस्थित होत्या. 'इंटरनॅशनल बोर्ड ऑन बुक्स फॉर यंग पीपल' (इबी) या बालसाहित्य क्षेत्रातील सर्वोच्च संस्थेतर्फे

ही परिषद आयोजित करण्यात आली होती. 'ओरल ट्रॅडिशन अँड मायनॉरिटीज विदाऊट रिटन लिटरेचर' या विषयावरील चर्चासत्रात त्यांनी आपले विचार मांडले.

स्वाती राजे यांनी आजपर्यंत दक्षिण आफ्रिका, स्वीडन, चीन, डेन्मार्क येथील परिषदांत बालसाहित्यविषयक निबंध सादर केले आहेत. लहान मुलांमध्ये वाचनसंस्कृतीचा प्रसार करण्यासाठी त्या 'भाषा' या संस्थेतर्फे फिरत्या ग्रंथालयाचा उपक्रम राबवित आहेत.

*** रहस्यकथा, गूढकथा आणि भयकथा**

पुणे विद्यापीठ मराठी विभाग, मनोविकास प्रकाशन व धनंजय वार्षिक, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी कथा - रहस्य, गूढ व भय' या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. मराठी साहित्यात गूढ कथा, रहस्य कथा उपेक्षितच राहिलेल्या आहेत. रत्नाकर मतकरी यांच्यासारखे लेखक त्यांनी केलेल्या नाटक, कादंबरी य अनेकविध साहित्य प्रकारांमुळे गूढकथेच्या बाबतीतही प्रकाशात आले. मात्र, रहस्यकथालेखक किंवा गूढकथालेखक केवळ हा एकच वाङ्मयप्रकार हाताळत असल्याने फारसे उजेडात येत नाहीत. समीक्षकही या लेखकांच्या साहित्याचा समीक्षेच्या दृष्टीने विचार करीत नाहीत. आत्मचरित्रातूनही रहस्य, भय, गूढ यांचे उल्लेख येणे आवश्यक आहे. मात्र तसे होताना दिसत नाही.

मुकुंद संगोराम म्हणाले, गेल्या पस्तीस वर्षांत तंत्रज्ञानातील बदलामुळे पत्रकारितेतही आमूलाग्र बदल झाले. परंतु वाचकांचे क्राईम स्टोरी वाचण्याचे वेड कमी झालेले नाही. भयपटही येतात व चालतात. टीव्ही मालिकांत भुताटकी, चेटूक यांना चलती आहे. असे असताना रहस्यकथेसारख्या साहित्यप्रकाराला साहित्य दरबारातून बाहेर जावे लागते ही चिंतेची गोष्ट आहे. विज्ञानकथालेखक निरंजन घाटे यांनी रहस्यकथेचा इतिहास मांडला. ह. मो. मराठे, ज्येष्ठ पत्रकार अरविंद गोखले, राजेंद्र कुलकर्णी, इब्राहिम अफगाण, डॉ. सदानंद मोरे, आनंद साने, चित्रकार रविमुकुल, शुभदा गोगटे, र. अ. नेर्लेकर, वसू भारद्वाज आदींनी आपले विचार व्यक्त केले.

*** 'भाषा'तर्फे 'थांबाल तिथं वाचा' उपक्रम सुरू**

इंटरनेट, मोबाईल यासारख्या इलेक्ट्रानिक माध्यमांच्या भाऊगर्दीत वाचन संस्कृती टिकवण्यासाठी 'भाषा' संस्थेतर्फे 'थांबाल तिथे वाचा' या उपक्रमाचे उद्‌घाटन शिक्षकदिनी करण्यात आले. या उपक्रमांतर्गत शहर व उपनगरातील डॉक्टरांच्या दवाखान्यात विविध भाषांतील पुस्तके उपलब्ध करून दिली जातील.

या उपक्रमाचे उद्‌घाटन डॉ. नंदकुमार कानडे यांच्या हस्ते करण्यात आले. ते म्हणाले, ''मुलांना इलेक्ट्रॉनिक खेळणी पालक मोठ्या प्रमाणावर देतात. पण

त्याव्यतिरिक्त वेगळे विश्व मुलांना रंगवू शकते ही जाणीव पालकांना हवी. त्यासाठी हा उपक्रम खूप महत्त्वाचा ठरेल.''

डॉक्टरांनी या उपक्रमास भरघोस प्रतिसाद दिला आहे. पहिल्या टप्प्यामध्ये २० दवाखान्यात 'पुस्तक कोपरा' उभारण्यात आला आहे.

'भाषा' संस्थेच्या अध्यक्षा स्वाती राजे म्हणाल्या, ''वारजेपासून पिंपरी चिंचवडपर्यंत आणि पेरूगेटपासून कर्वे रस्त्यापर्यंत असणाऱ्या दवाखान्यांना समाविष्ट करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. भारतीय माणसांचे बरेचसे आयुष्य रांगांमध्येच जाते. त्यामुळे त्या वेळेचा सदुपयाग करता येईल. त्यातून वाचन संस्कृती रुजण्यास मदत होईल.''

प्रादेशिक भाषांचे जतन व संवर्धन यासाठी भाषा संस्थेतर्फे मुलांसाठी वाचन व मौखिक भाषा विकास योजना वाकडेवाडी, कर्वे रस्ता व लोकमान्यनगर या तीन भागांमध्ये पुस्तकघर योजना चालवली जाते. वाचन संस्कृतीच्या प्रसारासाठी या दोनही योजनांना पुस्तक रूपाने मदत हवी आहे. अधिक माहितीसाठी ०२०-२५८१०५३० या क्रमांकावर सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत संपर्क साधावा.

*** 'मैत्र जिवाचे' लेखसंग्रहाचे प्रकाशन**

''मैत्री उदात्त असते. तिच्यात स्नेह, प्रेम आणि आपुलकी यांचा सुंदर मिलाफ असतो. अशा मैत्रीचे पैलू 'मैत्र जिवाचे' या लेखसंग्रहाच्या रूपाने सर्वांसमोर आले आहेत,'' असे मत डॉ. वसंत नूलकर यांनी व्यक्त केले. लेखसंग्रहाच्या संपादिका आशा गुर्जर, अविनाश बिनीवाले उपस्थित होते.

*** रसिकांना आनंद देणे हेच रंगकर्मींचे काम**

''नाटकवाला हा प्राणीच असा आहे की जो मळलेल्या वाटेने कधी जात नाही. आपली वाट धुंडाळून रसिकांना आनंद देण हेच रंगकर्मींचे काम आहे,'' असे मत प्रसिद्ध अभिनेते-दिग्दर्शक विनय आपटे यांनी व्यक्त केले.

'सुनेत्रा शंकर प्रतिष्ठान'तर्फे ज्येष्ठ नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे यांच्या


**निर्मनुष्य**

**४थी आवृत्ती**

रत्नाकर मतकरी

मनाला कापत जाणाऱ्या भयाचे आणि जीवनाच्या भीषण वास्तवाचे गूढ दर्शन यांचा अस्वस्थ अनुभव देणाऱ्या गूढकथा

**१००रु. पोस्टेज २०रु.**

पन्नास वर्षांतील नाट्यप्रवासाचा वेध घेणाऱ्या 'नाट्यव्रती' या चित्रफितीचे प्रकाशन आपटे यांच्या हस्ते झाले, तर 'कॉंटिनेंटल प्रकाशन'तर्फे देशपांडे यांच्या 'नाट्यमित्र' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. प्र. ल. गावडे यांच्या हस्ते झाले. प्रकाशिका देवयानी कुलकर्णी-अभ्यंकर आणि चित्रफितीचे दिग्दर्शक नंदू क्षीरसागर या वेळी उपस्थित होते.

आपटे म्हणाले, ''माधव मनोहर, सखाराम भावे, दामू केंकरे, प्रभाकर पणशीकर आणि डॉ. वि. भा. देशपांडे ही व्यक्तिमत्त्वे म्हणजे नाट्यक्षेत्रातील संदर्भग्रंथच आहेत.''

डॉ. गावडे म्हणाले, ''शालेय जीवनातील छंदाचे रूपांतर नाट्यवेडामध्ये होण्याची प्रक्रिया देशपांडे यांच्या संदर्भात झाली. अनेक रंगकर्मींच्या सहवासातून त्यांना नाटकाकडे पाहण्याची नवी दृष्टी मिळाली.''

या वेळी देशपांडे आणि क्षीरसागर यांनी मनोगत व्यक्त केले. अभ्यंकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ माधवी वैद्य यांनी सूत्रसंचालन केले.

*** दामू धोत्रे यांच्याविषयी संकेतस्थळ**

वाघ, सिंह, बिबट्या, चित्ता अशा हिंस्र प्राण्यांशी दोस्ती करून त्यांना सर्कशीतील कवायतींमध्ये लीलया सामावून घेणारे जगप्रसिद्ध सर्कसपटू दामू धोत्रे यांच्या कार्याचा पट आता संकेतस्थळाच्या माध्यमातून उलगडणार आहे. नव्या पिढीला त्यांच्याविषयी माहिती व्हावी या हेतूने www.damoodhotre.com संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. धोत्रे यांच्या १०८व्या जयंतीचे औचित्य साधून संकेतस्थळ सुरू झाले आहे.

सर्कस क्षेत्रात जागतिक स्तरावर भारताचे नाव उंचावणाऱ्या सर्कसपटूवर आपल्याकडे प्रथमच असे संकेतस्थळ साकारले गेले आहे. धोत्रे यांचे पणतू आनंद धोत्रे म्हणाले, ''सर्कशीची लोकप्रियता दिवसेंदिवस कमी झाल्याची चर्चा ऐकायला मिळते. मात्र, तिच्याबाबतचे सर्वच वयोगटांमध्ये असणारे कुतूहल टिकून आहे. या क्षेत्रात जागतिक स्तरावर योगदान दिलेले दामू धोत्रे यांचे कार्य पुढे जावे या विचारातून संकेतस्थळाची कल्पना सुचली. त्यावर धोत्रे यांच्या सर्कस विश्वातील कामगिरीची माहिती, जीवनपट व दुर्मीळ छायाचित्रांचा समावेश करण्यात आला आहे. सध्या हे संकेतस्थळ इंग्रजी भाषेत असून लवकरच मराठीतून उपलब्ध होईल. 'रँबो सर्कस'चे सुजीत दिलीप यांचे मोलाचे सहकार्य संकेतस्थळासाठी मिळाले.''

वैयक्तिक आवड आणि छंदातून दामू धोत्रे यांच्या सर्कस क्षेत्रातील प्रवासाला पुण्यापासूनच सुरुवात झाली. त्यानंतर श्रीलंका, थायलंड, चीन, म्यानमार, इंडोनेशिया,

फ्रान्स व अमेरिका या देशांचे त्यांनी दौरे केले व वाघ-सिंहांसोबतच्या चित्तथरारक कसरती सादर केल्या. अमेरिकेतील जगप्रसिद्ध 'रिंगलिग ब्रदर्सा अँड बुर्नम अँड बेली' या सर्कशीत काम करण्याची संधीही त्यांना मिळाली. अमेरिकेतील सर्कस वर्ल्ड म्युझियममध्ये धोत्रे यांचे पुतळे व सर्कशीत वापरलेले साहित्य जतन करून ठेवण्यात आले आहे. विशेष म्हणजे अमेरिकन सरकारने त्यांना तेथील नागरिकत्व देऊन लष्करात दाखल होण्यासाठी निमंत्रित केले होते. 'वाघ-सिंह माझे सखेसोबती' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध असून, त्यातील एका प्रसंगांचा शालेय पाठ्यपुस्तकात समावेश करण्यात आला होता.

*** भारतात इंटरनेटचा वापर तिप्पट**

भारतात इंटरनेटचा वापर येत्या पाच वर्षांत तिप्पट वाढणार असून इंटरनेटचा वापर करणाऱ्यांची भारतातील संख्या २३.७ कोटींवर जाईल. सध्या भारतात इंटरनेटचा वापर करणाऱ्यांची संख्या ८ कोटी आहे.

बॉस्टन कन्सल्टिंग समूहाच्या 'इंटरनेट न्यू बिलीयन' या अहवालानुसार ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि इंडोनेशिया या देशात इंटरनेटचा वापर करणाऱ्या लोकांची संख्या २०१५ पर्यंत १.२ अब्जावर जाईल. ही संख्या जपान आणि अमेरिकेपेक्षा तीनपट अधिक होईल. या देशात २००९ मध्ये ही संख्या ६१ कोटी होती. येत्या पाच वर्षात वार्षिक ९ ते २० टक्के वाढ होईल. विशेषत: युवकांमुळे इंटरनेटचा वापर वाढेल.

२०१५ पर्यंत भारतात इंटरनेटची पोहोच १९ टक्क्यांवर जाईल. सध्या हे प्रमाण ७ टक्के आहे. सध्या भारतात इंटरनेटचा वापर मुख्यत: मोठ्या शहरात होतो. भारतात इंटरनेटचा वापर करणारे लोक सरासरी अर्धा तास ऑनलाईन असतात. उपरोक्त देशांच्या तुलनेत हे प्रमाण सर्वांत कमी आहे.

*** 'श्रीमद् भागवत महापुराण'**

आज एकविसाव्या शतकातही तंतोतंत लागू पडेल असे तत्त्वज्ञान व्यासांनी भागवतात मांडले आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्था, अर्थव्यवस्था, राजनीती याविषयी व्यासांनी सांगितलेल्या गोष्टी कालातीत आहेत. ते तत्वज्ञान सर्वांपर्यंत पोहोचावे या उद्देशाने पंच्याऐंशी वर्षीय भाषांतरकार प्रा. सत्संग बर्वे यांनी मराठीत रूपांतर केले आहे.

बारा स्कंध, साडेतीनशे अध्याय आणि अठरा हजार श्लोक एवढा मोठा पसारा असलेले 'श्रीमद् भागवत महापुराण' मराठीत आणण्यासाठी प्रा. बर्वे यांना सात वर्षे लागली. त्यासाठी त्यांनी अनेक संदर्भ ग्रंथांचा, मराठी वृतांचा कसून अभ्यास केला,

मराठी-संस्कृत-हिंदी-इंग्रजी शब्दकोशांचा वापर केला. 'भागवत पुराण हे भक्ती संप्रदायाचं मूळ स्त्रोत मानलं जातं. मूळ संस्कृत श्लोक आणि त्यापुढे मराठी रूपांतर असे ग्रंथाचे स्वरूप असून ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकरांची प्रस्तावना आहे.

*** 'बुकगंगा'चा अनोखा उपक्रम; विश्वकोशही उपलब्ध**

इंग्रजीतील ॲमेझॉन डॉट कॉमच्या धर्तीवर मराठीतील पुस्तके इंटरनेटवर आता विकत घेता यावीत यासाठी 'बुकगंगा डॉट कॉम' या अनोख्या संकेतस्थळाचे उद्घाटन झाले आहे, ॲपल कंपनीच्या आयपॅडवर मराठीतील नामवंत पुस्तके वाचता येणार आहेत.

'ग्लोबल मराठी' या संकेतस्थळाचे मुख्य संचालक मंदार जोगळेकर यांनी ही माहिती दिली. एशियाटिक सोसायटीचे अध्यक्ष डॉ. अरुण टिकेकर यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन झाले.

आयपॅड या अत्याधुनिक संगणकावर पुस्तकातील मजकूर ग्राहकाला वाचता येतो. अशा आयपॅडवर वाचकांनी पुस्तकांची माहिती घेऊन 'बुकगंगा'कडे मागणी केली, तर ते पुस्तक जगात कुठेही उपलब्ध करून दिले जाईल. या आधुनिक तंत्रामध्ये प्रकाशकांना दुकान, वितरण असे खर्च नसल्याने पुस्तके ग्राहकांना कमी किमतीत विकता येतील. आयपॅडवर ग्राहकाने पुस्तक निवडल्यानंतर 'माय विश्व' या संचालक कंपनीच्या बँक खात्यावर पैसे जमा करता येतील किंवा क्रेडिट, डेबिट कार्डाने पैसे पोचवता येतील. 'ई-बुक' खरेदी केल्यावर ग्राहकाला पुस्तक डाऊनलोड करण्यासाठी कोड दिला जाईल, त्याचा वापर करून पुस्तक वाचता येईल. आयपॅडवर पुस्तकाचा फॉन्ट लहान मोठा करण्याची सुविधा आहे. या नव्या उपक्रमात विश्वकोश, संस्कृती कोश असे संदर्भ ग्रंथही आणि मराठीबरोबरच बंगाली, तेलगू, तमीळ तसेच हिंदी भाषेतील 'ई-बुक्स' उपलब्ध होतील.

*** हॉलंडचे संस्कृत अभ्यासक डॉ. रुडी बर्गन**

''संस्कृती टिकविण्यासाठी संस्कृत भाषा टिकवणे महत्त्वाचे आहे, कारण तो आपल्या संस्कृतीचा गाभा आहे,'' असे प्रतिपादन बी. जी. देशमुख यांनी ऋषी न्यासातर्फे आयोजित हॉलंडचे संस्कृत अभ्यासक डॉ. रुडी बर्गन यांच्या गौरव समारंभात केले.

''व्यवहारात संस्कृत भाषा प्रचलित नसल्यामुळे तिचा लोप होत चालला आहे. ही भाषा टिकवण्यासाठी संस्कृतमधील उत्तम साहित्य लोकांपर्यंत पोचवले पाहिजे.''

डॉ. बर्गन यांनी पुणे विद्यापीठातून संस्कृत भाषेत 'पीएचडी' केली असून, गेली पन्नास वर्षे संस्कृत भाषेतील विविध ग्रंथांवर संशोधन केले आहे. पाणिनीच्या

पारिभाषिक शब्दावलीवर शब्दकोश तयार केला आहे. त्यांनी संस्कृत भाषेला दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

बर्गन म्हणाले, ''हॉलंडमध्ये एम. ए. करताना माझा मुख्य विषय संस्कृत होता. उत्तम मार्गदर्शन मिळाल्याशिवाय इतके कार्य करणे शक्य झाले नसते. पुणे विद्यापीठाच्या सहकार्यामुळे व डॉ. श्री. द. जोशी यांच्या मार्गदर्शनामुळे ते शक्य झाले.''

*** दादा चांदेकर वाचनालयाचा स्नेहमेळावा**

''वाचन हा एक मूक संवाद असून, त्यातून निश्चित प्रगती होते. त्यामुळे आपण कितीही धावपळीत असलो तरी दिवसांतून एक तास तरी मनापासून वाचनासाठी दिला पाहिजे,'' असे प्रतिपादन सिने-दिग्दर्शक राजदत्त यांनी केले.

वडगाव मावळ येथील गोपाळराव देशपांडे वनवासी विद्यार्थी वसतिगृहातील नवजीवन केंद्राच्या दादा चांदेकर वाचनालयाच्या वतीने स्नेहमेळाव्याचे आयोजन केले होते.

राजदत्त म्हणाले, ''आपल्या देशात दु:ख-दारिद्र्य आहे म्हणून नुसते ओरडत राहू नका, तर स्वत: अंतर्मनाचा दिवा लावून इतरांना उजेड दाखविण्याचा प्रयत्न करा. आपल्यासाठी कोणीतरी दिवा लावला म्हणूनच आपण आज उजेडात आहोत. ज्ञान शेवटपर्यंत पोचवण्यासाठी अविरत प्रयत्न करा. स्वत:चा विकास झालाच पाहिजे, त्याबरोबर समाजाचाही विकास झाला पाहिजे. आपण सारे एकाच भारतमातेचे पुत्र आहोत. '' वसतिगृहातील विद्यार्थ्यांना उद्देशून ते म्हणाले, ''जन्म कोठे घ्यावा, हे आपल्या हातात नसते. त्यामुळे सारखे कुरकुरत, रडत बसू नका. असेल त्या परिस्थितीवर मात करायला शिका.''

विद्यार्थ्यांनी तीन वेळा ओंकार, एकात्मता मंत्र व देशभक्तिपर गीताने पाहुण्यांचे स्वागत केले. राजदत्त यांनी सुमार पंधराशे पुस्तके वाचनालयाला दिली. वाचकसंख्या दीडशेच्या घरात आहे.

*** शांताराम आठवले जन्मशताब्दी**

गीतकार शांताराम आठवले यांच्या कवितांचा आणि चित्रपटगीतांचा आस्वाद आता इंटरनेटवरून घेता येणार आहे. आठवले यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या कुटुंबीयांनी वेबसाईटची निर्मिती केली आहे.

आठवले यांनी लिहिलेल्या 'आधी बीज एकले', 'लखलख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया', 'मन शुद्ध तुझं', 'दोन घडीचा डाव' अशा अनेक गीतांनी रसिकांच्या मनात स्थान निर्माण केले आहे. तसेच वहिनींच्या बांगड्या, शेवग्याच्या शेंगा, वावटळ अशा चित्रपटांचे त्यांनी दिग्दर्शन केले आहे. या वेबसाईटवर शांताराम आठवले यांचे

अल्प चरित्र तसेच त्यांच्या ग्रंथांचा परिचय दिला आहे. आठवले यांची नर्मविनोदी कविता, भावकविता, बालकविता, चित्रपटगीते पाहता-ऐकताही येतील. www.shantaramathavale.com हा वेबसाईटचा पत्ता आहे.

*** नवोदित कलाकारांसाठी संकेतस्थळ**

अभिनय, संगीत, नृत्य, चित्रकला आणि अशा विविध क्षेत्रांतील नवोदित कलाकारांना निर्माते आणि दिग्दर्शक यांच्या पोचवण्यासाठी निहिलेंट या कंपनीने 'तुम भी' या नावीन्यपूर्ण संकेतस्थळाची निर्मिती केली आहे.

कथा, पटकथा, छायाचित्रणापासून ते अभिनयापर्यंत सर्व बाबींसाठी संकेतस्थळावरून कलाकारांची निवड केली जाणार आहे. लघुपटासाठी कथा लेखनाची स्पर्धा ठेवण्यात आली असून, सर्व कथांमधून उत्तम सहा कथांची निवड करण्यात येईल. कंपनीचे अध्यक्ष एल. सी. सिंग म्हणाले, ''या लघुपटांच्या प्रकल्पानंतर अनेक कार्यशाळा आणि इतर उपक्रमही राबवण्यात येणार आहेत. हे केवळ संकेतस्थळ नसून नवोदित कलाकारांसाठी व्यावसायिकदृष्ट्या काम मिळविण्याचे माध्यम आहे. तज्ज्ञ लोकांचे मंडळ, बड्या निर्मिती कंपन्या, दिग्दर्शक सतत संकेतस्थळावरील कलाकारांवर नजर ठेवतील व त्यांच्यातील उत्तम कलाकारांना संधी देतील. नवीन कलाकारांची निर्माते व दिग्दर्शकांना कायम गरज असते. त्यामुळे त्या दोघांसाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरेल.'' www.tumbhi.com यावर संपर्क साधावा.

*** पाषाणालाही झरे फोडण्याचे सामर्थ्य साहित्यात**

माझे बोट कापले तरी त्यातून रक्त नाही साहित्यरस पाझरेल. पाषाणालाही झरे फोडण्याचे सामर्थ्य साहित्यात आहे, असे प्रतिपादन डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी 'पुणे जिल्हा शिक्षण मंडळा'च्या ६९व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात केले. अध्यक्षस्थानी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव सतीश उरसळ होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य आर. एम. मिसाळ यांनी तर सूत्रसंचालन प्रा. देशपांडे यांनी केले. प्रा. डॉ. शुभांगी औटी यांनी आभार मानले.





**स्ट्रगलर्स**

मुक्ता चैतन्य

ज्यांना 'स्टार' व्हायचं असतं, त्यांची 'संधी' मागणाऱ्यांची, त्यांच्या सुखदु:खांची, जिद्दीची, नैराश्याची दुनिया चितारणारे आगळे वेगळे पुस्तक

**९०रु. पोस्टेज २०रु.**

*** 'भेळ' प्रकाशन सोहळा**

२५ एप्रिल २०१० रोजी विनोदी लेखक श्री. रामदास फुटाणे यांच्या हस्ते बंगलोरच्या नवोदित कवयित्री अनघा तांबोळी यांच्या 'भेळ' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले.

देशदूतचे माजी संपादक व पुण्यनगरीचे सल्लागार संपादक सुरेश अवधूत अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

*** 'गुगल'वर गुगली...**

गुगलवर कोणतीही गोष्ट सहज मिळत असल्याने लक्षात ठेवण्याची मेंदूची क्षमता कमी होत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

जगातील कुठलीही माहिती हवी असो... संगणक असेल व त्यावर इंटरनेट असेल, तर काही सेकंदांत ही माहिती हाती येऊ शकते. 'सर्च इंजिन' या गोंडस नावाच्या अनेक साईट्स अशी माहिती चुटकीसरशी उपलब्ध करून देतात. सर्च इंजिनचा 'बादशहा' म्हणजे गुगल... मात्र या गुगलचा 'युजर फ्रेंडली' गुण वापरकर्त्यांच्या मेंदूवर परिणाम करत असल्याचा दावा एका पुस्तकात करण्यात आला आहे. 'दि शॅलोज : व्हॉट दि इंटरनेट इज डुइंग टू अवर ब्रेन्स' या पुस्तकात लेखक निकोलस कार यांनी गुगलच्या अतिवापराच्या दुष्परिणामांचा लेखाजोखा घेतला आहे. ही सर्च इंजिन्स अधिकाधिक सोपी बनविण्याकडे या कंपन्या आणि त्यातील सॉफ्टवेअर इंजिनिअर्सचा कल असतो. गुगलने नुकतीच 'गुगल इन्स्टन्ट' ही सेवा सुरू केली आहे. आपण शब्द संपूर्ण टाईप करण्यापूर्वीच 'रिझल्ट्स' बघण्याची सोय यात आहे. मात्र उलट ही प्रक्रिया अधिकाधिक अवघड ठेवावी, असा आग्रह कार यांनी धरला आहे. जीपीएसमळे (ग्राऊंड पोझिशनिंग सिस्टिम) ठिकाणे लक्षात ठेवण्याची मेंदूची क्षमता नाहीशी होऊ शकते, अशी भीतीही कार यांनी या पुस्तकात व्यक्त केली आहे. अखेरीस कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईटच असतो... 'सर्च इंजिन'ही त्याला अपवाद ठरण्याची शक्यता असल्याचे या पुस्तकाने ध्वनित केले आहे.

*** सेमी मराठीचा निर्णय**

इंग्रजी माध्यमातील मुले मराठी माध्यमातून काही विषय शिकल्यास त्यांना ते आकलनास अधिक सोपे जातील. त्याचप्रमाणे मराठी भाषाविषयाची गोडीही वाढेल. त्यामुळे इंग्रजी शाळांतून सेमी मराठी शिकविण्याचा निर्णय चांगला आहे, असे मत शिक्षणक्षेत्रातील तसेच साहित्य वर्तुळातील मान्यवरांनी व्यक्त केले.

नव्या अभ्यासक्रमाची आखणी करण्यासाठी तयार केलेल्या 'राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१०'चा मसुदा नुकताच जाहीर झाला. त्यामध्ये इंग्रजी माध्यमाच्या

शाळांमध्ये इतिहास, भूगोल विषय मराठीतून शिकवण्याची मुभा इंग्रजी शाळांतील विद्यार्थ्यांना द्यावी, असे सुचविण्यात आले आहे. त्याप्रमाणे बोलीभाषांनाही अभ्यासक्रमात स्थान देण्याचे सुचविले आहे.

पुणे विद्यापीठातील कला, ललित कला आणि प्रयोगजीवी कला विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अविनाश आवलगावकर म्हणाले, ''हा निर्णय त्या त्या विषयाचे आकलन होण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. आपला इतिहास इंग्रजीत शिकताना अनेक वेळा पर्यायी शब्द नसतात. त्यामुळे इंग्रजीतून शिकताना विद्यार्थ्यांना कितपत आकलन होते, हा प्रश्न आहे. लढायांचे वर्णन, प्रेरणादायी प्रसंग हे इंग्रजी भाषेतनू सांगितल्यावर आकलनाच्या पातळीवर किती येणार, हा प्रश्न आहे. बखरीतील शब्द हे मराठीतील मुलांनाही लवकर समजत नाहीत. तर इंग्रजीत भाषांतर होऊन किती समजणार? त्यामुळे त्यांचा पाया कच्चा राहतो. 'सेमी मराठी' केल्यास मुलांचा फायदा होईल. भाषेविषयीची गोडीही निर्माण होईल. बोलीभाषेचा समावेश केल्यावर आकलनशक्ती वाढेल. त्यानंतर ते प्रमाण मराठी भाषेपर्यंत जाऊ शकतील. बोली नगण्य समजल्याने त्या लोकांना न्यूनगंड वाटतो, तो कमी होऊ शकेल.''

अंतर्नादचे संपादक भानू काळे म्हणाले, ''इंग्रजी माध्यमाची मुले परीक्षा आणि गुण यापुरतेच मराठी शिकतात. मराठीची व्यावहारिकता त्यांना कळत नाही. प्रत्यक्ष भाषा अजिबात येत नाही. त्यामुळे असे काही करू नये. विद्यार्थ्यांना आवडीच्या भाषेत शिकण्याची संधी मिळाली पाहिजे.'' शिक्षक प्रतिनिधी विनायक काकडे म्हणाले, ''ही गोष्ट स्वागतार्ह आहे. इंग्रजी माध्यमातही मराठी शिकवले पाहिजेच. आपला महाराष्ट्र, भूगोल, इतिहास याची माहिती मराठीतूनच अधिक चांगली समजू शकते. विद्यार्थ्यांना या विषयांची अधिक आवड निर्माण होईल.'' ग्रामीण भागातूनही इंग्रजी शाळा वाढू लागल्या आहेत. पण, तिथल्या मुलांचे इंग्रजीवर प्रभुत्व कमी असते. त्यामुळे त्यांना काही विषय मराठीतून शिकविल्यास अधिक चांगले होईल, असे मत व्यक्त करण्यात आले. मिलिंद नखाते म्हणाले, ''मुलांना समजण्यासाठी हा निर्णय चांगला आहे. भावना, घटना या मराठीत अधिक चांगल्या समजून सांगता येतात. ज्या गोष्टी संस्कृतीमधून येतात त्या आपल्या भाषेतून अधिक चांगल्या कळतात.''

*** शासनमान्य ग्रंथालयांची 'झाडाझडती'**

ग्रंथालयांत पुस्तकांची अपुरी संख्या, हवी ती पुस्तके न मिळणे, सुविधांचा अभाव, ग्रंथपालाची गैरहजेरी, ग्रंथालयाला कुलूप... अशा विविध समस्यांच्या पार्श्वभूमीवर पुणे विभागातील शासनमान्य ग्रंथालयाच्या 'झाडाझडती'चे काम हाती घेण्यात आले आहे आणि ग्रंथालयांच्या कामकाजावर विशेष लक्ष ठेवले जाणार आहे.

शहराबरोबरच खडोपाड्यांतील वाचकांना हवी ती पुस्तके वाचता यावीत, त्यांना वर्तमानपत्रे मिळावीत आणि वाचन संस्कृती वाढावी हा उद्देश समोर ठेवून 'शासनमान्य ग्रंथालय' ही योजना सुरू झाली. अशा ग्रंथालयांना दर वर्षी राज्य शासनाचे हजारो रुपयांचे अनुदान मिळते. पण, सध्या एकट्या पुणे विभागात ५०पेक्षा अधिक ग्रंथालये अकार्यक्षम अवस्थेत आहेत. त्यामुळे या ग्रंथालयाची सद्य:स्थिती पाहण्यासाठी शासनाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने मोहीम हाती घेण्यात आली आहे.

सहायक ग्रंथालय संचालक वा. ह. कुमठे म्हणाले, ''जी ग्रंथालये अकार्यक्षम आहेत, त्यांना प्रथम सुधारण्याची संधी दिली जाते. दिलेल्या वेळेत त्यांच्यात बदल झाला नाही तर अनुदान थांबवून ग्रंथालयाची मान्यता रद्द करण्यात येते. सध्या आम्ही ग्रंथालयांची पाहणी करण्याचे काम सुरू केले असून यासाठी १२ जणांचे पथक तयार केले आहे. या पाहणीत एखादे ग्रंथालय दोषी आढळले तर त्याच्यावर कारवाई होईल.''

''ग्रंथालयातील पुस्तके, मासिके आणि वर्तमानपत्रे यांची संख्या आणि एक वर्ष स्वखर्चाने ग्रंथालय चालवणे हे निकष पाहून ग्रंथालयांना शासकीय मान्यता देण्यात येते. तसेच, उपलब्ध सुविधांचा विचार करून ग्रंथालयाची अ, ब, क, ड अशी वर्गवारी ठरवून त्यानुसार अनुदान दिले जाते. पुणे विभागातील पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर येथील ग्रंथालयांना दर वर्षी एकूण १६ कोटी रुपयांच्या अनुदानाचे वाटप केले जाते,'' असे कुमठे यांनी सांगितले. ग्रंथालयाच्या मान्यतेसाठी यंदा पुणे विभागातून ७०० अर्ज आले आहेत. या अर्जाच्या छाननीचे काम सुरू असून दिलेल्या निकषांना पात्र ठरतील त्यांना मान्यता देण्यात येईल. मान्यतेचे काम ३१मार्चपर्यंत चालू राहणार आहे.

*** श्रीपाद श्रीवल्लभ चरितामृत**

शंकर भट रचित 'श्रीपाद वल्लभ चरितामृत' हा ग्रंथ आंध्र प्रदेश येथील श्रीपाद श्रीवल्लभ महासंस्थानाने प्रकाशित केला असून या ग्रंथाचा सिद्धयोगाचार्य हरीभाऊ निटुरकर यांनी मराठी आणि हिंदीत अनुवादित केला आहे. या ग्रंथाचे कोणतेही खंड नाहीत. श्रीपाद श्रीवल्लभ महासंस्थानने मान्यता दिलेला व हरिभाऊ निटुरकर यांनी अनुवादित केलेला ग्रंथच अधिकृत असून त्याचे मूल्य १२०रु. आहे. इतरत्र प्रकाशित झालेल्या कोणत्याही श्रीपाद श्रीवल्लभांच्या पुस्तकांशी महासंस्थान आणि निटुरकर यांचा संबंध नाही याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. अधिकृत ग्रंथ मिळविण्यासाठी संपर्क - डॉ. प्रज्ञा ओक ९८९२३२१८८० अधिक माहितीसाठी www.mahayog.in ही वेबसाइट पहावी.

*** कै. शशिकला आगाशे स्मृती बालवाङ्मय पुरस्कार**

भारत विद्यालय बुलढाणा या संस्थेच्या संस्थापिक तथा माजी मुख्याध्यापिका कै. सौ. शशिकलाताई आगाशे यांच्या स्मृती दाखल दरवर्षी दोन बालसाहित्यकलाकृतींना पुरस्कार देण्यात येतो. जानेवारी २००९ ते डिसेंबर २०१० या दोन वर्षांच्या कालावधीतील बालसाहित्याची पुस्तके पुरस्कारासाठी मागविण्यात आली आहेत.

कथा, कादंबरी, चरित्र, नाटक, कविता इत्यादी वाङ्मय प्रकारातील स्वतंत्र किंवा अनुवादित बालसाहित्य या पुरस्कारासाठी पात्र राहील. बुलढाणा येथे ३१ जानेवारी २०११ ला पुरस्कारप्राप्त लेखकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहणे आवश्यक असते.

यापूर्वी सदर पुरस्कार रेखा बैजल (प्रकाशाची फुले), लीला दीक्षित (मुके मित्र), कल्याण इनामदार (उलट्या सुलट्या देशात), प्रवीण दवणे (गाणे स्वातंत्र्याचे), प्रशांत गौतम (शूर झाले वीर), निर्मला मोने (बाहुलीचे घर), मधु सावंत (निवडुंगाची फुले), रमेश चिल्ले (मन वढाय वढाय), प्रतिमा इंगोले (मोठ्ठं व्हायचं कसं?),भारत सासणे (टुणटुण बेडकाचा प्रवास), रेणू पाचपोर (एक हिरवंगार वर्ष), श्रीनिवास पंडीत (डेनीसच्या गोष्टी), अमर हबीब (भाषणाची गोष्ट), गिरिजा कीर (तू सावित्री हो), अमर हबीब (खरी कमाई), अनंत भावे (गिरकी घेऊन कबुतर सांगतंय), दासू वैद्य (क'कवितेचा) यांना देण्यात आले आहेत.

पुरस्कारासाठी १५ डिसेंबर पर्यंत खालील पत्त्यावर पुस्तके पाठवा. भारत विद्यालय, बुलढाणा, ता. जि. बुलढाणा ४४३ ००१. फोन ०७२६२-२४२३५४

*** अनंत फंदी पुरस्कार**

संगमनेर इतिहास संशोधन मंडळाच्या वतीने दरवर्षी 'कवी अनंत फंदी साहित्य पुरस्कार' प्रदान करण्यात येतात. कादंबरी, कथासंग्रह, कवितासंग्रह, चरित्र-आत्मचरित्र, बालसाहित्य, समीक्षा, माहितीपर साहित्यकृतीस प्रत्येकी १ हजार १११ रुपये रोख देऊन गौरविण्यात येते. या पुरस्कारासाठी जानेवारी २००८ ते ऑक्टोबर २०१० दरम्यान प्रकाशित पुस्तके संबंधित लेखकांनी ३० ऑक्टोबर २०१० पर्यंत पाठवावी.

संपर्क : श्री संतोष खेडलेकर, साईसमर्थ, घासबाजार, संगमनेर, जि. अहमदनगर मोबा.०९८२२०९७८०९

❐


# विशेषवार्ता

वार्तापत्र

*** रुबिना अलीच्या 'स्लमगर्ल ड्रीमिंग' या आत्मचरित्राचे प्रकाशन**

लहान मुलांची वैचारिक जडणघडण त्यांच्या सभोवताली असलेल्या सामाजिक परिस्थितीनुसार होत असते, असे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या रेणू गावस्कर यांनी व्यक्त केले.

ऑस्कर विजेत्या 'स्लमडॉग मिलिनेअर' चित्रपटातील बालकलाकार रुबिना अली हिच्या मैत्रेय जोशी यांनी मराठीमध्ये अनुवादित केलेल्या 'स्लमडॉग मिलिनेअर : माझा ताऱ्यांकडे प्रवास' या आत्मचरित्राचे प्रकाशन 'सारेगमप लिटल चॅम्प' आर्या आंबेकर हिच्या हस्ते करण्यात आले. मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक सुनील मेहता या वेळी उपस्थित होते.




'स्लमगर्ल ड्रीमिंग'चे प्रकाशन करताना (उजवीकडून) ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या रेणू गावस्कर, 'सारेगमप लिटल चॅम्प' आर्या आंबेकर, मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक सुनील मेहता

गावस्कर म्हणाल्या की, आजही ग्रामीण व शहरी भागातील मुलांच्या विचारसरणीमध्ये जमीन-अस्मानचा फरक आहे. ग्रामीण भागातील मुले शिपाई, क्लार्क व ड्रायव्हर

होण्याची स्वप्ने पाहतात; ही परिस्थिती बदलण्याची गरज आहे.

मलाही कष्ट करून, मोठे होऊन रुबिनाप्रमाणे आत्मचरित्र प्रकाशित करायला आवडेल. यासाठी आपण सर्वांनी प्रोत्साहन देण्याची गरज आहे, अशी भावना आर्या आंबेकर हिने व्यक्त केली.

या वेळी अनेक लहान मुलांनी आपली ध्येये सांगितली, तर विदुला टोकेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

*** जांभेकर अनुवाद पुरस्कार**

'साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट'च्या 'आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्रा'तर्फे 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ने प्रकाशित केलेल्या व उदय भिडे यांनी अनुवादित केलेल्या 'अमिना' या पुस्तकाला 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर अनुवाद पुरस्कार ज्येष्ठ समीक्षिका प्रा. पुष्पा भावे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. संस्थेचे विश्वस्त रामदास भटकळ, 'केल्याने भाषांतर' त्रैमासिकाच्या संपादक सुनंदा महाजन आणि पुरस्कार निवड समितीचे दीपक घारे या प्रसंगी उपस्थित होते.



'आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्रा'तर्फे डॉ. उमा कुलकर्णी यांच्या हस्ते उदय भिडे यांना 'बाळशास्त्री जांभेकर अनुवाद पुरस्कार' प्रदान

''अनुवाद हा केवळ तेवढ्या साहित्यकृतीपुरता मर्यादित न राहता, भाषासमृद्धीचा होणे आवश्यक आहे. प्रत्येक पिढीच्या संवेदना वेगवेगळ्या असतात. त्यामुळे अनुवादाच्या क्षेत्रात युवा पिढी आली पाहिजे,'' असे मत प्रसिद्ध अनुवादिका डॉ. उमा

कुलकर्णी यांनी व्यक्त केले. अनुवादांमुळे जागतिक स्तरावरील ग्रंथव्यवहाराची माहिती होते, असेही त्या म्हणाल्या.

उमा कुलकर्णी म्हणाल्या ''अनुवादामुळे भाषाभगिनींमध्ये सुसंवाद घडतो. या प्रक्रियेमुळेच ज्येष्ठ कन्नड साहित्यिक एस. एल. भैरप्पा यांना महाराष्ट्राने आपला लेखक म्हणून स्वीकारले आहे.''

भावे म्हणाल्या, ''भाषांमध्ये संवादचक्र सुरू राहणे हे अनुवादाचे उद्दिष्ट असते. भाषावार प्रांतरचना होण्याआधी सीमा भागामध्ये दोन भाषा बोलणाऱ्या पिढ्या होत्या. साहित्यालादेखील मातीचा गंध असतो. त्यामुळे मराठी भाषेसारखे साहित्य अन्य भाषांमध्ये असू शकत नाही. अनुवादाची प्रक्रिया सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाची आहे.''

भिडे म्हणाले, ''अनुवादाच्या पहिल्याच प्रयत्नाला पारितोषिकाचा प्रसाद मिळाल्यामुळे आनंद झाला आहे. या कादंबरीचे मूळ लेखक महम्मद उमर यांनाही अनुवाद आवडला.''

भटकळ म्हणाले, ''मराठी कवितेच्या हिंदी आणि इंग्रजी अनुवादासाठी विंदा करंदीकर यांच्या नावाने, तर कथा आणि कादंबरीच्या अनुवादासाठी गंगाधर गाडगीळ यांच्या नावाने पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.''

❐


**नवे कोरे**

# शिव सूत्र

**(भाग - १)**

**ओशो** अनु. डॉ. वृषाली पटवर्धन

बीजासारखे रुजा आणि वृक्षासारखे व्हा.
थेंबासारखे, लाटेसारखे मिसळून जा
आणि सागरासारखे व्हा.
आत्म-सरोवरात, सर्वस्वानं एकरूप होऊन जा.
म्हणजे तुम्ही महासागर व्हाल! विशाल व्हाल!
मग तुम्हाला कुठलीच सीमा नाही,
कुठलंच दु:ख नाही, कसलीच वेदना नाही
मग तुम्ही दीनवाणे दरिद्री असणार नाही.
मग तुम्ही असाल समृद्ध-संपन्न, सम्राट.
परमेश्वराची सगळी रूपं तुमचीच आहेत.
म्हणूनच तुम्ही 'तुम्ही' नाही;
तुम्ही परमेश्वर आहात!




**१५०रु.**
पोस्टेज २५रु.

नवे कोरे

# द पार्लमेन्टरी सिस्टिम




**अरुण शौरी**

अनु. **अशोक पाथरकर**

**२२०रु. पोस्टेज २५रु.**

इंटरनॅशनल प्रेस इन्स्टिट्यूटने 'ज्यांच्या कृतीमुळे स्वातंत्र्याचे रक्षण झाले अशा 'वर्ल्ड प्रेस फ्रीडम हिरोज'पैकी एक' म्हणून गौरवले आहे.


'बिझिनेस वीक'ने 'स्टार ऑफ एशिया' म्हणून; 'दि इकॉनॉमिक टाइम्स' ने खाजगीकरणावरील कामामुळे 'बिझिनेस लीडर ऑफ दि इयर' म्हणून गौरवले आहे.

भारतीय कंपन्यांच्या प्रमुखांनी 'श्री अटल बिहारी वाजपेयी सरकारमधील सर्वांत उल्लेखनीय मंत्री' म्हणून गौरवले आहे. मॅगसेसे अवॉर्ड, दादाभाई नौरोजी अवॉर्ड, ॲस्टर अवॉर्ड, इंटरनॅशनल एडिटर ऑफ दि इअर, पद्मभूषण या व अशा अनेक सन्मानांनी विभूषित, अरूण शौरी हे भारतातील अतिशय प्रसिद्ध असे वर्तमान आणि राजकीय घडामोडींवरील भाष्यकार आहेत.

राष्ट्रीय लोकशाही आघाडी मंत्रिमंडळात त्यांनी दळणवळण, माहिती-तंत्रज्ञान व निर्गुंतवणूक अशी अनेक महत्त्वाची खाती सांभाळली.

हे त्यांचे एकविसावे पुस्तक.

नवे कोरे




# जन्मठेप

गिरिजा कीर

**१५०रु. पोस्टेज २५रु.**

पैशामागे लागलेले आई-वडील मुलांना आदर्श वाटत नाहीत. शरीर ही प्रदर्शनाची वस्तू समजून तिची किंमत वसूल करणाऱ्या मुली मानसिक प्रदूषणाला कारणीभूत आहेत.
उत्तान दृश्यं तरुण मनाला चाळवतात.
सत्तेसाठी चालणारी साठमारी पाहिली की प्रश्न पडतो,
नव्या पिढीपुढे आज कोणती श्रद्धास्थानं आहेत?
ज्यांचा सूर्य मावळला आहे तेच आज प्रकाशाचा शोध घेताहेत;
स्वतःची दिवली घेऊन मार्ग काढताहेत.
शिक्षा भोगत असणाऱ्या कैद्यांकडून समाज काय अपेक्षा करतो?
शिक्षा भोगून तावूनसुलाखून निघालेले हे
तरुण मनातल्या श्रद्धांना झळ पोचू देत नाहीत.
त्यांना चांगलं व्हायचं असतं.
त्यासाठी आपण आपला आश्वासक
हात पुढे केला पाहिजे.

**नवे कोरे**




# चार जबरदस्त फंडे

**संजीव परळीकर**

**७०रु. पोस्टेज २०रु.**

फंडेबाजी कोणालाही आवडत नाही.
पण ही फंडेबाजी तुम्हाला निश्चितपणे आवडेल.
ही जरा वेगळी आहे.
हे चार फंडे तुमचं आयुष्य समृद्ध बनवतील, मजेदार बनवतील.
रोजचं जगणं अतिशय सोपं आणि तणावरहित असेल.
प्रत्येक फंडा वाचताना तुमच्या जीवनातलं ओझं कमी
झाल्यासारखं तुम्हाला वाटेल
आणि जेव्हा चौथा फंडा वाचून होईल तेव्हा तर
तुम्हाला एकदम हलकं हलकं वाटेल.
आपलं वजन शून्य झालेलं आहे असं वाटेल.
संपूर्ण पुस्तक व्यावहारिक जीवनावर,
प्रत्यक्ष अनुभवांवर आधारलेलं आहे.
तुम्हाला ते नुसतेच आवडणार नाही, तर तुमचे परिवर्तन करील.

# २०१० प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| | **कादंबरी** | |
| **प्रस्थान** | रेखा बैजल | १५०/- |
| **द ॲटर्नी :** स्टीव्ह मार्टिनी | अनु. अजित ठाकूर | ३५०/- |
| **क्रायसिस :** रॉबिन कुक | अनु.डॉ. प्रमोद जोगळेकर | ३५०/- |
| **जॅपनीज ऑर्किड :** रेई किमुरा | अनु. स्नेहल जोशी | २००/- |
| **शांताराम :** ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्स | अनु. अपर्णा वेलणकर | ९९०/- |
| **द फकीर :** रुझबेह एन. भरूचा | अनु. सुनीति काणे | १८०/- |
| **वन शॉट :** ली चाइल्ड | अनु. बाळ भागवत | ३४०/- |
| **गर्ल्स ऑफ रियाध :** रजा अल्सानिया | अनु. स्नेहल जोशी | २६०/- |
| **द फर्म :** जॉन ग्रिशॅम | अनु. अनिल काळे | ४४०/- |
| **जिना : हिंदुस्थान-फाळणी-स्वातंत्र्य** जसवंत सिंग | अनु. अशोक पाध्ये | ५००/- |
| **नेक्स्ट :** मायकेल क्रायटन | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ४००/- |
| **अरुणाची गोष्ट :** पिंकी विराणी | अनु. मीना कर्णिक | १८०/- |
| **द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजमाज्** : जॉन बायेन | अनु. मुक्ता देशपांडे | १२०/- |
| **पिरॅमिड :** टॉम मार्टिन | अनु. उदय भिडे | ३००/- |
| **उद्ध्वस्त** | उमेश कदम | १५०/- |
| | **कथासंग्रह** | |
| **कुरुक्षेत्रानंतर :** महाश्वेतादेवी | अनु. वर्षा काळे | ६०/- |
| **भेटीगाठी** | शंकर पाटील | ११०/- |
| **खुश खरेदी** | शंकर पाटील | १००/- |
| **श्रीगणेशा** | शंकर पाटील | १२०/- |
| **गारवेल** | शंकर पाटील | १३०/- |
| **नष्टनीड :** रवींद्रनाथ टागोर | अनु. नीलिमा भावे | १४०/- |
| **तरुणांनो होशियार!** | निरंजन घाटे | १००/- |
| **ज्याचं करावं भलं...** | निरंजन घाटे | १००/- |
| **रोबॉट फिक्सिंग** | निरंजन घाटे | १३०/- |

## आत्मकथन

| | | |
|---|---|---|
| **कॅच मी इफ यू कॅन :** फ्रँक अबॅग्नेल/स्टॅन रेडिंग | अनु. ज्योत्स्ना लेले | २००/- |
| **मॅन, इंटरप्टेड :** जेम्स बेली | अनु. विदुला टोकेकर | १८०/- |
| **सर्कल ऑफ लाइट :** किरणजीत अहलुवालिया, राहिला गुप्ता | अनु. उषा महाजन | ३५०/- |
| **द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स :** सोमाली माम | अनु. भारती पांडे | १६०/- |
| **स्लमगर्ल ड्रीमिंग :** रुबिना अली | अनु. मैत्रेयी जोशी | १२०/- |
| **मना सर्जना** | डॉ. अनिल गांधी | २००/- |
| **उधाण वारा :** तसलिमा नासरिन | अनु. विलास गीते | ४००/- |
| **गो किस द वर्ल्ड :** सुब्रतो बागची | अनु. सुनीति काणे | १५०/- |
| **पानगळीच्या आठवणी** | शोभा चित्रे | २००/- |

## व्यक्तिचरित्रे

| | | |
|---|---|---|
| **थेंबभर पाणी अनंत आकाश :** | सुरेखा शहा | २८०/- |
| **रुसी मोदी : द मॅन हू ऑल्सो मेड स्टील** पार्थ मुखर्जी, ज्योती सबरवाल | अनु. अंजनी नरवणे | २००/- |

## राजकीय

| | | |
|---|---|---|
| **द पार्लमेन्टरी सिस्टिम :** अरुण शौरी | अनु. अशोक पाथरकर | २२०/- |

## मार्गदर्शनपर

| | | |
|---|---|---|
| **चार जबरदस्त फंडे** | संजीव परळीकर | ७०/- |

## ललित लेख

| | | |
|---|---|---|
| **जन्मठेप** | गिरिजा कीर | १५०/- |

## सत्यकथा

| | | |
|---|---|---|
| **कोल्ड स्टील :** टीम बुके, बायरॉन उसी | अनु. सुभाष जोशी | ३००/- |

## संकलित प्रवचने

| | | |
|---|---|---|
| **मीरेच्या प्रेमतीर्थावर :** ओशो | अनु. स्वाती चांदोरकर | १५०/- |
| **मीरा एक वसंत आहे :** ओशो | अनु. स्वाती चांदोरकर | १५०/- |

## संकलित व्याख्याने

**अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड :** अनु. चित्रा वाळिंबे २५०/-
एन.आर. नारायण मूर्ती

## पाकशास्त्र

**केक्स** अपर्णा परचुरे १५०/-

## चिकन सूप मालिका

**चिकन सूप फॉर द कपल्स सोल :** अनु. अवंती महाजन १६०/-
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन,
मार्क ॲण्ड क्रिसी डोनेली आणि बार्बरा डी एन्जेलिस

**चिकन सूप फॉर द सिस्टर्स सोल :** अनु. सुनीति काणे १६०/-
: जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन,
पॅटी आणि नॅन्सी मिचेल, हेदर आणि केटी मॅकनमारा

## चला जाणून घेऊ या! मालिका

| | | |
|---|---|---|
| **प्रार्थना** : जे.पी.वासवानी संकलन डॉ.प्रभा संपत, कृष्णा कुमारी | अनु. अपर्णा देशपांडे | ४०/- |
| **उच्च रक्तदाब :** डॉ. सावित्री रामय्या | अनु. डॉ. मुग्धा गोखले | ४०/- |
| **हार्ट अटॅक :** डॉ. सावित्री रामय्या | अनु. ज्योतिका चितळे | ५०/- |
| **पोषक आहार :** डॉ. सावित्री रामय्या | अनु. स्वाती शहा | ४०/- |
| **स्वयंप्रेरणा :** विकास मलकानी | अनु. मीना टाकळकर | ५०/- |
| **आयुर्वेदाद्वारे आहार आणि आरोग्य** वैद्य सुरेश चतुर्वेदी | अनु. ज्योतिका चितळे | ५०/- |
| **बद्धकोष्ठता :** डॉ. सावित्री रामय्या | अनु. डॉ. मुग्धा गोखले | ४०/- |
| **रिलॅक्सेशन :** विकास मलकानी | अनु. मीना टाकळकर | ५०/- |
| **शाकाहार :** आर. एन. लखोटिया | अनु. स्वाती शहा | ४०/- |

## नाटक

**कथा अकलेच्या कांद्याची** शंकर पाटील ७०/-

## आरोग्य-माहितीपर

**उष्ण जलोपचार :**
डॉ. पॅट्रिक होरे / डेव्हिड हार्प अनु. सुभाष जोशी १२०/-

## वैज्ञानिक लेख

**विज्ञानातील सरस आणि सुरस** राहुल गोखले १८०/-

**स्वप्नचौर्य** निरंजन घाटे १२०/-

# वाचनालयांना आवाहन

आज वेगवेगळ्या प्रकारची माहिती मिळवण्याचे विविधमार्ग उपलब्ध झालेले आहेत. इंटरनेटच्या प्रसाराने हवी ती माहिती तयार मिळण्याचा 'रेडिमेड' मार्गही खुला आहे. त्यामुळे माहिती म्हणजेच ज्ञान व हे ज्ञान हवे तेव्हा मिळवता येते असा गैरसमज सर्वत्र प्रत्ययास येतो.

परंतु मानवी जीवन, मन, प्रगल्भ, आनंदी व विचारी होण्यासाठी वाचनाला आजही कोणताही पर्याय नाही. वाचनाने मानवी मनाची, बुद्धीची मशागत होते व व्यक्ती अधिक सृजनशील, क्रियाशील बनते. वाचनाचा सार्वत्रिक प्रसार झाला तर सारा समाजच प्रगत बनेल.

यासाठी आज वाचनसंस्कृतीची वाढ करण्याची नितांत आवश्यकता आहे. या कार्यात वाचनालयांनी फार मोठे योगदान देण्याची गरज आहे. वाचन संस्कृतीची वाढ होण्यासाठी वाचनालयातून उत्तम दर्जेदार पुस्तके वाचकांना उपलब्ध झाली पाहिजेत- अशी पुस्तके कित्येक वाचनलयांतून आज उपलब्ध होत नाहीत.


जादा कमिशन मिळते म्हणून दर्जाहीन, पुस्तके वाचनालयांकडून खरेदी केली जातात आणि अशी पुस्तकेच गावोगावीच्या वाचकांना दिली जातात.

मनोरंजनाच्या भुलभुलैय्यात अडकलेल्या आजच्या युवापिढीला योग्य मार्गदर्शन करणाऱ्या व मनाला प्रगल्भ बनवणाऱ्या पुस्तकांचा प्रसार अधिकाधिक होणे गरजेचे आहे. यासाठीच सर्व वाचनालयांना आम्ही आवाहन करीत आहोत, फक्त उत्तमच पुस्तके घ्या आणि समाजाच्या बौद्धिक विकासाचे पाईक बना, काही ज्येष्ठ नामवंतांनी नावाजलेल्या दर्जेदार पुस्तकांची माहिती आम्ही सादर करीत आहोत. प्रत्येक वाचनालयात ही पुस्तके असलीच पाहिजेत, असे आम्हाला वाटते. वाचनालयांनी ही पुस्तके घ्यावीत व आपले वाचनालय समृद्ध करावे ही अपेक्षा.

# पुस्तक परिचय

**बलात्कारानंतर कोमात गेलेल्या आणि
कधीच शुद्धीवर न आलेल्या
अरुणाची सुन्न करणारी कहाणी**

# अरुणाची गोष्ट




**पिंकी विराणी** अनु. मीना कर्णिक

'अरुणाची गोष्ट' ही एक सुन्न करणारी अनुभूती आहे. ही गोष्ट वाचताना आणि वाचून झाल्यावर आपल्या आयुष्यात असे काही घडले तर... या विचाराने पायाखालची भूमीच गायब झाल्याची भावना सतावू लागेल.

एखाद्या व्यक्तीच्या एका अतिरेकी कृतीने अवघे आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते, जवळची माणसे दूर जातात, भल्याभल्यांची सहानुभूती आटून जाते. कायदेकानून निष्प्रभ ठरतात. माणुसकीचे बरे आणि वाईट, संवेदनशील आणि संवेदनाशून्य असेही नमुने एकाच वेळी समोर येतात. दोष कोणाला द्यायचा, हेही कळेनासे होते.

'अरुणाची गोष्ट'मध्ये भेटते ती केईएम हॉस्पिटलमधली एक उत्साही, चैतन्यशील परिचारिका अरुणा शानबाग. ऐन पंचविशीतली. आकर्षक. डॉ. संदीप सरदेसाई तिच्यावर लुब्ध. लग्नाची तयारी सुरू. आणि या अरुणा शानबागवर सोहनलाल नावाचा हॉस्पिटलमध्ये टेंपररी काम करणारा एक सफाई कामगार एके संध्याकाळी तळघरातल्या डॉग वॉर्डमध्ये बलात्कार करतो. ती प्रतिकार करते. तिला लोखंडी साखळीचा फटका बसतो. ती बेशुद्ध होते. डोक्यातून रक्तस्राव होतो. सोहनलाल तिची सोन्याची माळही पळवतो. तिचा गळा साखळीने आवळतो.

दुसऱ्या दिवशी सकाळी ती तेथेच बेशुद्धावस्थेत सापडते.

ओळख पटते. उपचार सुरू होतात. तिच्या घरच्या लोकांना निरोप जातो. डॉ. संदीपच्याही कानावर ही बातमी जाते. अरुणा केईएममधील परिचारिका. त्यामुळे तेथील सर्व परिचारिका, सर्व डॉक्टर्स, तिच्या तैनातीत... जराशीही कसूर नाही.

पण पेशंट अरुणा कोमात जाते.

दिनांक २७ नोव्हेंबर १९७३ रोजी रात्री ही घटना घडते... त्यानंतर ती खऱ्या अर्थाने कधीच शुद्धीवर येत नाही.

तिची भावंडे मुंबईत असतात; पण तिची जबाबदारी घेण्याची त्यांची तयारी किंवा कुवत नसते. त्यामुळे तिला हॉस्पिटलमध्येच राहणे भाग पडते. तिला डिस्चार्ज देण्याची वेळ येते. वैद्यकीय उपचारांची तिला पुढे गरज नसते. त्यामुळे हॉस्पिटलमधले बेड तिच्यासाठी अडवून ठेवण्यात हशील नसते. डीन डॉ. देशपांडे तिच्या बहिणीला बोलावून घेतात, पण बहीण म्हणते, ''माझी खोली खूप लहान आहे. एवढ्याशा खोलीत तिला कुठे ठेवणार? तिला खायला कसं घालणार? आम्ही गरीब लोक आहोत.'' अरुणाचा भाऊ शिमोगा येथे हॉटेल चालवत असतो. त्यालाही डीन बोलावून घेतात. अरुणाला शिमोगा येथे नेऊ शकत नाही, असे तोही सांगतो. ''तुम्ही सगळ्या पेपर्सवर सही केल्यावर तुम्हाला कॉंपेनसेशनही मिळेल'' असे डॉक्टर म्हणतात. पण तो म्हणतो, ''येथे कॉंपेनसेशनचा प्रश्न येतोच कुठे? मी शिमोग्याला हॉटेल चालवतो आहे, पण माझे बस्तान अजून बसलेले नाही. मी

तेथे स्थायिक होईन की नाही, हे मलाच ठाऊक नाही. तेव्हा मी तिला कसे नेणार?''

सेशन्स कोर्टात सोहनलालवरील खटला १० एप्रिल १९७४ रोजी दाखल होतो. ७ ऑगस्टला सुनावणी सुरू होते. ३८ लोकांच्या साक्षी होतात. त्याला कलम ३०७ व ३९७ खाली दोषी ठरवून ७ वर्षांची शिक्षा होते. विनयभंग वा बलात्काराचा गुन्हा म्हणून नोंद झालेली नसते; त्यामुळे शिक्षा कमी होते.

मुंबई महापालिकेचे कमिशनर अरुणा शानबागबाबात वैद्यकीय अहवाल मागवतात. (३० सप्टेंबर १९७६)

डॉ. नागपाल, सहायक न्यूरो-सर्जन उत्तर पाठवतात, ''मिस शानबागमध्ये कोणतीही सुधारणा नाही. ती सर्वस्वी परावलंबी आहे. तिला खाऊ घालावं लागतं. अंघोळ, स्वच्छता, कपडे बदलणे याही गोष्टी कराव्या लागतात. तिला समजत नाही, ती चालू किंवा बोलू शकत नाही. तिच्यामध्ये यापुढच्या काळात सुधारणा होण्याची कोणतीही शक्यता नाही. तिला डोळ्यांनी दिसत नाही. पण ती कधी कधी हसते.''

त्यावर महापालिकेचे पत्र येते.

''एका पेशंटने एवढा मोठा काळ एक प्रायव्हेट खोली अडकवून ठेवणे योग्य नाही. तिला शुश्रूषागृहात हलवावे'' असा आदेश डीनना फोनवरून देण्यात येतो. (२ जानेवारी १९७७)

तिला हलवायचे ठरल्यावर नर्सेस संपावर गेल्या होत्या, तेव्हा त्या प्रकाराची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून डीन मेट्रनशी आधी याबद्दल चर्चा करतात.

तिला उपनगरातल्या शुश्रूषागृहात हलवण्यात येते.

पण तेथे तिची शुश्रूषा नीट होत नाही. डोक्यात उवा होतात. बेड सोअर्स होतात. रक्ताळलेल्या अवस्थेत ती विव्हळते. तिचे शरीर सडत जाते.

केईएममधल्या तिच्या परिचारिका मैत्रिणी तिला भेटायला जातात. त्यांना अरुणाची अवस्था पाहून धक्का बसतो. मुंबईच्या समाजसेवकांकडून राजकीय नेत्यांशी संपर्क साधला जातो. वृत्तपत्रांतून बातम्या येतात. लोक डीनना व पालिकेच्या आयुक्तांना निषेधाचे फोन करतात. पालिकेला झुकावे लागते. अरुणा शानबागचे निधन अशा अवस्थेत झाले तर महापालिकेने तिचा अगदी थंडपणाने खून व्हावा अशी काळजी घेतल्याची टीका माध्यमे करतील, असे दडपण आयुक्तांना त्रासदायक वाटले असावे. तेव्हा १० मार्च १९७७ रोजी अरुणाला पुन्हा केईएमच्या वॉर्ड नं. ४च्या बाजूला असलेल्या खोलीत हलवण्यात येते. तिला घासून-पुसून स्वच्छ केले जाते. औषधे दिली जातात. उवांमुळे तिचे केस संपूर्ण कापले जातात. फुलडाएट हाय प्रोटिन आहार सुरू होतो. ती ओरडते, किंचाळते, रडते, हसते.

तिचा मेंदू पूर्णपणे मृत नसतो. त्यामुळे तिच्यावर उपचार थांबवण्यात येत नाहीत. मेंदूवरची एखादी नवी उपचारपद्धती ऐकली की केईएममधील न्यूरो-सर्जन अरुणावर त्या पद्धतीचा प्रयोग करायला तयार असतात. स्वीडिश डॉक्टर्स अरुणाला सेन्सर्स आणि प्रोब्सनी (सुईसारखी उपकरणे) सौम्य शॉक्स देऊन तिचा मेंदू उत्तेजित करावा, असा सल्ला देतात. परंतु ''अरुणा म्हणजे प्रयोग करायला प्रयोगशाळेतील माकड नाही,'' असे म्हणून परिचारिका या कल्पनेला विरोध करतात.

२० मार्च १९८० रोजी अरुणा जमिनीवर पडलेल्या अवस्थेत सिस्टर प्रेमा पै यांना दिसते. ती बेशुद्धावस्थेत असते. तिच्या जिभेवर चावल्याच्या खुणा असतात... त्या वेळी सिस्टर प्रेमा पै यांच्या मनात शंकेची पाल चुकचुकते. अरुणावर बलात्कार करणारा सोहनलाल तुरुंगातून बाहेर पडला असावा. तिच्या अंतर्मनात कुठेतरी त्याचा पडसाद उमटलेला असावा किंवा तो हॉस्पिटलमध्ये खरोखरच तिला बघायला आला असावा... नाना शंका... कोणीतरी त्याला म्हणे रस्त्यावर बघितले. केईएममध्ये चर्चेला उधाण येते. पोलिस चौकीवर तक्रार करण्यात येते. एक बदली कामगार सांगतो की, अरुणाच्या खोलीच्या उघड्या खिडकीतून कोणीतरी माणूस आत डोकावत होता. त्याने हटकल्यावर तो पळून गेला. सोहनलाल कसा दिसतो, हे कोणालाच ठाऊक नव्हते. तेव्हा अरुणाच्या खोलीच्या खिडकीला मोठे बार लावले जातात. खोलीला कुलूप लावण्याची व्यवस्था मेट्रन करतात.

अशा तऱ्हेने अरुणा जगत राहते.

२० नोव्हेंबर १९८० रोजी या घटनेला सात वर्षे होतात.

या सात वर्षांच्या अवधीत अरुणाच्या आईचा मृत्यू होतो. सहापैकी तीन भाऊही मरण पावतात. हळदीपूर या अरुणाच्या मूळ गावात तिच्या दोन्ही भावांना लोक मेंटल म्हणत. वार्षिक जत्रेत एक भाऊ टेम्पोचा धक्का लागून मरण पावला. दुसरा भाऊ घरातच आजारी पडला. गेला. तिसरा भाऊ सदानंद कॅन्सरने गेला.

५ डिसेंबर १९८३ रोजी 'चित्रलेखा' या गुजराती साप्ताहिकाचे संपादक हरकिशन मेहता अरुणावर आधारित 'जड चेतन' या कादंबरीचे पहिले प्रकरण प्रसिद्ध करतात. बलात्कार झाल्यावर कोमात गेलेल्या एका तरुण नायिकेची कहाणी या कादंबरीत असते. हरकिशन मेहता केईएमच्या तत्कालीन मेट्रन दुर्गा मेहता यांना भेटून बरीच माहिती मिळवतात. हरकिशन मेहता आपल्या नायिकेला तुलसी हे नाव देतात. जड चेतन ही कादंबरी वाचकांना खूप आवडते. वाचकांच्या पत्रांचा वर्षाव सुरू होतो. मात्र कादंबरीत तुलसी कोमातून बाहेर येऊन सहीसलामत बरी होते, आपल्या डॉक्टर प्रियकराला ओळखते. दोघे एकमेकांचे हात धरून सूर्यास्ताच्या दिशेने चालू लागतात, असे शेवटी मेहता दाखवतात.

''तुलसी कोमातून बाहेर आली की आम्ही मिठाई वाटू, असा नवस केला होता'' असे अनेक वाचक कळवतात आणि चित्रलेखाकडे मिठाईचे बॉक्स पाठवतात.

सिस्टर ख्रिस्तिन गोम्स केईएममधल्या नवप्रशिक्षित नर्सेसच्या बॅचमध्ये असते.

अरुणाच्या केसबद्दल ती इतर परिचारिकांशी बोलते. अरुणा चौदा वर्षे कोमात आहे, पण तिला मृत्यू येत नाही. तिला असा इतक्यात मृत्यू यायचाही नाही. तिच्यावर बलात्कार करणाऱ्याला देव योग्य शिक्षा देत नाही तोवर तिचा आत्मा तिला मरू देणार नाही. देवाला लाजवण्याचा तिच्या आत्म्याचा हा मार्ग आहे... कदाचित भारतीय बायकांना, इथल्या नर्सेसना देव काहीतरी संदेश देऊ पाहतो आहे असे सिस्टर म्हणते.

१ जून १९९७ रोजी अरुणाचा ४९ वा वाढदिवस असतो.

तिला अंघोळ घालण्यात येते. तिची त्वचा आता चरचरीत झालेली आहे. हाडाच्या सापळ्यावर ताणून बसवल्यासारखी तिची त्वचा दिसते. बेड सोअर्स होण्याचीही शक्यता जास्त. सारखं या कुशीवरून त्या कुशीवर वळवावं लागतं...

पत्रकार पिंकी विराणी यांना टाइम्स ऑफ इंडियाकडून अरुणावर १४०० शब्दांचा लेख लिहिण्याबद्दल सांगण्यात येते.

या लेखामुळे एकच खळबळ माजते. केईएममध्ये फोन आणि पत्रे यांचा वर्षाव सुरू होतो. वेगवेगळ्या वृत्तपत्रांत, वेगवेगळ्या भाषांत त्या लेखावरून मजकूर येत राहतो आणि अरुणाची कहाणी जगभर पसरते. त्या बातमीवरून अरुणाच्या कहाणीवर एक स्वतंत्र पुस्तक तयार करावे, असे पिंकी विराणी यांना प्रकाशक सुचवतात. १९६६ पासूनच्या तिच्या वैयक्तिक जुन्या फायली केईएम हॉस्पिटलकडून उपलब्ध करून दिल्या जातात. तिचे नातलग, हॉस्पिटलमधील डॉक्टर्स, परिचारिका वगैरेंशी पिंकी संपर्क साधतात. तिच्या मूळ गावाला भेट देतात. त्यावरून त्या पुस्तकाचे लेखन तीन महिन्यांत पूर्ण करतात. या पुस्तकाचीही सर्वत्र दखल घेतली जाते. पुस्तक निघाले त्यावेळी अरुणाला कोमात जाऊन २५ वर्षे झालेली असतात; त्या २५ वर्षांतील केईएममधील बदललेले डॉक्टर्स, कर्मचारी, वातावरण यांचाही पिंकी विराणी मागोवा घेतात. पहिल्या प्रकरणात बलात्काराची घटना आणि हॉस्पिटलमधील तिच्यावरचे उपचार यांचे तपशील येतात. दुसऱ्या प्रकरणात अरुणाचे बालपण, तिचे मुंबईला येऊन परिचारिका होण्याचे स्वप्न, तिच्या मित्रमैत्रिणी, तिच्या आकांक्षा, तिचे प्रेमप्रकरण, नव्या घराबद्दलच्या अपेक्षा वगैरे तपशील येतात. तिसऱ्या प्रकरणात तिच्यावरचे पुढचे उपचार, तिच्या ट्रीटमेंटमधील अडचणी, तिचे कोमातले हसणे-रडणे-किंचाळणे, संगीताला तिच्याकडून मिळणारा प्रतिसाद, न्यूरो-सर्जरीमधील बदलते उपचार, याबद्दल सविस्तर माहिती मिळते. तिला दयामरण देता यावे, या

कल्पनेचाही ऊहापोह येतो. तिच्या नातलगांची संमती असेल तरच त्याबाबत पुढे काही हालचाल शक्य असते. ती संमती नसल्याने पुढे काही करता येत नाही.

केईएम हे भारतातील एक अग्रगण्य हॉस्पिटल. १९९७ मध्ये त्याचे वार्षिक अंदाजपत्रक ४० कोटींचे होते. १८०० बेडपैकी १७५० बेड्स पूर्ण मोफत. १६ लाखांवर रुग्ण ओपीडीमध्ये येतात. साठ हजार शस्त्रक्रिया दर वर्षी होतात. ६३० स्टाफ नर्सेस, ५०० निवासी डॉक्टर्स, ३७० ज्येष्ठ डॉक्टर्स. सगळे वॉर्ड कायम खचाखच भरलेले.

या अवाढव्य रुग्णालयात स्टाफ नर्स अरुणा शानबाग 'तेरा नंबरवाली' भिंतीवरच्या एका बिंदूकडे टक लावून बघताना दिसते. खरे तर तिला काही दिसत नाही. तिचे आखूड कापलेले केस, पिकलेले केस एका बाजूला पसरलेले असतात. सकाळी दिलेला चहा आणि पाव तोंडात एका कडेने ओघळून चॉकलेटी रंगाच्या उलटीच्या रूपात उशीवर सांडून वाळलेला असतो. एका भिंतीवर दाट केसांच्या सुरेख मुलीचा फोटो लटकत असतो. देवदेवतांच्या तसबिरी असतात. बाजूला नॅशनल हायवेवरून व्हिडिओ कोच वेगाने धावत असतात. प्रचंड धूळ उडवत त्या जात असतात.

या अरुणाची ही कहाणी. ती चटका लावते. आपल्या असहायतेची जाणीव करून देते. तिच्या वाट्याला असे कोमातले दीर्घकालीन निष्प्रभ जगणे का यावे?

अरुणाच्या या कथेचे मराठी भाषांतर मीना कर्णिक यांनी १९८८ मध्ये केले. ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. त्याची ही नवी आवृत्ती मेहता पब्लिशिंग हाऊसने यंदा प्रसिद्ध केली आहे. मीना कर्णिक यांनी अत्यंत साक्षेपाने वैद्यकीय आणि इतर तपशील मराठीत आणले आहेत. त्यामुळे हे पुस्तक मूळ मराठीतच लिहिले गेले असावे इतके स्वाभाविक, सहज वाटते. बरेच दिवस दुर्मिळ असणारे हे पुस्तक एखाद्या नव्या पुस्तकाप्रमाणेच वाचकांच्या नव्या पिढीला अस्वस्थ करणारे वाटेल.

**किंमत : १८०रु.    सभासदांना : सवलतीत    पोस्टेज : २५रु.**

**'मेहता पब्लिशिंग हाऊस'**च्या नवीन पुस्तकांची माहिती, नवनवीन योजना आणि ताज्या घडामोडी कळविण्यासाठी आपला E-mail ID आमच्याकडे हवाच!


**Email : info@mehtapublishinghouse.com**

आपले E-mail ID 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वरील E-mail **ID** वर कळवा.

# पुस्तक परिचय

**ओशोंनी उलगडून दाखविलेले**
**संत मीराच्या श्रीकृष्णप्रीतीचे अनोखे स्वरूप**

# मीरा एक वसंत आहे




**ओशो** अनु. स्वाती चांदोरकर

ओशोंनी मीराबाईंच्या पदांवर, व्यक्तिमत्त्वावर आणि कृष्णप्रेमावर दिलेल्या प्रवचनांवर आधारित बरीच पुस्तके निघाली आहेत.

ओशो दररोज सकाळी आपल्या आश्रमात एकेक प्रवचन देत. एखादा विषय घेऊन दहा-वीस-तीस दिवस सलग त्यावरच चिंतन मांडत. त्या प्रवचनांचे ध्वनिमुद्रण केले जाई. त्यावरून नंतर पुस्तके निघत. ऑडिओ कॅसेट्स निघत. व्हिडिओचे तंत्र प्रचलित झाल्यावर व्हिडिओही निघत. पस्तीस वर्षांच्या अवधीत त्यांनी दिलेल्या या विविध विषयांवरील प्रवचनमालिकांवरून सातशेवर पुस्तकांची निर्मिती झाली आहे. ध्यानयोग, भगवान बुद्ध, महावीर जैन, येशू ख्रिस्त, ज्यू गूढवादी संत, ताओ धर्म, चिनी तत्त्वज्ञ, पाश्चात्त्य तत्त्वज्ञ, सूफी संत, झेन तत्त्वज्ञ, उपनिषदे, गीता, तंत्रशास्त्र, योगशास्त्र, मंत्रशास्त्र, संत मीरा अशा अनेक विषयांवर ओशोंनी अत्यंत प्रासादिक आणि अंतर्भेदक विवेचन केलेले आहे. इतक्या विविध पाश्चात्त्य आणि पौर्वात्य तत्त्वज्ञानशाखांचा व्यासंग असणारा दुसरा कोणी अभ्यासक, जाणकार सापडणे दुर्मिळच! त्यांच्या या प्रवचनांचे, पुस्तकांचे अनेक भाषांमध्ये अनुवाद झालेले आहेत आणि जगभरातून त्यांच्या आश्रमाला भेट देण्यासाठी जिज्ञासू व्यक्ती आजही येत आहेत. ओशोंच्या पुण्यातील आश्रमात अनेक प्रकारचे ध्यानाचे कोर्सेस सुरू असतात आणि त्याद्वारे ताणविरहित आनंदी आयुष्य अधिक चांगल्या पद्धतीने जगण्याचे, पूर्ण जाणिवेचे तंत्र वापरून स्वत:ला जाणण्याचे, आत्मशोधाचे मार्ग उलगडून दाखवले जातात. त्यासाठी 'ओशो मल्टिव्हर्सिटी'ची स्थापना करण्यात आली आहे. ध्यानधारणेच्या अनेकविध पद्धतींतून आपल्या सोई-स्वभावानुसार योग्य अशा पद्धतीचा अवलंब करून, शांत बसण्यापासून नृत्यापर्यंत निरनिराळ्या मार्गांनी आंतरिक शांतता अनुभवण्याची क्षमता विकसित केली जाते. ''शरीर आणि मन यांच्यामध्ये साठलेल्या तणावाचा निचरा करून विचाररहित ध्यानाचा अनुभव ज्याला घेता येईल, अशा नव्या माणसाची निर्मिती ओशोंना अभिप्रेत आहे. या नव्या माणसाला ते 'झोर्बा द बुद्ध' असे संबोधतात. ''या माणसाचे पाय जमिनीवर घट्ट रोवलेले असून त्याचे हात ताऱ्यांना स्पर्श करण्याला समर्थ असतील'' असे ते मानतात... पौर्वात्य बुद्धी आणि पाश्चात्त्य विज्ञान-तंत्रज्ञान यांच्या परमोच्च शक्यतांचा संगम साधणारे ओशोंचे तत्त्वज्ञान त्यांच्या पृथ्वीवरील प्रवासाच्या सांगतेनंतरही अधिकाधिक चाहत्यांना आकृष्ट करीत आहे.

'मीरा एक वसंत आहे' या मराठी पुस्तकात 'मैंने रामरतन धन पायो' या हिंदी पुस्तकातील ६ ते १० या प्रकरणांचा अनुवाद समाविष्ट केला आहे.

या पुस्तकातील पाच प्रकरणांपैकी एक, तीन व पाच ही प्रकरणे प्रश्नोत्तरांच्या स्वरूपातील आहेत. त्यात विचारल्या गेलेल्या प्रश्नांचा मीराबाईच्या पदांशी किंवा जीवनाशी तसा प्रत्यक्ष संबंध आहे, असे नाही.

दुसऱ्या प्रकरणात मैंने रामरतन धन पायो, मीरा के प्रभु गिरधर नागर वर पायो

छे पूरो मेरा मन रामहि राम रटै रे, रामनाप जप ली जै प्रानी कोटिक पाप कटै रे या पदांच्या अनुषंगाने नामस्मरणाचे, सद्गुरू कृपेचे आणि रामनामाच्या धनप्राप्तीने तनामनातले अंतर संपून आलेल्या अखंडत्वाच्या अनुभवाचे विवेचन आले आहे.

रामनाम रस पी पीजै मनुजा, दरस बिन दूखन लागे नैन। मीरा के प्रभु कब मिलोगे दुखमेटन सुखरैन या पदांच्या अनुषंगाने मीराबाईच्या प्रभुदर्शनाच्या तळमळीचे स्वरूप चौथ्या प्रकरणात स्पष्ट करण्यात आले आहे.

ही प्रवचने म्हणजे मीराच्या प्रेमसरोवरातील नौकाविहाराची संधी. मीराच्या प्रेमाचे हे सरोवर अद्‌भुत आहे. या सरोवराची निर्मिती मीराच्या अश्रूंनी झालेली आहे.

मीराच्या डोळ्यांतील एकेक अश्रू हे एकेक पद आहे आणि एकेक पद म्हणजे खंडकाव्य आहे. पण काव्याची परिभाषा, तर्कशास्त्राची कसोटी किंवा ज्ञानाची मूलतत्त्वे यांच्या निकषांवर तपासून बघून मीरा समजेलच, असे नाही. मीरा म्हणजे मूर्तिमंत भक्ती, मूर्तिमंत प्रेम.

ओशो म्हणतात, गिरधर गोपालपर्यंत पोचायला मीरा लोकलज्जा, कुळाचार, घरदार, मानमर्यादा– सर्व काही सोडून धावत निघाली; तद्वत् ज्ञानाचे सूत्र, तर्कशास्त्र, काव्याची परिभाषा हे सगळे आपण सोडून देत नाही तोवर मीरेपर्यंत पोचू शकत नाही. मीराने आपल्या अश्रूंचे सिंचन करून प्रेमाची वेल जोपासली आहे. असुवन जल सींच सींच प्रेम बलि बोई... मीराने आपल्या अश्रूंनी प्रेमाचे असंख्य रंग खुलवले. प्रेमाच्या मार्गावरून चालता-चालता ती इतकी दूरवर गेली की, तिला स्वत:च्या अस्तित्वाची जाणीवच उरली नाही. एरी मै तो दर्द दिवानी मेरा दरद न जाने कोय, असं तिचं अनाकलनीय दु:ख. ''ते फक्त रडवत नाही, ते गाणंही म्हणत. मंदिरात घंटा वाजवतं आणि सुळीवर प्रियकराबरोबर बिछानाही घालतं. मीरा दु:खामुळे घायाळ आहे, मस्तीपासून हस्ती (अस्तित्व) संपवण्यापर्यंत, असण्यापासून नसण्यापर्यंत तिचा जो प्रवास होतो; तो तिच्या पदांमधून प्रकट होतो,'' असे प्रास्ताविकात गोपालदास नीरज यांनी म्हटले आहे, ते अर्थपूर्ण आहे. मीराच्या पदांच्या आत्म्यापर्यंत पोचायचं, ही काही सोपी गोष्ट नाही. त्यापर्यंत पोचणारी एकमेव व्यक्ती म्हणजे ओशो, असे गोपालदास नीरज म्हणतात. मीराचं हे जे प्रेमाचं महाकाव्य आहे, त्याच्या गाभाऱ्यापर्यंत पोचायचं; 'यह प्यासोंको प्रेम नगर है' त्यात यथेच्छ डुंबायचं, तर ओशोंसारखा अन्य भाष्यकार, समानधर्मी अवलिया भेटणे मुश्कील.

ओशो मीराला तीर्थंकर मानतात. तिने संप्रदाय स्थापन केला नाही, शिष्यपरिवार तयार केला नाही, नवा रस्ता तयार केला नाही; तरीही ओशो तिला तीर्थंकराचा दर्जा देतात. कारण तिचीही एक पद्धत होती आणि तिच्या घाटावर सदासर्वदा संगीताचा वर्षाव होत असतो, तिथे अनाहताची तुतारी वाजत असते. ''पायल नहीं, घुंगरू नहीं, छम छम कैसे होने लगी, ढूंढो मुझे मैं खोने लगी, हुआ क्या मुझे उई तोबा मैं न

जानी, झूम उठी रे मैं मस्तानी दिवानी, जाने क्या पिलाया मुझे बड़ा मजा आया'' अशा आध्यात्मिक अनुभूतीची पराकोटी ती गाठते. (१८-१९) परमेश्वराच्या अस्तित्वात ती स्वत:ला झोकून देते, त्यात संपूर्णपणे हरवते. स्वत:चं अस्तित्व विसरते. स्व-अस्तित्वाचा असा विसर पडणे म्हणजे परमात्म्यापर्यंत पोचणे. जोपर्यंत आपल्याला आपल्या अस्तित्वाचे भान आहे, तोपर्यंत परमात्मा प्राप्त होणे असंभव.

''मैंने रामरतन धन पायो । वस्तु अमोलक दी मेरे सतगुरू करि किरपा अपनायो । जनम जनम की पुंजी पायी, जग में समय खोवायो, खरचै नहीं कोई चोर न लेवै दिन दिन बधत सवायो... मीरा के प्रभु गिरधर नागर हरखि हरखि जस गायो!'' हे मीराचे एक प्रसिद्ध पद आहे.

आपल्याला रामनामाच्या रत्नाची प्राप्ती झाली, या परम संपत्तीच्या प्राप्तीनंतर अन्य कशाची गरज नाही. हे रामरत्नाचे धन कोणी चोरून नेऊ शकत नाही, ते हरवू शकत नाही; उलट ते सतत वाढतच राहते. सद्गुरूची महान कृपा झाली आणि हे अमोल रत्न प्राप्त झाले. या रत्नाच्या प्राप्तीमुळे मीरा हर्षभरित होऊन सतत प्रभूचे गुण गात राहते.

सद्गुरूची महती ओशो जागोजागी विशद करतात. (५७)

''बौद्धिक थकवा आल्यानंतरच सद्गुरूचा हात पकडणे शक्य होते. मी करीन, मी स्वत: करू शकेन असे मानणारा, अहंकार प्रबळ असणारा माणूस सद्गुरूचा हात पकडण्याचे टाळतो.'' असे सांगून ओशो म्हणतात, ''एकदा का सद्गुरूचा वरदहस्त लाभला की मुक्कामाची, प्रवासाची सर्व चिंता सरते. गुरूच्या प्रेमाचं पहिलं पाऊल मुक्कामाचा शुभ संदेश देणारे असते. गुरूने तुमचा स्वीकार केला की, त्याच्या कृपेच्या वर्षावात चिंब होऊन जाता येते. सद्गुरू आपला नावाडी होऊन संसारसागरातून तारून नेतो.''

रामनामाचं स्मरण मनात अखंड सुरू. मेरी मन रामहि राम रटै रे. राम नाम जप लीजै प्रानी, कोटिक पाप कहे रै. एक रामाचं नाव घेतलं तर कोटी-कोटी पापं मिटतात. तनामनातलं अंतर संपुष्टात येतं. मीराला प्रत्यय येतो की, आता आपल्याला पूर्ण वर प्राप्त झाला आहे. मीरा के प्रभु गिरधर नागर वर पायो छै पूरो.'' (७१-७२)

चौथ्या प्रवचनात 'राम नाम रस पीजै मनुआं राम नाम रस पीजै' या पदावरचे भाष्य आहे.

ओशो येथे मीराला वसंत ऋतूची प्रतिमा देतात. वसंतात सगळी सृष्टी हिरवीगार होते. पानगळ थांबलेली असते. नवी पालवी झाडावर चमकू लागते. मीरा एक हिरवळ आहे. ही हिरवळ शीतलता देते. आनंद देते. (१११)

परमेश्वराने मीराला 'मस्त' मखमूर बनवले आहे. परमेश्वर लाखो लोकांना घडवतो. त्यांचं आयुष्य वाळवंटासारखं असतं, पण त्या लाखातला एखादा– त्याला

परमात्मा मस्तही बनवतो. त्या मस्त व्यक्तीमुळे जीवनात, संसारात थोडी हिरवळ येते. मीरा अशा दुर्मिळ मस्त लोकांपैकी एक आहे.

आपण सर्व जण बुद्धिमान आहोत. हुशार आहोत.

ओशो म्हणतात, तुमची बुद्धी हाच एक तुरुंग आहे, तुमची हुषारी हे तुमच्या पायातले लोढणे आहे; हे तुमच्या लक्षात येत नाही. हुशारीच्या बळावर आपण गळ्याभोवती फास लावला आहे. बुद्धिमत्तेच्या बळावर आपण सर्व काही साध्य करू शकू, असा अहंकार आपल्याला असतो. मला कुणाच्या आधाराची गरज नाही, मला परमात्म्याची गरज नाही, मला कुणा सद्गुरूची गरज नाही, असे या अहंकारामुळे माणसाला वाटते. परंतु येशू ख्रिस्त म्हणतो, ''जे लहान मुलांप्रमाणे असतात; तेच माझ्या राज्यात, प्रभूच्या राज्यात प्रवेश करू शकतात. जे भोळेभाबडे आहेत, साधे-सरळ आहेत, जे जगातल्या प्रत्येक गोष्टीकडे जिज्ञासेने, कुतूहलाने, आश्चर्याने बघू शकतात; तेच परमात्म्याचे दर्शन घेऊ शकतात. जसजसे तुम्ही बुद्धिमान होत जाता तसतसे आश्चर्य मरत जाते, मग तुम्हाला कोकिळेचा आवाजही हलवत नाही, झाडावर फुलणारं फूल आकर्षून घेत नाही. तुम्ही त्याचं केवळ नाव शोधून स्वस्थ होता. मुलांच्या डोळ्यांत आश्चर्य असते. आशा असते. अहंकार आला की हे निरागसपण दूर जाते. लहान मुलाला अहंकारच नसतो. त्याची आशा जागी असते. नैराश्याला तेथे प्रवेश नसतो. अहंकार धरलाच नाही, म्हणून हारही नाही, पराभवही नाही. जो जिंकायला जातो, तो हरणार असतो. हरतो म्हणून निराश होतो. उदास होतो. जीवनाबद्दलची उमेद, आस्था गमावून बसतो. जीवन हे शत्रू वाटते. जीवन मित्र नसेल तर क्रोध निर्माण होतो. हिंसा निर्माण होते. आपण नवनिर्मिती करू शकत नाही; तर सारे काही उद्ध्वस्त करण्यासाठी सिद्ध होतो. हिटलरप्रमाणे तो म्हणतो, माझा अहंकार काही बनवू शकत नाही, पण संपवू तर शकतो.'' (११४)

'मस्त' माणूस जिंकण्यासाठी वाटचाल करीतच नाही. तो म्हणतो, ''प्रभू, माझा पराजय कर. मला संपव.''

मखमूर, मस्त, पागल, वेडे, दिवाने लोक खूप अल्प असतात; पण तेच जीवनात तेज, हिरवळ, प्रफुल्लता आणतात. येशू ख्रिस्त म्हणतात, ''असे जे मस्त वेडे आहेत, तेच पृथ्वीवरचे मीठ आहे.'' (दीज आर दि सॉल्ट ऑफ दि अर्थ)

मस्तीचा अर्थ असतो आनंद.

आनंद हा स्वभाव हवा. दु:ख हा स्वभाव नको.

मीरा ही अशीच आपल्या गिरधर गोपालाच्या प्रेमात चूर होती. मस्तीत होती. तिची सर्व गीतं ही एका धुंदीतली गीतं आहेत. तिचे अश्रू हे आनंदाचे अश्रू आहेत. तिची तक्रार ही प्रेमाची तक्रार आहे. तिचं रुसणं हे प्रेमाचं रुसणं आहे. परमात्मा प्राप्त झाला, पण तो मिळाल्यामुळेच इतर कशात मन रमत नाही. त्याचा क्षणभराचाही

विरह, दुरावा सहन होत नाही. प्रेमाची इच्छा असते की, ज्याच्यावर प्रेम आहे त्याच्या सहवासात नित्य राहावे. तादात्म्य पावावे. पण हे प्रेम दु:खावर दु:ख, वेदनेवर वेदना देत राहते. दर्दपर दर्द गम पर गम देकर राज-ए-उल्फत सिखाये जाते है. (११९)

कृष्णाच्या प्रेमात मीरा पागल झाली आहे, पण ती 'राम नाम रस पीजै मनुआं राम नाम रस पीजै' असे म्हणते. रामरतन धन पायो' असे म्हणते. यात काही गफलत नाही का? यावर ओशो स्पष्टीकरण देतात. ज्यात रमाल, तोच राम! दशरथाचा पुत्र राम यात मीराला रस नाही. कृष्ण हा मीराचा राम आहे. प्रत्येकाला स्वत:चा राम शोधावा लागतो. राम म्हणजे परमात्म्याचे प्रतीक. मीराने दशरथपुत्र रामाची निवड केली असती, तर ती तुलसीदासासारखी झाली असती. कोरडी. राम चरित्रवान आहे; पण त्याच्यात रसधारा नाही. त्याचं चरित्र कोरं आहे. कोरडं आहे. मर्यादा पुरुषोत्तम राम वाळवंटासारखा आहे. कृष्ण उद्यानासारखा आहे. वाळवंटातही परमात्मा असतो. नाही असं नाही. पण ओशोंच्या मते, ''मीराने श्रीकृष्णाची निवड केली हे खूप छान केले, नाहीतर तिच्या सुंदर गीतांना आपण मुकलो असतो.'' (१३७)

तुलसीदासांबद्दल ओशोंचे मत प्रतिकूल दिसते. त्याला ते पंडित, पुरोहित, समाजप्रबोधनकार मानतात. तुलसीदास ही त्यांना पोचलेली व्यक्ती वाटत नाही. तुलसीदासमध्ये प्रेमाची झेप नाही. तरंग-तल्लीनता नाही. क्रांतीची ज्वाला नाही. वसंताची तरलता नाही. तुलसीदास पंडितासारखे लिहितात. ते सिद्ध नाहीत. बुद्ध नाहीत. (१३७)

तुलसीदासाकडे स्वत:ची नजर नाही. (१५२) ते जड परंपरेचे भक्त आहेत. (१५४)

परंपरेत फुलं फुलत नाहीत. फुलांना सतत परंपरेच्या विद्रोहातच फुलावे लागते. परंपरा सतत नव्या फुलांना नष्ट करण्याचा प्रयत्न करते. नव्या अभिव्यक्तींना विरोध करीत राहते. (१५४)

तुलसीदास परंपरेत प्राण घालण्याचा प्रयत्न करतात. ते ब्राह्मणवाद, पंडितवाद, पुरोहितवाद आणि हिंदू अहंकार यांचे परिपोषक आहेत. (१६२)

तुलसीदासावरून ओशो रामायण आणि रामकथा यांच्यावरही टीका करतात. रामायणाला धर्मग्रंथ का म्हणायचं, असा प्रश्न विचारतात. (१६२) रामासारखं होणं म्हणजे दशरथाच्या चुकीच्या मनोदशेला सहयोग देणे होय. रामाने बंड करायला हवे होते. विद्रोह करायला हवा होता. रामाची कथा रूढीगत आहेत. रघुकुलरीती पक्षपाती आहे. दशरथ बाप आहे म्हणून त्याची चुकीची आज्ञा पाळायची? सीतेने रामाबरोबर वनवासात जायचे– का? तर पतीची आज्ञा म्हणून? गरोदर सीतेला जंगलात पाठवून देणारा राम कसला मर्यादापुरुषोत्तम? सीतेला रावणाच्या तावडीतून सोडवून आणलं आणि अग्निपरीक्षा करायला लावली. एवढाही विश्वास सीतेवर रामाने दाखवू नये?

हे सर्व मूर्खपणाचे परिपोषण आहे. हे परिपोषण पंडित-पुरोहितांना व समाजाच्या ठेकेदारांना लाभदायक होते. तुलसीदास त्यांचा एजंट आहे. आपण त्याला संत मानत नाही, असे ओशोंचे प्रतिपादन आहे. (१६५)

प्रश्नोत्तरांच्या सत्रामध्ये अनेक महत्त्वाचे मुद्दे आलेले आहेत. ओशोंच्या मानसिकतेचे, विचारांचे त्यात स्पष्ट प्रतिबिंब दिसते. एक माणूस म्हणून इतरांशी समरस होण्याची, रिलेट होण्याची त्यांची वृत्ती समोर येते.

''स्मृती आणि स्वप्न यात मी कधी कधी तुमच्याजवळ पोचते; परंतु ह्या जन्मातल्या नवऱ्याच्या मेहेरबानीने मी अजून तुमच्यापर्यंत पोहोचू शकले नाही. तुमची प्रेमदिवाणी होण्यासाठी मी काय करू?'' असा प्रश्न वीणा या तरुणीने विचारला. तेव्हा ओशोंनी दिलेल्या उत्तरात त्यांच्या वृत्तीची झलक दिसते. ते म्हणाले, ''कालच वीणाने संन्यास घेतला. हा प्रश्न त्या आधीचा आहे. प्रेमदिवाणी होण्यासाठी काही करावं लागत नाही. नऊ वर्षे वीणा स्वप्न व स्मृती यातून माझ्याजवळ येत होती. तीच हा प्रवास करीत होती असे नाही; मीही करीत होतो. तू येशील तेव्हा तुला संन्यास द्यायचा, हे नक्की होतं. नशिबाने तुला चांगला नवरा मिळाला आहे. तो माझा प्रेमदिवाणा आहे. तुझ्यामार्फत त्यालाही संन्यासी बनवू. त्याचं तुझ्यावर प्रेम आहे. तुम्ही दोघांनी एकमेकांना साथ द्यावी. त्यामुळं तुमचं दोघांचं ध्यान वाढेल. नवऱ्याच्या मेहेरबानीनेच तू माझ्यापर्यंत आलीस. पुढेही जाशील. यात्रा मोठी आहे. प्रेम-दिवाणी होण्यासाठी काही करायची गरज नाही. तुझं प्रेम हृदयात कोंडून ठेवू नकोस. ते वाटत राहा. माझ्या प्रत्येक संन्याशाचं घर हा माझा आश्रम व्हायला हवा. त्याचा सुगंध दरवळायला हवा. तुम्ही अशा आनंदात, मस्तीत जगा की दुसरे तुमच्याजवळ येऊन मस्त होऊ लागतील. त्यांच्या जीवनातही नृत्य सुरू होईल. तर मी वीणाला सांगेन, माझ्यासाठी गा, माझ्यासाठी नाच. मागच्या जन्मात मी नऊ वर्षे तुझी वाट बघत होतो. तुझी ओळख नवीन नाही. वीणा काही न बोलता संन्यासासाठी तयार झाली. तिच्या नवऱ्याची मी वाट बघतोय, त्याच्या नजरेतही मी माझ्यासाठी अपूर्व प्रेम बघितलं आहे.''

ओशोंच्या संमोहनाची जादू अशी झपाटून सोडते.


**किंमत : १५० रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५ रु.**


## सभासदांना सूचना

आमच्या प्रिय वाचकांनी, तसेच सभासदांनी वर्गणीचे नूतनीकरण करावे.
कृपया वर्गणीत वाढ झालेली आहे,
हे लक्षात ठेवून वर्गणीची पूर्ण रक्कम पाठवावी.
पुस्तक खरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे,
ही नम्र विनंती.

नवे कोरे

# सुगरणीचं विज्ञान




डॉ. बाळ फोंडके

**१८०रु. पोस्टेज २५रु.**

माणूस आपलं अन्न शिजवायला लागला तेव्हापासून त्याच्या उत्क्रांतीतील वाटचालीनं एक महत्त्वाचं वळण घेतलं. किंबहुना माणूस आपलं अन्न शिजवायला लागला तेव्हाच 'हन्टर गवरर' हे स्वरूप सोडून त्यानं आपल्या सुसंस्कृत आधुनिक मानव बनण्याच्या वाटचालीला सुरुवात केली. अन्न शिजवून खायला लागल्यामुळे पचनसंस्थेत जसे उत्क्रांतिनुरूप बदल होत गेले तसा माणसाचा सांस्कृतिक विकास होत गेला.

आयुर्वेदात शिजवणं या प्रक्रियेला अन्नावर संस्कार करणं असंच म्हटलं आहे. म्हणजेच शिजवण्याची प्रक्रिया हीही एक वेगळ्या अर्थानं संस्कृतिजन्य प्रक्रिया ठरते. खाण्याजोगं अन्न तयार करणं यासाठी उष्णता देण्याआधीही काही प्रक्रिया कराव्या लागतात. पूर्वतयारी करावी लागते. प्रमाण नेमकं किती असावं याचं व्यवधान राखावं लागतं. ही सगळी व्यवधानं पार पाडताना आपण एक वैज्ञानिक प्रक्रियाच पार पाडत असतो याची जाणीव सुगरणींना असतेच असं नाही.

त्या प्रक्रियेपाठी विज्ञानाची जी संकल्पना अनुस्यूत आहे ती कितपत बरोबर आहे? ज्यांची विज्ञानाशी फारशी जवळीक नाही अशा सुगरणींना हे विज्ञान कितपत रुचेल? की तो घास गळ्याखाली उतरणारच नाही?


अशा प्रश्नांची उकल करणारे हे पुस्तक.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

# पुस्तक परिचय

**एक कोटीवर प्रतींच्या खपाचा विक्रम करणारी जॉन ग्रिशॅमची गाजलेली थरारकथा**

# द फर्म




**जॉन ग्रिशम** अनु. अनिल काळे

जॉन ग्रिशॅम हा गेल्या दोन दशकांतला अमेरिकेतील एक अग्रगण्य बेस्टसेलर कादंबरीकार.

१९८९ मध्ये 'ए टाइम टू किल' ही त्याची पहिली थरारकथा प्रसिद्ध झाली. एका दहा वर्षांच्या मुलीने आपल्यावर झालेल्या बलात्काराबाबत दिलेल्या जबानीने तो अस्वस्थ झाला आणि यशस्वी वकील म्हणून सात-आठ वर्षे उत्तम प्रॅक्टिस सुरू असतानाही या मुलीच्या केससंबंधी लिहिण्याची ऊर्मी त्याला स्वस्थ बसू देईना. पुढची तीन वर्षे वेळ मिळेल तेव्हा या केससंबंधीची हकिगत तो लिहीत राहिला आणि त्यातून थरारकथेचा आकृतिबंध त्याला गवसला. या थरारकथेला प्रारंभी प्रकाशक मिळेना; परंतु ती शेवटी एका प्रकाशन संस्थेने स्वीकारली. ५ हजार प्रतींची पहिली आवृत्ती हातोहात खपली आणि जॉन ग्रिशॅमच्या लेखनाला खरी चालना मिळाली.

'द फर्म' ही दुसरी थरारकथा १९९१ मध्ये प्रसिद्ध झाली. तिच्या लक्षावधी प्रती खपल्या. गेल्या वीस वर्षांत १ कोटी १० लाख प्रती खपल्याची नोंद आहे. तिच्यावर वर्षभरातच चित्रपट निघाला, तोही हिट झाला.

गेल्या २० वर्षात जॉन ग्रिशॅमच्या १९ थरारकथा प्रसिद्ध झाल्या. १५ चित्रपट निघाले. नॉनफिक्शनची ५ पुस्तके निघाली. चार चित्रपटांची निर्मिती सुरू आहे. त्याच्या पुस्तकांच्या २ कोटी ५० लाख प्रती खपल्या आहेत आणि अमेरिकेतच नव्हे तर जगभर त्याच्या नावाभोवती लोकप्रियतेचे तेजोवलय झळाळते आहे. अनेक भाषांत त्याच्या पुस्तकांचे अनुवाद झाले आहेत.

न्यायालयात वकील म्हणून केलेली प्रॅक्टिस आणि विधानसभेत लेजिस्लेटर (आमदार) म्हणून केलेले काम यामुळे त्याच्या कादंबऱ्यांत, त्याच्या कथानकात न्यायालयीन कार्यपद्धतीचे, पोलीस यंत्रणेच्या कार्यपद्धतीचे आणि सामाजिक ताणतणावांचे यथातथ्य चित्रण असते. दि पेलिकन ब्रीफ, दि क्लाएन्ट, दि चेंबर, रेनमेकर, दि पार्टनर, दि समन्स, रन अवे ज्युरी, दि अपील, दि ब्रोकर, दि लास्ट ज्युरर वगैरे त्याच्या थरारकथांच्या नावांवरूनही कथावस्तूतील न्यायालयीन प्राध्यान्याची झलक दिसून येते. न्यायालयीन थरारकथांमध्ये जॉन ग्रिशॅमचा हात धरणारा सध्या तरी दुसरा कोणी नाही. वैद्यकीय थरारकथांमध्ये डॉ. रॉबिन कुक आणि मायकेल क्रिश्टन यांचा वरचष्मा आहे. या सर्व लेखकांची बरीच पुस्तके मराठीत अनुवादित झालेली आहेत, ही गोष्टही येथे नमूद करायला हवी.

'द फर्म' या दुसऱ्याच थरारकथेने जॉन ग्रिशॅमला वकिली क्षेत्रातून लेखनव्यवहारात स्थिर केले. या थरारकथेने वाचकांना वेड लावले. जॉन ग्रिशॅमला लक्षावधी डॉलर्स मिळवून दिले.

'द फर्म' या थरारकथेत मेंफिसमधल्या एका प्रतिष्ठित वकिली फर्ममधील कामकाजाचे खरे स्वरूप दाखवण्यात आले आहे. ही वकिली फर्म शिकागोतील

एका माफिया टोळीच्या मालकीची असते आणि त्या टोळीच्या कृष्णकृत्यांवर पांघरूण घालण्याचे काम ती करीत असते; परंतु बाहेर कोणाला तिच्या या खऱ्या स्वरूपाची कल्पना नसते. एफबीआय या अमेरिकन गुप्तचर संस्थेचे तिच्यावर लक्ष असते; पण एफबीआयलाही या फर्मच्या कारवायांविषयी फारशी माहिती मिळालेली नसते, यावरूनच तिच्या कामकाजाच्या गुप्ततेची कल्पना येते. कारण वरकरणी या वकिली फर्मचे काम अत्यंत व्यावसायिक पद्धतीने चोख चाललेले असते.

मिशेल मॅकडिअर या हार्वर्ड लॉ स्कूलच्या हुशार पदवीधराला तिसरा क्रमांक मिळाल्याने अनेक वकिली फर्म्सचे नोकरीसाठी आमंत्रण येते. त्यातील मेंफिसच्या बेंडिनी लॅम्बार्ट अँड लोक या फर्मची ऑफर त्याला विशेष भावते; कारण इतर कंपन्यांपेक्षा जास्त पगार तर ती देण्याचे अभिवचन देतेच, शिवाय त्याला घरासाठी सवलतीच्या दरातले कर्ज, बीएमडब्ल्यू कार, शिक्षणासाठी त्याने घेतलेल्या कर्जाची परतफेड अशी प्रलोभनेही ही लॉ फर्म दाखवते. आम्ही अत्यंत बुद्धिमान पदवीधरांनाच फर्ममध्ये घेतो आणि त्यांना उत्तम सोई-सवलती देतो; आमच्याकडे कामाला लागल्यावर दुसऱ्या कोणत्या नोकरीला जाण्याचा मोह कोणाला होऊ नये असे आमचे वर्ककल्चर आहे असा दावा या लॉ फर्मचे प्रवक्ते करतात. चाळीस वकील त्या फर्ममध्ये कामाला असतात.

नोकरीला लागल्यावर पहिल्या आठवड्यापासूनच फर्मच्या कामात तो झोकून देतो. त्याची लॉ स्कूलमधील वर्गमैत्रीण ॲबी हिच्याशी त्याचे लग्न झालेले असते. तिलाही या फर्मच्या ऑफर्स आकर्षक वाटतात. मिचचा एक भाऊ रस्टी हा व्हिएतनाममध्ये रणांगणावर मरण पावलेला असतो आणि दुसरा भाऊ रे हा कुठल्याशा गुन्ह्यासाठी कारागृहात शिक्षा भोगत असतो... एकूण फर्मच्या कामात मिचला रस वाटतो.

त्याच आठवड्यात फर्ममधले काही वकील केमन आयलँडवर स्कुबा डायव्हिंगसाठी वीकएंडला जातात. त्यापैकी दोघांचा अपघाती मृत्यू होतो. त्यांच्या मेमोरियल सर्व्हिसला मिच हजर राहतो. तेथे चाललेल्या चर्चेवरून मिचच्या मनात शंकेची पाल चुकचुकते, कारण यापूर्वीही फर्ममधील तीन वकिलांचा अशाच प्रकारे अपघाती मृत्यू झालेला असतो, असे त्याला कळते. ''बेंडिनी फर्ममधून आजवर कोणीही वकील काम सोडून गेलेला नाही; फक्त अपघाती मृत्यूनेच कोणी गेले, तर गोष्ट वेगळी'' असे कोणीतरी विनोदाने म्हणते. तेव्हा मिचला आश्चर्य वाटते. तो आपला तुरुंगातला भाऊ रे याच्याबरोबर तुरुंगात असलेला आणि आता सुटलेला मित्र एडी लोमॅक्स याला या फर्मच्या कर्मचाऱ्यांच्या अपघाती मृत्यूसंबंधातील सत्याचा छडा लावण्यासाठी प्रायव्हेट इनव्हेस्टिगेटर म्हणून नेमतो. त्याच दरम्यान एफबीआयचा एक एजंट मिचशी संपर्क साधून म्हणतो, ''या फर्ममध्ये काहीतरी बेकायदा प्रकार सुरू आहे, असे एफबीआयला वाटते; परंतु त्याबद्दल फारसे काही अजून हाती लागलेले नाही.

तू जर याबाबत मदत केलीस आणि या फर्मसंबंधी आणि तिच्या मालकासंबंधी, तिच्या बेकायदाव्यवहाराबद्दल खात्रीलायक पुरावा देऊ शकला, तर आम्ही तुला २० लाख डॉलर्स देऊ आणि तुझ्या भावाला तुरुंगातून मुक्त करू.'' टॅरन्सची ही ऑफर मिचला डावलता येत नाही. कारण या फर्ममध्ये हुशार पदवीधरांना घेऊन, पुढे त्यांना काहीतरी बेकायदा कृत्यात अडकवून त्यांना गैरकृत्ये करण्यास ब्लॅकमेल केले जाते. त्याला जर विरोध केला तर त्यांना अपघाती मृत्यूच्या मार्गाने संपविण्यात येते, हे तोवर त्याच्या लक्षात आलेले असते. आपण यातून वेळीच बाहेर पडायला हवे, असा निर्धार तो करतो. त्याची पत्नी ॲबी हीदेखील त्याच्या बेताला संमती देते.

मिच आपल्या ऑफिसमधील संशयास्पद फायलींच्या झेरॉक्स प्रती काढत राहतो. बेंडिनीच्या इमारतीच्या पाचव्या मजल्यावरून माफिया व्यवहाराची सूत्रे हलवली जातात. तेथे इतरांना जाण्यास मज्जाव असतो. एडी लोमासची सेक्रेटरी आणि प्रेयसी टॅमी हेम्पविल हिच्या मदतीने मिच फर्मच्या गुप्त कागदपत्रांच्या आणि दस्तऐवजांच्या नकला करण्याचे सत्र जारी ठेवतो.

मिचच्या वर्तनामुळे फर्मला त्याच्याबद्दल संशय वाटू लागतो. त्याचे घर, त्याची कार, त्याचे ऑफिस यात गुप्त कॅमेरे बसवून फर्म त्याच्यावर पाळत ठेवते.

एफबीआयचा एक खबऱ्या आल्फ्रेड याला मिचच्या या योजनेचा सुगावा लागतो. तो मिचशी आणखी सौदा करतो. मिचच्या भावाला तुरुंगातून सुटका करून त्याला पळून जाता येईल, अशी व्यवस्था तो करतो. फर्मच्या बँक खात्यातून १० लाख डॉलर्स मिचने काढावेत आणि ते कॅरिबियन बेटातील बँकेच्या शाखेत जमा करावेत. पुढे कॅरिबियन बेटातच वास्तव्य करावे, अशी व्यूहरचना मिच व आल्फ्रेड करतात.

एफबीआयला फर्मविरुद्ध जरूर तेवढा पुरावा मिचच्या कॉपी केलेल्या फायलींमधून मिळतो. फर्मचा प्रमुख ऑलिव्हर लँबार्ट हा असतो. तो फर्ममध्ये ज्युनिअर म्हणून काम करीत असतो, हे त्या कागदपत्रांवरून लक्षात येते. मिच आपल्या पत्नीसह कॅरिबियन बेटात आश्रय घेतो. त्याचा तुरुंगातून पळालेला भाऊही त्याच्याबरोबर राहायला येतो.

मिचला आता खरे तर कॅरिबियन बेटात निर्वेधपणे दिवस काढणे सोपे जावे; परंतु गुन्हेगाराला त्याचा भूतकाळ दडपून टाकता येत नाही. एक माजी पोलीस डिटेक्टिव्ह बिल डिशवॉशर हा आता गुंडगिरी करीत मोरोल्टोचा सुरक्षाप्रमुख बनलेला असतो. तो मिचला ब्लॅकमेल करू लागतो. पण मिच त्याला गुंगारा देतो.

'द फर्म'चा शेवट अनेक वाचकांना पटला नाही. चित्रपटात तो बदलण्यात आला. लॉ फर्मच्या बेकायदा कृत्यांसंबंधी जॉन ग्रिशॅमने अत्यंत आवेशाने आणि आक्रमकपणे लिहिले आहे. त्यामुळे वाचकांच्या मनावर ती अमिट छाप टाकते.


**किंमत : ४४०रु.     सभासदांना : सवलतीत     पोस्टेज : ३०रु.**

# पुस्तक परिचय

**खूप संपत्ती असूनही**
**आपण खरोखर श्रीमंत आहोत का?**

# दि मिथ कॉल्ड वेल्थ

**खरी संपत्ती कुठली? खरा श्रीमंत कोण?**




**राजेश भास्कर वत्तमवार**

राजेश भास्कर वत्तमवार यांचे 'दि मिथ कॉल्ड वेल्थ' हे छोटेखानी इंग्रजी पुस्तक पैसा आणि श्रीमंती याबद्दलच्या आपल्या कल्पनांना आव्हान देणारे आहे. खरी श्रीमंती ही एखाद्याच्या बँकेतील खात्यावर असणाऱ्या रकमेवर किंवा नावावर असणाऱ्या मालमत्तेवर मोजण्याची गफलत आपण करतो. पैसा मोठ्या प्रमाणावर जवळ असला तर आपण सुखी होऊ, जितकी संपत्ती जास्त तेवढे सुख जास्त, हा आपला समजही बरोबर असतोच; असे नाही.

'ज्यांच्याजवळ गरजेपेक्षा जास्त संपत्ती आहे आणि गरजेपेक्षा जास्त मिळवण्याचा ज्यांना हव्यास आहे.' त्यांना अर्पण केलेल्या या पुस्तकात पैसा आणि श्रीमंतीकडे पाहण्याचा आध्यात्मिक दृष्टिकोन समजावून देण्याचा प्रयत्न राजेश वत्तमवार यांनी या पुस्तकात केला आहे. मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी घेऊन एमबीएचा अभ्यास करणाऱ्या एका तरुणाने आपल्या करिअरच्या उंबरठ्याशी असताना संपत्तीच्या आणि श्रीमंतीच्या स्वरूपाचे विश्लेषण करण्यास प्रवृत्त व्हावे आणि त्याबद्दल एका ठाम भूमिकेपर्यंत मजल मारावी, या गोष्टीचे कोणालाही अप्रूप वाटेल.

राजेश वत्तमवार यांनी आपल्या प्रास्ताविकात आणि संदर्भात आपल्यावर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तींचा आणि पुस्तकांचा निर्देश केला आहे. त्यात रमणमहर्षी, निसर्गदत्तमहाराज, इव्हान पावलोव, दीपक चोप्रा, जी. आय. गुर्डिफ, व्हिक्टर फ्रँकिल, एकहर्ट टोल, रॉबर्ट किओस्की, व्ही. एस. रामचंद्रन, फ्रिट्झॉप काप्रा, जे. कृष्णमूर्ती, खलिल जिब्रान, पावलो कोएलो, माल्कम ग्लॅडवेल, ए. पार्थसारथी आणि भगवद्‌गीता यांचा समावेश आहे. प्राचीन आणि आधुनिक चिंतनाचा आधार वत्तमवारांच्या एकूणच विचारप्रक्रियेला लाभलेला असावा, याची या निर्देशावरून कल्पना येते.

या पुस्तकांच्या सोळा प्रकरणात वत्तमवारांनी आपली भूमिका सूत्ररूपाने विशद केली आहे.

इच्छा आणि स्वारस्य, अधिकाधिक संपत्तीची संकल्पना, संपत्तीचा संग्रह आणि मूल्यमापन, मालकी आणि सुखप्राप्ती, वर्तमान क्षणातील संपत्ती, संपत्ती आणि विवेकबुद्धी, संपत्ती आणि काल, मालक आणि कर्मचारी, खरी श्रीमंती, विचलित न करणारे नुकसान, अहंकाराच्या पुष्टीसाठी द्रव्यसंचय, संपत्ती आणि सुरक्षितता, संपत्तीवर आधारित तुलना, प्रत्येक गोष्ट तुमची होणे शक्य, अनेक पटींनी होणारी संपत्तिवृद्धी अशा मुद्द्यांच्या अनुषंगाने वत्तमवारांनी आपला युक्तिवाद पेश केला आहे. संपत्तिविषयक विचारांचे आणि वेगवेगळ्या दृष्टिकोनांचे हे संकलन संपत्तिविषयक आपले गैरसमज दूर करून मानवी जीवनातले मन:शांती आणि समाधानाचे महत्त्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न वत्तमवार यांनी केला आहे.

कुठल्याही विशिष्ट वेळी आपली जी संपत्ती आहे असे आपण मानतो, ती केवळ

आपल्या कल्पनेतच असते आणि अपरिमित संपत्तीचा हव्यास हा असमाधान व यातना यांना कारणीभूत ठरतो, ही भूमिका या पुस्तकाच्या केंद्रस्थानी आहे, असे वत्तमवार यांनी आरंभीच स्पष्ट केले आहे.

समाजावर भौतिकवादाचा सध्या पगडा आहे. भौतिक सुखसमृद्धीचा मोह सर्वांना पडला आहे. जे मिळते, त्याने तृप्ती होत नाही. अधिक हवेसे वाटते. जगण्याचे साधन अधिकाधिक लोकांना आज उपलब्ध आहे, परंतु जगायचे कशासाठी याचाच सर्वांना विसर पडलेला आहे. पैसा मिळवायला हवा, असे प्रत्येकाला वाटते. यात काहीच गैर नाही; परंतु पैशाचा, संपत्तीचा नेमका अर्थ काय, नेमके महत्त्व काय, हे समजले नाही तर संपत्तीचा हव्यास निरर्थक ठरतो. गरज, सुविधा, सुख, अहंकार, सुरक्षितता, यशोकामना, कशाचे तरी वाटणारे भय यासाठी पैसा हवा असे वाटणे रास्त असले तरी तो किती हवा याचे काही गणित मांडता येत नाही. मिडास राजाप्रमाणे प्रत्येक वस्तूचे सोने करण्याचा नाद सध्याच्या समाजाला लागला आहे. वस्तूंच्या संचयात श्रीमंती नसते. श्रीमंतीची जाणीव ही मनाची अवस्था असते, एक विचारप्रक्रिया असते, एक भावना असते. **श्रीमंती म्हणजे तुमच्याजवळ किती संपत्ती आहे याचा हिशेब नव्हे, तर तुमच्याजवळ जे आहे त्याबद्दलची तुमची भावना होय.** जर या क्षणाबद्दलचे आपले भान तीव्र असेल, तर श्रीमंती हा केवळ एक भ्रम वाटेल. मिथ वाटेल. कल्पना वाटेल. एखादा श्रीमंत असेल, पण त्याला आपल्या श्रीमंतीची जाणीवही नसेल. तुमच्याजवळ कितीही वस्तूंचे भांडार भरलेले असो; त्यातले जे तुम्ही प्रत्यक्षात वापरता, तेच खऱ्या अर्थाने तुमचे असते. वापरात येऊ न शकणारी संपत्ती ही केवळ एक आत्मवंचना असते, भ्रामक कल्पना असते. मालकीची कल्पना मनात न आणताही किंवा वस्तूंचा संग्रह न करताही एखाद्याला सुखासमाधानाचे जीवन जगता येते; हे आपल्या लक्षात आले, तर आपले जीवन अधिक आनंददायक व फलप्रद होऊ शकेल.

आपल्या जीवनातील सुखाचे आणि दुःखाचे मूळ कारण म्हणजे इच्छा, अभिलाषा, एखाद्या गोष्टीच्या प्राप्तीची ओढ. इच्छेने विचाराला आणि कृतीला चालना मिळते. आपली आयुष्यभर जी धडपड चाललेली असते, ती आपल्या इच्छा-आकांक्षांच्या पूर्ततेसाठी. इच्छा पूर्ण झाली म्हणजे आपण सुखी होऊ, असे आपल्याला वाटत असते; पण हा एक भ्रम असतो. एक इच्छा पूर्ण झाली की दुसरी इच्छा होते... तिसरी इच्छा होते... इच्छांना कधी अंतच नसतो. इच्छा बदलत जातात. इच्छेमुळे महत्त्वाकांक्षा निर्माण होते. महत्त्वाकांक्षेमुळे आपण वर्तमान क्षणाऐवजी भविष्याचाच विचार करायला लागतो. भविष्यात पूर्तता न झाल्यास आपल्याला आपले आयुष्य, आपले जीवन अर्थहीन, पोकळ, क्षुल्लक वाटू लागले. **इच्छा नसतील तर आयुष्यात स्वारस्य उरणार नाही; परंतु इच्छांमुळेच माणसाला दुःख आणि**

**वेदना सहन कराव्या लागतात, हेही लक्षात घ्यायला हवे.** त्यामुळे इच्छांवर नियंत्रण हवे. निष्काम कर्म, आवश्यकता आणि गरजा यांच्यातला फरक जाणून घेतला तर मन:शांती लाभू शकेल.

सॉक्रेटिस म्हणे, ''समाधान ही स्वाभाविक संपत्ती आहे, चैन ही कृत्रिम गरिबी आहे.''

खूप संचय करणे म्हणजे श्रीमंती नव्हे, केवळ मालकी म्हणजे सुख नव्हे. या क्षणी जे आहे, ते खरे जीवन. ते खरे वैभव. ते खरे द्रव्य. आताचा क्षण ही खरी संपत्ती. आपल्याजवळ आहे ते पुरेसे आहे, हे जाणणे म्हणजे श्रीमंती असणे होय.

मालकी ही एक सामाजिक संकल्पना आहे. पण दुर्दैवाने ती मानसशास्त्रीय संकल्पना माणसाने स्वीकारून मालकी हक्काबद्दलच्या भ्रामक समजुतींना खतपाणी घातले आहे.

एका व्यक्तीचे एक फार्महाऊस असते. तो वर्षातून एक आठवडा जेमतेम त्या फार्महाऊसवर जाऊन राहतो. त्याचा माळी आणि सुरक्षा अधिकारी किंवा रखवालदार हेच तेथे राहतात. ते विनोदाने म्हणतात, ''आमचा मालक मोठा दयाळू आहे. त्याने हे फार्महाऊस केवळ आमच्या सुखासाठी आणि आम्हाला पगार देण्यासाठी बांधले आहे. मालक या फार्महाऊसच्या नोंदणीपत्रावर, खरेदी खतावरच संतुष्ट आहे आणि प्रत्यक्ष ताबा आमच्याकडे आहे.''

जर दृष्टिकोन बदलला, तर जीवनातील कोणतीही स्थिती उपभोगता येते आणि आनंददायक ठरू शकते. जगाच्या दृष्टीने फार्महाऊस ही मालमत्ता वास्तव असते; परंतु संपत्तीचा उपयोग या दृष्टीने ती भ्रामक असते. खरे तर फार्महाऊसची मालकी ही इतक्या अल्पावधीसाठी असते की, हॉटेलमध्ये उतरणे किंवा एखाद्या घरात भाडेकरू म्हणून राहणे, असेच तिचे स्वरूप असते. डॉक्टरांनी सांगितले म्हणून एक श्रीमंत गृहस्थ बागेत पायी फेरफटका करीत असतो आणि त्याचा ड्रायव्हर त्याची कार हळूहळू चालवत त्याच्यामागून येत असतो. मालकाची तब्येत बिघडलेली, त्याला चालणेही कष्टाचे ठरते. ड्रायव्हर आपला आरामात त्या लक्झरी कारचा आनंद घेत असतो. श्रीमंताजवळच्या संपत्तीत भर पडली तरी त्यामुळे काही फरक पडत नाही. कारण त्याची सर्व संपत्ती त्याच्या मनात असते. बाह्यत: श्रीमंत आणि त्याचा कार ड्रायव्हर– त्याचा कर्मचारी– हे दोघे तेवढेच काम करीत असतात आणि समान सुविधांचा लाभ घेत असतात. हा श्रीमंत मालक आणि हा कर्मचारी यातला खरा श्रीमंत कोण, असा फरक कसा करायचा? एक जण मालकीच्या तोऱ्यात वावरतो; दुसरा आपण कर्मचारी असे समजून तसा वावरतो. मालकाचा ताळेबंद कागदावर असतो– तो सोडला तर दैनंदिन जीवनात फारसा फरक नसतो. कर्मचारी आरामात असतील, तर त्यांनी स्वत:ला श्रीमंत समजायला हरकत नाही, असे प्रतिपादन

'मालक आणि कर्मचारी' या प्रकरणात करण्यात आले आहे.

काही वस्तूंची मालकी असणे म्हणजे श्रीमंती नव्हे. श्रीमंत असल्याची भावना असणे त्यासाठी आवश्यक आहे. मालकी असो वा नसो; पण समाज वस्तूच्या मालकीला महत्त्व देतो. मालकीच्या हक्काला कागदोपत्री महत्त्व देतो. त्यामुळे इतरांच्या मालकीच्या मालमत्तेचा वापर करीत असूनही आपण तिचा उपभोग घेऊ शकतोच, असे नाही. कार चालवणे ही श्रीमंती असेल, तर टॅक्सी ड्रायव्हर हा खरा श्रीमंत ठरतो. पण ती टॅक्सी दुसऱ्याची असेल तर श्रीमंतीचा दावा तो करणार नाही किंवा श्रीमंतीचा आनंद घेऊ शकणार नाही. भारतीय गृहिणीच्या नावावर घर नसते, कार नसते, मालमत्ता नसते, व्यवसाय नसतो; पण ती त्या घराची मालक नसतानाही त्या घरातील सर्व सुखसुविधांचा आणि चैनीच्या वस्तूंचा उपभोग घेत असते. मग तिला श्रीमंत म्हणायचे की नाही? आपली श्रीमंती, आपली मालकी सिद्ध करण्यासाठी तिच्याजवळ कागदपत्रे नसतात; पण ती आपल्या घराचा संपूर्ण कारभार स्वत:चे घर म्हणून चालवत असते. काहीही मालकीचे नसताना ती सर्व गोष्टींचा लाभ घेत असते. तिला श्रीमंत म्हणायचे की नाही? गृहिणींनी आपल्या नवऱ्यांना मॅनेजर म्हणून जणू नेमलेले असते आणि सुखी पत्नी ही नवऱ्यापेक्षा अधिक श्रीमंत असते. नवरा केवळ कागदोपत्री श्रीमंत असतो. अर्थात् हा एक दृष्टिकोन झाला. वस्तुस्थिती काय असते? पत्नी ही प्रेमापोटी सर्व काही करीत असते. पती आणि पत्नी यांच्यातील अंतर त्यांच्या खिजगणतीतही नसते. घर दोघांनी मिळून चालवायचे असते, हे समाजसापेक्ष मूल्य त्यांच्या आचरणाची दिशा ठरवत असते. आता कायद्यानेच पतीबरोबर पत्नीची घरादारावरील, मालमत्तेवरील मालकी मान्य केल्याने या प्रश्नाचे विवेचन वेगळ्या प्रकारे करावे लागेल.

'लॉसेस नेव्हर डिस्टर्ब' या प्रकरणात एका बहुराष्ट्रीय कंपनीच्या शेअर्सचे भाव कसे वाढत गेले आणि नंतर एक घोटाळा उघडकीला आल्याने कसे गडगडले, याचे उदाहरण वत्तमवारांनी दिले आहे. या कंपनीच्या आर्थिक ताळेबंदातील आकडेवारीत गोंधळ दोन वर्षांआधीपासून होता. पण त्या वेळी कंपनीच्या शेअर्सचे भाव वाढत होते; परंतु घोटाळा उघडकीला आल्यानंतर शेअर होल्डर मानसिकदृष्ट्या हादरले. आपली वापरात नसलेली सर्व संपत्ती ही भावी काळासाठी असते, त्यामुळे कोणीतरी जाणीव करून दिल्याशिवाय आपल्या नुकसानीची जाणीवच आपल्याला नसते. आपल्याकडे नेमकी संपत्ती किती आहे, हे खरे तर आपल्याला ठाऊक नसते. जोपर्यंत मालमत्ता व शेअर्स विकून टाकले जात नाहीत, तोवर त्याची नेमकी कल्पना येत नाही. आभासात्मक नुकसानीच्या माहितीनेच आपण दु:खी-कष्टी होतो, प्रत्यक्ष नुकसानीने नाही. कारण आपली वापरात नसलेली संपत्ती ही केवळ व्हर्च्युअल, आभासी असते. नफातोटा हा जोवर केवळ कागदोपत्री असतो, तोवर तो आपल्याला

जाणवत नाही. जोपर्यंत आपण एखादी वस्तू वापरत नाही तोपर्यंत आपण ती वस्तू गमावत नाही. प्रत्यक्ष आर्थिक नुकसान झाले तर त्याचा आघात आपल्याला जाणवतो. पण जोवर जरुरीची वस्तू गमावत नाही तोपर्यंत आपल्याला काहीही वाटत नाही. एखादी वस्तू हिरावून घेतली जाते, तेव्हा आपल्या मालमत्तेचे तेवढेच अवमूल्यन होते. शेअर्सच्या भावात चढउतार होतात. मूल्यमापन आणि अवमूल्यन ही एक अखंड चालणारी प्रक्रिया आहे. थोड्या चढउताराने जीव खालीवर होण्याची गरज नाही. अल्पकालीन गुंतवणूकदारांना आपल्या शेअरमधल्या थोड्याफार चढउताराने आनंद किंवा दु:ख होते. दीर्घकालीन गुंतवणूकदाराला दैनंदिन चढउताराचे फारसे दडपण वाटत नाही.

फायदा-तोटा हा नेहमी कालसापेक्ष असतो.

आज फायदा झाला तर उद्या तोटा होणारच नाही, असे नाही. आज आलेली संपत्ती म्हणूनच आपली कायमची कमाई नव्हे.

**एखादी आपल्याला लाभलेली गोष्ट कधीतरी हातातून जाणार, हे भान ठेवणे म्हणजे त्या वस्तूवर प्रेम करणे होय.** याच वृत्तीने आपण काहीशा अलिप्तपणे आपल्या संपत्तीचा उपयोग करायला हवा. मृत्यू अटळ असतो. त्यामुळे कोणत्याही फायद्याने वा नुकसानीने आपण जगात काही आणत नाही आणि जगातून काही नेत नाही, हे लक्षात ठेवायला हवे.

वास्तवात एखाद्या घटनेने किंवा तोट्याने आपण अस्वस्थ होत नाही; पण तोट्याच्या ज्ञानाने आणि त्याबद्दलच्या आपल्या प्रतिक्रियेने आपल्याला अस्वस्थता वाटते. चांगल्या-वाईट घटना घडतच असतात, पण त्यांची कोणीतरी जाणीव करून दिल्याशिवाय आपणावर काही परिणाम होत नाही. आपली संपत्ती ही नेहमीच स्थावर-जंगम स्वरूपात असत नाही, ती आपल्या मनात असते. त्यामुळे मनाला जाणीव करून दिल्याशिवाय ती आपल्याला सैरभैर, विचलित वा अस्वस्थ करू शकत नाही.

जीवनात आपल्याला हव्या असलेल्या गोष्टी मिळतात; तशाच नको असलेल्या गोष्टीही मिळतात. जे मिळते, ते कायम टिकून राहात नाही; ते तेवढ्यापुरते असते, हेही आपण लक्षात घ्यायला हवे. आपण अंतर्मुख होऊन स्वत:च्या अंतरंगाचा वेध घेतला, तर आपल्या जीवनातील सुखदु:खांची आणि समस्यांची तीव्रता कमी होईल. नफ्या-तोट्याच्या विचारांना आपण फाटा देऊ शकलो, तर आपल्या जीवनातल्या बहुतांश दु:खांची बोच कमी होईल.

आपला आत्मा हा विचार आणि मन यांच्या पलीकडे असतो. विचार आणि मन यांच्यापलीकडे जाणे म्हणजे सुखी आणि शांत निरामय जीवन जगणे होय, असा निष्कर्ष शेवटी येतो.

आपला अहंकार, अभिमान, मोठेपणा दाखवण्यासाठी संपत्तीचा संचय करणे म्हणजे आपली फसवणूक करणे होय. आपण एखाद्या मर्यादित क्षेत्रात आपला प्रभाव निर्माण करू पाहतो; पण त्या क्षेत्राबाहेर मोठे, विशाल क्षेत्र असते. आपण एखाद्या डबक्यात राहतो.

आपल्या जीवनाचा मार्ग हा वर्तुळाकार असतो. आपल्यापुढे नेहमीच कोणीतरी असते. पुढे बघितले तर आपण शेवटचे असतो. मागे बघितले तर आपण पहिले असतो. आघाडीवर असतो. प्रत्येक जण पहिला नंबर मिळवण्यासाठी पळत असतो; पण आपण वर्तुळाकार फिरतो आहोत, हे आपल्या लक्षात येत नाही. आपला अहंकार, अहंभाव, स्वार्थ हा शारीरिक अस्तित्वापलीकडे गेला की आपल्या अभिमानाचे, व्यक्तिमत्त्वाचे आणि अस्तित्वाचे सामाजिक मुखवटे स्पष्ट होतात.

आपला अहंकार आणि ओळख यातही सतत परिवर्तन होत असते.

आज मूल म्हणून आपली ओळख असते. उद्या तरुणपण येते. नंतर प्रौढपण, म्हातारपण. प्रत्येक अवस्थेत आपले कर्म, आपले वर्तन वेगवेगळ्या पातळीवरच असते. आपले स्वभावविशेष, वर्तन, व्यक्तिमत्त्व, विचार यांत बदल होत जातात. केवळ अहंकारासाठी संपत्तीची जमवाजमव हा केवळ एक सामाजिक प्रतिष्ठेचा भाग असतो. एक मोठा भ्रम असतो.

या जगात काहीही सुरक्षित नाही. त्यामुळे आर्थिक तरतूद करून भावी काळात सुरक्षितता मिळेल, अशी कल्पना आपण करतो. भावी तरतुदीसाठी आपण आपले सद्य:कालीन जीवन पणाला लावतो. आज हालात दिवस काढतो, पण बचत करण्यासाठी धडपडतो. आयुर्विमा काढून त्याचे हप्ते भरण्यासाठी अनेक लटपटी करतो. मरताना श्रीमंत होण्यासाठी ही सारी खटपट ठरते. भविष्याविषयीची धास्ती न बाळगता वर्तमान क्षण चांगल्या प्रकारे जगणे हेच श्रेयस्कर, हे भान असायला हवे.

काही व्यक्तींना संपत्तीचा हव्यास नसतो; सुरक्षिततेची चिंता नसते. तरीही संपत्तीमागे ते धावतात. इतर व्यक्तींशी तुलना करताना त्यांना आपण इतरांपेक्षा गरीब वा कमी आहोत, ही कल्पनाच सहन होत नाही. आपला शेजारी आपल्यापेक्षा गरीब आहे, हा विचार आपल्याला सुखदायक वाटतो. शेजाऱ्यापेक्षा आपण खालच्या पातळीवर आहोत, हा विचार दु:खी करतो. खरे तर प्रत्येक व्यक्ती ही विशिष्ट असते. सर्वांना समान संपत्ती, समानता ही कल्पनाच भ्रममूलक असते. इतरांशी तुलना करून सुखी किंवा दु:खी होणे चूक आहे. अशी तुलना अनिष्टच होय.

या जगात आपल्याला प्रत्येक गोष्ट मिळू शकते.

आपल्याजवळच्या वस्तूंचा वापर करताना आपण क्षणोक्षणी गरिबीचा किंवा श्रीमंतीचा अनुभव घेत असतो. जेव्हा उपलब्ध साधनसंपत्तीचा वापर करीत नाही, तेव्हा आपण तुलनेने गरीब होतो. आपल्या संपत्तीचाच त्या वेळी आपल्याला जणू

विसर पडलेला असतो. संपत्तीची मालकी असल्यावरच आपण श्रीमंत ठरतो, हा गैरसमज आहे. नित्य नव्या वस्तूंचा हव्यास धरण्याऐवजी आपल्याजवळ जे आहे, त्यावर प्रेम करणे जास्त सुखद ठरते. प्रेमाच्या रूपात आपण वस्तूंचा अधिक उपभोग घेऊन संपन्न बनत असतो.

मालकी हक्काची संकल्पना जगात नसेल, अशी कल्पना करा. मग प्रत्येकाला प्रत्येक गोष्टीचा तिच्या-तिच्या स्वभाववृत्तीनुसार उपभोग घेता येईल. खलिल जिब्राननने म्हटले आहे, ''अधिक संपत्ती निर्माण करण्याऐवजी जर आपण आपल्या मित्रात किंवा प्रिय व्यक्तीत नवी गुंतवणूक करू शकलो, त्यांना इस्टेटीप्रमाणे जपू शकलो; तर आपण खरोखरच संघर्ष आणि संचय याशिवाय श्रीमंत बनू शकतो.''

भगवान बुद्धांनीही म्हटले आहे, ''एखाद्या गोष्टीबद्दलची आसक्ती हे सर्व दु:खाचे आदिकारण आहे.''

आपला आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला, तर जगातील प्रत्येक गोष्टीबद्दलचे आपले ममत्व वाढेल. आपले आयुष्यच बदलून जाईल.

पावलो कोएलो याने म्हटल्याप्रमाणे, ''जेव्हा एखादी गोष्ट आपल्याला उत्कटतेने हवीशी वाटते, तेव्हा संपूर्ण विश्व ती गोष्ट आपल्याला मिळावी यासाठी मदत करायला सिद्ध होते.''

जीवनातील आवश्यक गोष्टींची इच्छा धरा. शोध घेण्याची, जगाचा अनुभव घेण्याची भावना मनी बाळगा. जगाला काबीज करण्याची भावना धरू नका. आयुष्य हे एखाद्या स्वप्नासारखे जगा. स्वप्नातून स्वप्न निर्माण करण्यासाठी जगू नका. जे काही तुमच्या वाट्याला आले आहे, त्याचा आदर करा. जे तुम्हाला मिळालेले नाही, त्याबद्दल खंत करीत बसू नका. **जवळ काही नसतानाही मग तुम्ही सर्व जगाचे स्वामी होऊ शकता.**

या जगात श्वासोच्छ्वास, आरोग्य, शांत झोप, प्रेम, आशा, दूरदृष्टी, ताकद, बालकाचे निरागस हास्य यांचे काय मोल आहे?

या जगात आपले कुटुंब, आपले प्रियजन यांना तुम्ही किती महत्त्व देता?

या जगात आपल्या भावना, आपल्या संवेदना, आपली स्वप्ने यांचे मोल काय आहे?

या सर्व गोष्टींच्या बदल्यात तुम्ही किती रक्कम मोजायला तयार आहात?

संपत्ती म्हणजे केवळ ऊर्जेचे एक रूप आहे. ते वेगवेगळ्या रूपांत व्यक्त होते.

आयुष्य हे अमोल आहे. पण आपण प्रत्येक गोष्ट गृहीत धरतो. तिला कवटाळून जवळ घेत नाही.

या गोष्टी जर आपल्यापासून हिरावल्या गेल्या, त्यांना आपण वंचित झालो, तर आपल्याला त्यांची किंमत आणि महती जाणवते.

आपले यश, वैभव आणि आरोग्य हे केवळ नशिबावर, परिश्रमावर किंवा बुद्धीवर अवलंबून नसते.

या जगात कोणतीही गोष्ट घडायला अनेक घटक कारणीभूत ठरत असतात. त्यामुळे अमुकच एका घटकाला वा गोष्टीला श्रेय देणे, कारण ठरवणे अवघड असते. आपली बहुसंख्य कर्मे ही सामूहिक असतात.

इतरांच्या पापांसाठी आपल्याला दु:ख सहन करावे लागते. आपल्या पापांची किंमत इतरांना चुकवावी लागते.

एका व्यक्तीच्या लोभाने व हावरटपणाने एखाद्या बहुराष्ट्रीय कंपनीचे भवितव्य दोलायमान होते.

विश्वामध्ये एक गोष्ट बदलली, तर बाकीच्या सर्व गोष्टी बदलतात.

या जगात बदल घडवून आणायचा असेल, तर मानवाने स्वत:ला बदलायला शिकले पाहिजे.

इतरांचे दु:ख दूर केल्याशिवाय आपली दु:खापासून मुक्ती होणार नाही.

प्रत्येक व्यक्तीमध्ये नव्या समाजाची निर्मिती करण्याची सुप्त शक्ती असते.

तुमच्यापासून तुमच्या स्वत:च्या निर्मितीबरोबर तुमच्या समाजाची निर्मिती होणार आहे.

तुम्ही स्वत:त बदल घडवून आणायला सिद्ध व्हा. मग समाजही बदलेल.

प्रत्येक बीजामध्ये वनराई निर्माण करण्याची क्षमता असते. एका पावलाने मोठ्या प्रवासाचा आरंभ होतो.

जेव्हा निसर्गाने निर्माण केलेल्या एखाद्या प्राण्यावर तुम्ही प्रेम कराल, तेव्हा सृष्टीचा निर्माणकर्ता तुमच्यावरही आपल्या मायेचा वर्षाव करील.

खऱ्या श्रीमंतीचा हा परमोच्च आविष्कार होय.

**किंमत : १५०रु.  सभासदांना : सवलतीत  पोस्टेज : २५रु.**


www.mehtapublishinghouse.com

**मराठी व इंग्रजी वेबसाइट आता अद्ययावत माहितीसह आणि नवीन आकर्षक स्वरूपात!**

**आजच भेट द्या. व आपली मागणी नोंदवा.**

# Mehta Publishing House

## Fiction & Non-Fiction Books In English

| | | Price |
|---|---|---|
| An Introduction to Linguistic Theories | S. V. Shastri/ L. M. Goud | 90 |
| Untouchable | Mulk Raj Anand | 60 |
| Two on a Tower | Thomas Hardy | 100 |
| Plenty For All | S. A. Dabholkar | 400 |
| Indian English Poems | Ed. by Dr. Shirish Chindhade | 50 |
| Selected English Essays | Ed. by Dr. Shirish Chindhade | 50 |
| Glimpses of Changing Banking Scenario | P.N. Joshi | 300 |
| The Breadwinner (Fiction) | Deborah Ellis | 120 |
| Parvana's Journey (Fiction) | Deborah Ellis | 120 |
| Mud city (Fiction) | Deborah Ellis | 120 |
| Salt & Honey (Fiction) | Candi Miller | 200 |
| Call Centre - An inside story (Fiction) | Vikrant Shukla | 250 |
| The Myth Called Wealth (Non Fiction) | Rajesh Wattamwar | 150 |
| Master your Mind (Mental Health Guide) | Dr. Neel Burton | 200 |
| The Meaning of Madness (Mental Health Guide) | Dr. Neel Burton | 225 |
| Plato's Shadow (Philosophy) | Dr. Neel Burton | 250 |
| Cancer Care & Mysteries and Yoga (Health and Medicine) | Dr. Nitin Unkule | 295 |
| Japanese Magnolia (Fiction) | Rei Kimura | 299 |
| Japanese Orchid (Fiction) | Rei Kimura | 249 |
| 50 Years of Silence (Memoir) | Jan Ruff-O'Herne | 275 |
| Speeches that Reshaped the World (Reference) | Alan J. Whiticker | 300 |
| Speeches of War and Peace (Reference) | Larry Buttrose | 300 |

## **चला जाणून घेऊ या!** (पॉकेट बुक्स)

| **पुस्तकाचे नाव** | **लेखक** | **किंमत** |
|---|---|---|
| तणाव व राग | शुभदा गोगटे | ३० |
| स्मरणशक्ती कशी वाढवावी? | शुभदा गोगटे | ३० |
| फेंग शुई | शुभदा गोगटे | ३० |
| सुख | शुभदा गोगटे | ३० |
| रेकी | शुभदा गोगटे | ३० |
| ज्योतिषविद्या | शरद गोगटे | ३० |
| तंदुरुस्ती | मोतिया बसर्गेकर | ३० |
| चालणे | मोतिया बसर्गेकर | ३० |
| यशाचं रहस्य | सुभाष जोशी | ३० |
| चक्रं आणि नाडी | सुभाष जोशी | ३० |
| क्रियायोग | सुभाष जोशी | ३० |
| ॲक्युप्रेशर | सुभाष जोशी | ३० |
| रोग बरे करणारी पाण्याची अद्‌भुत शक्ती | वैशाली जोशी | ३० |
| अंकशास्त्र | गंगाधर महाम्बरे | ३० |
| योगविद्या | मंगेश कश्यप | ३० |
| वास्तुशास्त्र | स्वाती शहा | ३० |
| पोषक आहार | स्वाती शहा | ४० |
| शाकाहार | स्वाती शहा | ४० |
| गुडघेदुखी | सुषमा शाळीग्राम | ३० |
| हस्तसामुद्रिक | वृषाली पटवर्धन | ३० |
| परमार्थ | वृषाली पटवर्धन | ३० |
| मधुमेह | प्रशांत तळणीकर | ५० |
| आध्यात्मिकता | प्रशांत तळणीकर | ३० |
| केसांची निगा | मीना टाकळकर | ३० |
| रिलॅक्सेशन | मीना टाकळकर | ५० |
| स्वयंप्रेरणा | मीना टाकळकर | ५० |
| मनोविकास | आर. डी. मुनोत | ३० |
| सौंदर्याचे रहस्य | मंजूषा आमडेकर | ३० |
| उपयुक्त कानमंत्र | मंजूषा आमडेकर | ३० |

| | | |
|---|---|---|
| यशस्वी विवाहाचा कानमंत्र | मंजूषा आमडेकर | ३० |
| संवाद साधा नाती सांधा | मंजूषा आमडेकर | ३० |
| तणावमुक्त व्हा, आनंदी रहा | मंजूषा आमडेकर | ३० |
| जागरूक पालकत्व | मंजूषा आमडेकर | ३० |
| डोकेदुखी | ज्योतिका चितळे | ३० |
| हार्ट अ‍ॅटॅक | ज्योतिका चितळे | ५० |
| आहार आणि आरोग्य | ज्योतिका चितळे | ५० |
| मंत्रसामर्थ्य | गायत्री सेवक | ३० |
| ध्यानसाधना | साधना सराफ | ३० |
| बद्धकोष्ठता | मुग्धा गोखले | ४० |
| उच्च रक्तदाब | मुग्धा गोखले | ४० |
| प्रार्थना | अपर्णा देशपांडे | ४० |

## विज्ञान विषयक

| **पुस्तकाचे नाव** | **लेखक** | **किंमत** |
|---|---|---|
| विज्ञानमाला भाग १,२,३ | शांता पेंडसे | आ. सं. |
| वाचनातून विज्ञान | डी. एस. इटोकर | १०० |
| A to Z विज्ञान | डी. एस. इटोकर | ८० |
| अंतरिक्षाचा वेध | सुधा रिसबूड | १५० |
| (स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार २००६) | | |
| कथारूपी खगोलशास्त्र | लीना दामले | १०० |
| (राजा केळकर राज्य पुरस्कार २००६) | | |
| तंत्रज्ञानाची मुळाक्षरे | कविता भालेराव | २३० |
| (अ.भा.म.प्र. संघ उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती प्रशस्तिपत्र २००६-०७) | | |
| जिज्ञासेतून विज्ञान | कविता भालेराव | आ. सं. |
| मेंदू आणि वर्तन | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ७० |
| वायुप्रदूषण | डॉ. किशोर/डॉ. नलिनी पवार | १५० |

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.** **पोस्टेज खर्च वेगळा.**

# पुरस्कार



## * नसीमा हुरजूक यांना 'आदर्श कार्यकर्ता पुरस्कार' प्रदान



धनंजय थोरात यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रचनात्मक कार्यासाठी देण्यात येणारा 'आदर्श कार्यकर्ता पुरस्कार' हुरजूक यांना प्रदान करण्यात आला.

ग्रामीण विकास व स्त्रियांचे सबलीकरण करणाऱ्या डॉ. सुधा कोठारी, गुणवंत कलाकार किशोर कदम उर्फ सौमित्र आणि राजाभाऊ चव्हाण यांनाही भाई वैद्य आणि पार्श्वगायक सुरेश वाडकर यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

हुरजूक म्हणाल्या, ''अपंगांना स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी संस्थेने विविध उद्योग व व्यवसाय सुरू केले आहेत, पण त्यावर सरकारने 'व्हॅट'सारखे कर लावले आहेत. आम्ही सरकारची कोणतीही मदत घेत नाही. अपंग असूनही कष्ट करून उत्पादन घेतो. त्यावर आकारण्यात येणारा 'व्हॅट' रद्द करावा. अपंगांना संधी मिळाल्यावर स्वत:मधील कुवत दाखविता येते. त्यासाठी त्यांना संधी मिळाली पाहिजे. राज्यात ४५ लाख अपंग आहेत. त्यापैकी फक्त १७ हजार अपंगांपर्यंत आमची संस्था पोचू शकली आहे. उर्वरित अपंगांना अद्यापही मदतीची आवश्यकता आहे.''

भाई वैद्य म्हणाले, ''देशातील बचत गटांचे कार्य कौतुकास्पद असून, ती अंत:प्रवाहातील मूक क्रांती आहे. महिलांच्या हातूनच भविष्यातील भारताचे परिवर्तन होणार आहे. सामाजिक कार्यकर्त्याने बदलत्या समाजाचा विचार करून अद्ययावत तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे.''

### * सुरेखा शहा यांना ' आनंद साहित्यरत्न' पुरस्कार

शहरातील नागरिक सुरक्षा कवचात राहतो, हा गैरसमज आहे. शेतकरी आणि खेडेगावातील माणूस सुखी झाला; तरच शहरातील लोक सुखी होणार आहेत, असे मत खासदार राजू शेट्टी यांनी सुरेखा शहा यांना 'आनंद साहित्यरत्न पुरस्कार' देताना व्यक्त केले. विजयकांत कोठारी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

शेट्टी म्हणाले, ''साहित्यातून माणूस आणि समाज घडतो. 'जोहड' या पुस्तकातून तहानलेल्या जमिनीला पाणी देण्याबाबतची तळमळ व्यक्त करण्यात आली आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचा जपून वापर करण्याची जबाबदारी सर्वांची आहे. यासाठी पाण्याचे योग्य नियोजन ही काळाजी गरज आहे.''

वयाच्या आठव्या वर्षापासून लेखन करणाऱ्या शहा यांनी बारा कादंबऱ्या, सात नाटके, दीडशे कविता लिहिल्या आहेत. पंधरा पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

सुरेखा शहा म्हणाल्या, ''पुरस्काराने जबाबदारी वाढते. पुरस्काराच्या रूपाने आता लेखन करण्याची ऊर्जा मिळाली आहे. सर्वांची वाचनसंस्कृती टिकवली पाहिजे.''

### * कुमार केतकर यांना राज्यशासनाचा 'टिळक जीवनगौरव' पुरस्कार

पत्रकारितेतील विशेष योगदानाबद्दल महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणारा लोकमान्य टिळक जीवनगौरव पुरस्कार 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर यांना जाहीर झाला आहे. ५१ हजार रुपये रोख, स्मृतीचिन्ह आणि सन्मापत्र, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

ज्येष्ठ पत्रकार गोविंद तळवलकर आणि नीलकंठ खाडिलकर यांना याआधी टिळक जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

केतकर यांना पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल केंद्र सरकारने २००१मध्ये 'पद्मश्री' किताब देऊन सन्मानित केले होते. केतकर हे गेली ४० वर्षे पत्रकारितेत असून, यापूर्वी ते 'महाराष्ट्र टाइम्स' आणि 'लोकमत' वृत्तपत्रांचे मुख्य संपादक होते. 'डेली ऑब्झर्व्हर'चे निवासी संपादक, इकॉनॉमिक टाइम्सचे विशेष प्रतिनिधी म्हणूनही त्यांनी काम केले. राजीव गांधी पुरस्कार, नवरत्न पुरस्कार, रत्नदर्पण पुरस्कार आणि अर्थविषयक लिखाणाबद्दल चिंतामणराव देशमुख पुरस्कार केतकर यांना मिळाले आहेत.

### * डॉ. अनिल अवचट यांच्या 'सृष्टीत गोष्टीत'ला पुरस्कार

''बालसाहित्याच्या प्रांतामध्ये साने गुरुजींच्या कामाची दोरी घेऊन मी पुढे चाललो आहे. मी मोठा आहे की छोटा आहे हे मला माहीत नाही; पण माझे पूर्वसूरी

मोठी माणसे होती, याची मला नक्कीच जाणीव आहे. बालसाहित्यातून मुलांमध्ये चांगली मूल्ये रुजू शकतील,'' अशी भावना ज्येष्ठ साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. अनिल अवचट यांनी व्यक्त केली.

डॉ. अवचट यांच्या 'सृष्टीत गोष्टीत' या पुस्तकाला साहित्य अकादमीतर्फे उत्कृष्ट बालसाहित्याचा पुरस्कार जाहीर झाला.

डॉ. अवचट म्हणाले, ''आपल्याकडे बालसाहित्याला दुर्दैवाने दुय्यम स्थान आहे. छोटी पुस्तके, लिंबू-टिंबू साहित्य या दृष्टिकोनातून त्याकडे पाहिले जाते. वास्तविक, बालसाहित्य चांगलेच असले पाहिजे. रवींद्रनाथ टागोर, मुन्शी प्रेमचंद, साने गुरुजी, सत्यजित रे यांनी बालसाहित्याची निर्मिती केली आहे. मराठीमध्ये बालसाहित्य पुष्ट व्हायला हवे. मुख्य म्हणजे मुले त्या वयापासून वाचक होतील आणि त्यांच्यामध्ये चांगली मूल्ये रुजू शकतील. मुलांना 'फँटसी' आवडते. आता फँटसी म्हटलं की त्याला जोडूनच अंधश्रद्धा हा विषय येतो; पण वास्तवाची बैठक ठेवून फँटसी निर्माण करण्याचा प्रयत्न मी माझ्या लेखनातून केला. झाडे माझ्याशी बोलतात. झाडे, सिग्नल यांना भाषा देऊ शकली. बालवाङ्मय लिहायचे म्हणून लिहिले नाही. आता कोणी कशी वर्गवारी करायची हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. ''

आपल्या लेखनाला दाद म्हणून पुरस्कार आपोआप मिळाले तर त्याचा आनंद होतो. पुरस्कारासाठी अपेक्षा केली, तर दुःख पदरी येते. कलानिर्मितीच्या आनंदापेक्षा पुरस्काराचा आनंद दुय्यम आहे. पुरस्कार ही वाचकांची पसंतीची पावती असते. त्यामुळे मी हा पुरस्कार आनंदाने स्वीकारतो, असेही त्यांनी सांगितले.

*** शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना 'पुण्यरत्न जीवनगौरव पुरस्कार'**

साप्ताहिक लाल महालतर्फे शिवशाहीरांना 'पुण्यरत्न जीवनगौरव पुरस्कार' वनराईचे अध्यक्ष मोहन धारिया यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य, माजी खासदार श्रीनिवास पाटील, आमदार अरविंद सावंत, ज्येष्ठ पत्रकार मुकुंद संगोराम, सतीश जावडेकर या प्रसंगी व्यासपीठावर होते.

पुरंदरे म्हणाले, ''सध्या तरुणांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण सातत्याने वाढते आहे. त्यामुळे वैयक्तिक आणि सामाजिक आरोग्य धोक्यात आले आहे. चांगल्या सवयी रुजविण्यासाठी सातत्याने तरुणांनी गुणवत्तेचा आग्रह धरायला हवा. आपल्या देशात झालेल्या महापुरुषांनीही वेळोवेळी तोच संदेश दिलेला आहे. समाजाची दुखणी दूर करण्यासाठी तरुणांचा पुढाकार आवश्यक आहे.''

धारिया म्हणाले, ''महाराष्ट्राचा इतिहास सर्व देशासमोर मांडण्याचे काम शिवशाहीरांनी केले आहे. समाजासाठी झटताना त्यांनी सदैव विचारांना कृतीची जोड दिली.''

पाटील म्हणाले, ''पुण्याचा चेहरामोहरा बदलला, वाडा संस्कृतीही नामशेष

झाली; मात्र पुणेकर आजही इथली वेगळी संस्कृती टिकवून आहेत. पुण्याच्या वैशिष्ट्यांची पाळेमुळे खोल रुजलेली असल्याने त्याबाबत अभिमान वेगळा आहे.''

*** सदानंद चांदेकर यांना जीवनगौरव पुरस्कार**

व्ही आर्ट्स आणि डॉ. मधुसूदन घाणेकर विश्वहास्य विद्यापीठातर्फे देण्यात येणारा 'एकपात्री जीवनगौरव पुरस्कार' हास्यकलावंत सदानंद चांदेकर यांना देण्यात आला. ३५ वर्षे चांदेकर 'हसरी उठाठेव' या एकपात्री कार्यक्रमाच्या माध्यमातून हसवत आहेत.


*** शरद वर्दे यांना 'जयवंत दळवी पुरस्कार'**

'मॅजेस्टिक प्रकाशन'चा 'जयवंत दळवी स्मृती पुरस्कारा'साठी यंदा शरद वर्दे यांच्या 'झुळूक अमेरिकन तोऱ्याची' या विनोदी लेखन संग्रहाची निवड करण्यात आली. हा पुरस्कार ११ हजार १११ रुपये आणि स्मृतिचिन्ह या स्वरूपाचा आले. या वर्षी 'विनोद' या वाङ्मयप्रकारासाठी हा पुरस्कार होता.

'जयवंत दळवी स्मृती पुरस्काराचे' हे यंदाचे पंधरावे वर्ष आहे. डॉ. सुभाष भेंडे, डॉ. प्रदीप कर्णिक आणि अशोक पाटोळे यांच्या निवड समितीने या पुस्तकाची निवड करताना म्हटले आहे की, 'अमेरिकेत आज सुखाची रेलचेल आहे. सुबत्ता आहे. जो तो उठतो तो तिकडे जाऊ पाहतो. अमेरिकेत जाऊन कायमचे वास्तव्य करावे, अशी असंख्य तरुणांची मनीषा असते. या सोनेरी पिंजऱ्यात पदोपदी आढळणाऱ्या विरोधाभासाचे मोठे मिस्किल वर्णन शरद वर्दे यांनी केले आहे.'

*** निर्माते डी. रामानायडू यांना दादासाहेब फाळके पुरस्कार**

चित्रपट निर्मितीसाठी गिनेस बुकमध्ये झळकलेले प्रसिद्ध निर्माते डॉ. डी. रामानायडू यांना चित्रपट क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल २००९ सालासाठीचा प्रतिष्ठेचा दादासाहेब पुरस्कार जाहीर झाला. ऑक्टोबर महिन्यात गोव्यात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सुवर्ण कमळ, शाल आणि १० लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**लाइफ स्टाइल**

**६वी आवृत्ती**

सुधीर गाडगीळ

बड्या माणसांचे 'बडेपण' नेमक्या शब्दांत सांगणारे पुस्तक

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

१९३६ साली आंध्र प्रदेशातील करमचेडू गावात जन्मलेल्या रामानायडू यांनी १९६३ साली 'अनुरागम'द्वारे आपल्या कारकीर्दीची सुरुवात केली. एन.टी. रामाराव अभिनित 'रामाडू-भीमाडू' या चित्रपटाने १९६४ साली त्यांना हात दिला व हा चित्रपट दक्षिणेत धो धो चालला. गेल्या ४७ वर्षात त्यांनी भारतातील लौकिकप्राप्त निर्माते म्हणून त्यांनी स्वत:ची ओळख निर्माण केली आहे. सर्वाधिक चित्रपट निर्मितीसाठी रामानायडू यांचे नाव गिनेस बुकमध्ये नोंदविण्यात आले आहे. आत्तापर्यंत १३० सिनेमांची त्यांनी निर्मिती केली आहे. प्रामुख्याने तेलगूसोबत हिंदी, बंगाली, ओरिया, आसामी, मल्याळम्, कन्नड, गुजराती, मराठी आणि भोजपुरी भाषेतील सिनेमांचीही त्यांनी निर्मिती केली आहे. 'सरीगडू' या त्यांच्या चित्रपटाची १९९३ साली इंडियन पॅनोरमा विभागात निवड करण्यात आली होती. 'असूख' या त्यांच्या बंगाली सिनेमाला १९९९ साली राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याशिवाय आंध्रप्रदेश सरकारकडून त्यांच्या चित्रपटांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

त्यांनी निर्माण केलेला 'हमारी बेटी' या चित्रपटामध्ये अपंग नायिका सर्वसामान्य माणसांप्रमाणे आयुष्य जगून आपल्या आयुष्यातील ध्येय कशी पूर्ण करते, याचे चित्रण करण्यात आले आहे. या चित्रपटाचे शिकागो आणि व्हेनिस येथील महोत्सवांमध्ये प्रदर्शन करण्यात आले होते.

*** सिनेगीत स्पर्धा**

''देवाने संगीतातील अभिरुची केवळ काही लोकांनाच दिली आहे; पण संगीत हे फक्त करिअरसाठी नव्हे; तर मनाच्या समाधानासाठी शिकले पाहिजे. संगीताचा रस सर्वांनी घ्यावा,'' असे मत प्रसिद्ध गायक संजीव अभ्यंकर यांनी व्यक्त केले.

लायन्स क्लब ऑफ पुणे एलिटतर्फे घेण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन सिनेगीत स्पर्धेतील विजेत्यांना अभ्यंकर यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. क्लबचे प्रांतपाल राज मुछाल, अध्यक्षा पन्ना मेहता, सचिव अश्विनी लंबे, बी. एल. जोशी, रमेश शहा, वैजनाथ पेंडसे, जयश्री पेंडसे, शिल्पा पेंडसे आणि राजकुमार राठोड या वेळी उपस्थित होते. परीक्षक म्हणून राजेश दातार आणि संदीप उबाळे यांनी काम पाहिले.

'बीएमसीसी'चा सौरभ दप्तरदार आणि 'फर्ग्युसन'ची सारिका गोरेगावकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. ऋचा देशपांडे हिने द्वितीय; तर सायली जोशी हिने तृतीय क्रमांक मिळविला.

सौरभ चटर्जी, श्रुती अभ्यंकर, कौस्तुभ भिडे, मृण्मयी ऐनापुरे, पूजा बॅनर्जी, सौमिता धापटे आणि अपूर्वा धापटे यांना उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली.

### * शिक्षक गौरव पुरस्कार

''शिक्षक आज स्वत:च्या भूमिकेविषयी जागरूक नाहीत; त्यामुळे पाट्या टाकण्याची वृत्ती वाढते आहे. सामाजिक व्यवस्था जपणारा आदर्श शिक्षक हरवला असून, समाजाची मोठ्या प्रमाणात अधोगती होत आहे. शिक्षण पद्धती नासल्यासारखी परिस्थिती आज निर्माण झाली आहे,'' असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांनी व्यक्त केले.

महापालिकेच्या शिक्षण मंडळातर्फे 'शिक्षक दिना'निमित्त 'शिक्षक गौरव पुरस्कारां'चे वितरण करण्यात आले. त्या वेळी यादव यांनी बदलत्या शिक्षण पद्धतीविषयी विचार मांडले. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते शिक्षकांचा गौरव करण्यात आला. ज्येष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर, शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा संगीता तिवारी, उपाध्यक्षा विजय रेणुसे, शिक्षण प्रमुख रामचंद्र जाधव; तसेच इतर पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

यादव यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, ''व्यक्तिमत्त्वाला घडविण्याचे, आकार देण्याचे मोलाचे काम शिक्षक करतात. त्यांनी ही भूमिका जपली, तरच पुढच्या पिढ्या सुसंस्कृत घडणार आहेत. केवळ शैक्षणिक अभ्यासक्रम शिकविणे एवढीच शिक्षकांची जबाबदारी नसून, विद्यार्थ्यांना सामाजिक आणि सांस्कृतिक जबाबदारीची जाणीव करून देण्याचेही काम शिक्षकांचे असते.''

पुरंदरे म्हणाले, ''संस्कार चंदनाप्रमाणे असतात. त्याचा गंध सर्वत्र पसरतो. माणसाच्या जीवनात महत्त्वपूर्ण असलेले हे संस्कार करण्याचे काम शिक्षक करतात. शिक्षक हे विद्यार्थ्यांचे पालक असतात. त्यामुळे समाजाने त्यांना आदर दिला पाहिजे. शिक्षकांची प्रतिष्ठा जपणे हे आपले कर्तव्य आहे.''

तेंडुलकर म्हणाले, ''समाजात शिक्षकांना प्रतिष्ठा नाही, हे अत्यंत चुकीचे आहे. दगडावर दगड रचून इमारत बांधणारा इंजिनिअर मोठा होतो, माणसाच्या मुलाला स्वत:च्या पायावर उभा करणारा शिक्षक किती मोठा आहे, याची जाणीव आपण ठेवली पाहिजे. आई-वडील नोकरी करीत असल्याने अलीकडे मुलांची परिस्थिती वाईट झाली आहे. पालकांशी संपर्क सुटला असून, अपेक्षित संवाद होत नाही. त्यामुळे तुम्हीच या पोरक्या मुलांचे पालक व्हा.''

### * व्योमा ग्राफिक्सला 'प्रिंट विक इंडिया' पुरस्कार


अखिल भारतीय स्तरावर छपाई क्षेत्रातील प्रिंट विक इंडियाचा 'प्रिंटर ऑफ द इयर' छोटे मुद्रक विभाग हा पुरस्कार पुण्यातील हिंजवडी येथील व्योमा ग्राफिक्सला नुकताच मुंबई येथे कॅनन इंडियाचे सीनिअर व्हाईस प्रेसिडेंट आलोक भारद्वाज यांच्या हस्ते देण्यात आला. हा पुरस्कार व्योमा ग्राफिक्सच्या वतीने नीतेश शहा व मीता शहा यांनी स्वीकारला.

दहा हजार चौरस फुटांमध्ये कोणत्याही खांबाच्या आधाराशिवाय उभे राहिलेले, छपाईची सर्व कामे एका छताखाली होणारे व सुंदर पर्यावरणाने भरलेले व्योमा ग्राफिक्स हे एक भारतातील आदर्श छपाई केंद्र आहे. विक्रीमधील २० टक्के वाढ व खर्चकपातीसाठी केलेल्या योजनांमुळे हा पुरस्कार मिळाला आहे. त्यामागे नीतेन शहा यांचा छपाई क्षेत्रातील जवळपास २५ वर्षांचा अनुभव, जिद्द व कार्यक्षमता तसेच अनुभवी व कुशल कर्मचारीवर्ग यांचे मोठे योगदान आहे. एप्रिल २००६ रोजी शून्यातून सुरू केलेल्या छपाई केंद्रामध्ये आज अत्याधुनिक मशिन्सच्या मदतीने प्री-प्रेस, प्रेस आणि पोस्ट प्रेस ही कामे केली जातात. व्योमा ग्राफिक्सची छपाई क्षेत्रातील गुणवत्ता, उत्पादकता, विश्वासार्हता व कामाच्या पद्धतीमधील नियोजन, यामुळे चांगली प्रगती झाली आहे. तसेच वैशिष्ट्यपूर्ण बांधकाम व चांगले पर्यावरण, यामुळे नियमित होणाऱ्या खर्चात कायमस्वरूपी बचत व अप्रत्यक्ष उत्पादनात वाढ होत आहे. या छपाई केंद्रात विविध प्रकारची बहुरंगी छपाई व बाइंडिंग केले जाते. त्यात पोस्टर्स, लिफलेट्स, बुकलेट्स, डँगलर्स, बंटिंग्स इ. कामे पुणे व पुण्याबाहेरील कॉर्पोरेट सेक्टरसाठी केली जातात. गेल्या वर्षी प्रॅमेट टूल्स व सेको या कंपनीसाठी निर्यातीची कामे यशस्वीरीत्या केली आहेत.

### * 'गदिमा' कविता महोत्सव आणि पुरस्कार

'गीतरामायणा'द्वारे असंख्य देवघरांपर्यंत पोचलेल्या 'गदिमां'नी रसिकांच्या ह्रदयावर राज्य केले; मात्र आत्मचरित्र लिहिण्याची अण्णांची इच्छा अपूर्णच राहिली, असे ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांनी चिंचवड येथील दहाव्या राज्यस्तरीय 'गदिमा' कविता महोत्सवात म्हटले.

महाराष्ट्र कामगार साहित्य परिषद आणि लायन्स क्लब इंटरनॅशनल यांच्या वतीने महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी कवी रवींद्र आवटी होते. मिरासदारांनी 'गदिमां'च्या सहवासातील स्नेहबंधाचे कंगोरे उलगडून दाखविले. ते म्हणाले, ''गदिमा सर्वस्पर्शी कवी होते. त्यांच्या लेखणीतून काव्याला वेगळी उंची

**किनारे मनाचे**

**शान्ता शेळके** संपा. डॉ. प्रभा गणोरकर

शान्ताबाईंच्या दीर्घकालीन काव्य प्रवासाचा चिकित्सकपणे आणि सहृदयतेने घेतलेला वेध...

**१००रु. पोस्टेज २०रु.**

प्राप्त झाली आहे. त्यांनी केवळ चित्रपटांसाठी गीते लिहिली नाहीत, तर भक्तिगीते, भावगीते, बालगीते, अभंग, लावण्या, पोवाडे यांचेही लेखन केले. त्यांच्यातील प्रगल्भता, प्रतिभा आणि समयसूचकता यांमुळे त्यांना महती प्राप्त झाली.''

महोत्सवात मान्यवरांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण झाले. त्यामध्ये कवी ग्रेस (कुसुमाग्रज साहित्य पुरस्कार), 'सकाळ माध्यम समूहा'चे मुख्य संपादक उत्तम कांबळे (नारायण सुर्वे साहित्यप्रतिभा पुरस्कार), रामदास फुटाणे (गदिमा काव्यप्रतिभा पुरस्कार), दिनकर साळुंखे (गदिमा स्नेहबंध पुरस्कार), जयंत ओक (गदिमा रंगयात्री पुरस्कार), सुरेखा कोरडे (गदिमा लोककला पुरस्कार), सुनील चव्हाण. रेश्मा खरात, विजया मारोतकर, रवी पाईक (नारायण सर्वे काव्य पुरस्कार) यांचा समावेश आहे. गौरवचिन्ह, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.

श्री. कांबळे यांनी 'हे नारायणा' काव्य सादर करून नारायण सुर्वे यांच्या आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाला गदिमा प्रतिष्ठानचे विश्वस्त श्रीधर माडगूळकर, कवी प्रा. फ. मुं. शिंदे, भाऊसाहेब भोईर, लायन्स क्लबचे प्रांतपाल राज मुछाल उपस्थित होते. कवी उद्धव कानडे यांनी सूत्रसंचालन केले.

*** स्नेहांजली पुरस्कार**

स्नेहल प्रकाशनातर्फे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. न. म. जोशी यांना यंदाचा अंजली घाटपांडे स्मृती 'स्नेहांजली पुरस्कार' 'सिंबायोसिस'चे संस्थापक डॉ. शां. ब. मुजमदार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पाच हजार रुपयांचा हा पुरस्कार आहे.

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वि. रा. करंदीकर, मृणालिनी जोशी, डॉ. मुकुंद दातार, प्रा. प्र. के. घाणेकर, अजय भावे आणि रवींद्र घाटपांडे परीक्षक होते. या वेळी डॉ. वि. रा. करंदीकरलिखित 'विचार विश्वातील भ्रमंती' आणि अनिल बळेललिखित 'विसाव्या शतकातील गाजलेले दहा वृत्तपत्र संपादक' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

*** शब्दवेल प्रतिष्ठानचे पुरस्कार**

लातूर येथील शब्दवेल प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी उत्कृष्ट साहित्य कलाकृतीला पुरस्कार देण्यात येतात. यंदाचे पुस्कार ज्येष्ठ साहित्यिक रा. र. बोराडे यांच्या हस्ते देण्यात आले योवळी डॉ. सूर्यनारायण रणसुभे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

बळीराम मोरगे स्मृती राज्यस्तरीय पुरस्कार (२१ हजार रुपये) कोल्हापूरचे कादंबरीकार कृष्णात खोत आणि उमरग्याचे बालाजी मदन इंगळे यांना विभागून देण्यात आला.

सिद्रामअप्पा चिल्ले स्मृती राज्यस्तरीय काव्य पुरस्कार जळगावचे कवी अशोक कोतवाल यांना देण्यात आला. हा पुरस्कार पाच हजार रुपयांचा आहे.

*** 'मृत्यंजय'कार शिवाजी सावंत स्मृती पुरस्कार**

''उत्कृष्ट दर्जाचे साहित्य केवळ अनुभवातून येते,'' असे मत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी व्यक्त केले. हे वाङ्मय तुमचे आमचे जीवन उजळून टाकणारे असावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

मृत्युंजय प्रतिष्ठानतर्फे पुरंदरे यांच्या हस्ते प्रसिद्ध साहित्यिक उत्तम बंडू तुपे आणि कोयना परिसरातील विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी श्रमजीवी जनता सहायक मंडळाच्या माध्यमातून कार्यरत असलेले बाळासाहेब कोळेकर यांना यंदाचा 'मृत्यंजय'कार शिवाजी सावंत स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्याचे माजी पोलिस महासंचालक अरविंद इनामदार, प्रतिष्ठानच्या उपाध्यक्षा मृणालिनी सावंत आणि कार्यकारी विश्वस्त सागर देशपांडे यावेळी उपस्थित होते. पुरंदरे म्हणाले, ''साहित्य आणि समाज यांचा विचार मनात, हृदयात झाला पाहिजे. समाजाला नवी स्वप्ने देणे हे साहित्याचे काम आहे. समर्थ रामदासांनी 'देव मस्तकी धरावा अवघा हल्लकल्लोळ करावा' आणि संत तुकाराम महाराजांनी 'विंचू देव्हाऱ्यासी आला' असे सांगितले आहे. असे सांगणारे साहित्यिक हे एका अर्थाने उपनिषदकार आहेत.''


इनामदार म्हणाले, ''साहित्याचा मनावर परिणाम होत असतो. स्वत:ची भूमिका कायम ठेवून दुसऱ्याच्या भूमिकेत जायचे आणि तरीही स्वत: तटस्थ राहायचे, ही सविकल्प समाधी साहित्यातून बघायला मिळते.''

तुपे म्हणाले, ''मोकळाढाकळा माणूस आणि माणुसकी असलेल्या साहित्यिकाच्या नावाने मिळालेला पुरस्कार स्वीकारताना धन्यता वाटते.''

कोळेकर म्हणाले, ''विस्थापितांच्या कुटुंबात जन्म झाल्यामुळे या प्रश्नांना जीवनाच्या सुरवातीपासून सामोरा गेलो आणि ते सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.''

देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. अमिताभ सावंत यांनी सूत्रसंचालन केले.

❐




**कांचनकण**

शिवाजी सावंत

विविध विषयांवरचं लालित्यपूर्ण मुक्त चिंतन

**८०रु. पोस्टेज २०रु.**

# वाचकांचा प्रतिसाद



माधुरी शानभाग यांना

सप्रेम नमस्कार,

आपण अनुवादित केलेली खूप पुस्तकं मी वाचली आहेत. तुम्ही अनुवादित केलेल्या पुस्तकांचा दर्जा उत्तम असतो. एवढ्यातच मी तुमचे 'द जॉय ऑफ कॅन्सर' वाचले आणि थक्क झाले. (मूळ इंग्रजी लेखक श्री अनुपकुमार)

पुस्तकाने अगदी पहिल्या पानापासून पकड घेतली. लेखकाने मांडलेला सातसूत्री कार्यक्रम अफलातून आहे. किंबहुना मी तर म्हणेन कुणालाही कोणताही रोग झाला तरी त्याचे आत्मिक चिंतन कसे असावे, ह्याची ही मार्गदर्शिकाच!

ह्या पुस्तकातील 'कर्करोगाशी पुर्नभेंट' हे प्रकरण वाचले, पुस्तक वाचत असताना होत असलेला आनंद एकदम निराशेमध्ये परावर्तित झाला आणि शेवटी एक प्रश्न मनात आला की खरंच कॅन्सरला सरेंडर होणे ह्याशिवाय दुसरा पर्याय नाही का?

सौ. जयश्री भिडे, नागपूर.
मोबा. ९५०३०१२५६७

---


सप्रेम नमस्कार,

सौ. मीरा सिरसमकर यांनी नोबेल ललना हे पुस्तक अत्यंत नीटनेटके लिहिले असून आकर्षक आहे.

सौ. विनया वाळिंबे, पुणे ४११ ०३८.
फोन. २५४४०१४७

---





रजनी भागवत यांना

सस्नेह नमस्कार,

नुकतेच 'मी अनीता राकेश सांगतेय' हे अनुवादित पुस्तक वाचले. अनुवाद प्रभावी, प्रवाही झाला आहे. मूळ आत्मकथनाने जशी पकड घेतली तशीच पकड अनुवादानेही घेतली. या आत्मकथनाद्वारा अनीता राकेश यांचा समजूतदारपणा, सहनशीलपणा, संवेदनशीलपणा, सच्चेपणा मनाला चांगलाच भिडतो.

डॉ. इंद्रनाथ मदान, कमलेश्वर यांचे अभिप्राय थोडक्यात बरंच काही सांगून जाणारे आहेत. या अनुवादाने मराठी साहित्यविश्वात मोलाची भर पडेल ही आपली अटकळ बरोबर आहे.

सतत दु:खाशी सामना करणाऱ्या अनीताजींना अनुवांशिकरीत्या आईकडून साहित्यिक गुण मिळाले ही सुखाची गोष्ट आहे. लेखनाच्या वारशामुळे त्यांचं वेदनामय जीवन आपल्यासमोर प्रकट झालं.

पुस्तकाचं मुखपृष्ठ आकर्षक व मार्मिक आहे. मेहता प्रकाशन म्हणजे दर्जेदार पुस्तकं हे समीकरण आता घट्ट होत चाललं आहे.

आपल्या आगामी लेखन प्रवासास शुभेच्छा.

अरुण भट,
बदलापूर (पू),जि. ठाणे.

स.न.वि.वि

आपण प्रसिद्ध केलेले 'जिना' हे पुस्तक वाचले. श्री जसवंतसिंग यांनी मोठ्या परिश्रमाने हे एक इतिहासाचे पुस्तक लिहिले आहे. आत्तापर्यंत उघड न झालेली माहिती त्यांनी प्रकाशात आणली आहे. मी आजवर म.गांधी यांच्यावरची अनेक पुस्तके वाचली आहेत. पण जिना पुस्तकातील गांधींबद्दलची माहिती अत्यंत उद्‌बोधक आहे. श्री. अशोक पाध्ये यांनी सरस अनुवाद केला आहे.

पुनश्च एकदा आपले आभार.

अशोक घैसास, नाशिक १०.




**मी अनीता राकेश सांगतेय...**

**अनीता राकेश** अनु. रजनी भागवत

अपार कष्ट, वेदना आणि नशिबाची क्रूर थट्टा सहन करूनही जीवनाबद्दल कृतज्ञता आणि दैवाबद्दल क्षमाशीलता बाळगणाऱ्या अनीता राकेश यांचे अंत:करणाला भिडणारे आत्मकथन

**१६०रु. पोस्टेज २५रु.**

# श्रद्धांजली

### * बुद्धिबळ समीक्षक ना. रा. वडनप

ज्येष्ठ बुद्धिबळ समीक्षक आणि लेखक ना. रा. वडनप (वय ८८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.

वडनप यांनी बुद्धिबळावर सातत्याने लेखन केले असून, त्यांच्या 'बुद्धिबळ' या पहिल्या पुस्तकाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. 'रविवार सकाळ' आणि 'साप्ताहिक सकाळ'मध्ये बारा वर्षे लेखन केले होते. ते पुणे वेधशाळेतून असिस्टंट मेट्रॉलॉजिस्ट म्हणून निवृत्त झाले होते.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

### * ज्ञानपीठ पुरस्कार विजेते रवींद्र केळेकर

कोकणी साहित्यातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व, विचारवंत, गांधीवादी व २००६ सालचे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ साहित्यिक रवींद्र केळेकर ऊर्फ रवींद्रबाब यांचे २७ ऑगस्ट रोजी मडगाव येथे निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते.

दक्षिण गोव्यातील कुंकळी येथे २५ मार्च १९२५ रोजी जन्मलेले रवींद्र केळेकर गाधी विचारांनी प्रभावित झाले व त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली. गोवा स्वातंत्र्य संग्रामातही त्यांचा मोठा सहभाग होता. कोंकणीबरोबरच मराठी व हिंदी भाषेतूनही त्यांनी विपुल लेखन केले आहे. कोंकणी राज्यभाषा करण्यासाठी गोव्यात उभारलेल्या लढ्यात ते अग्रेसर होते. महाभारताचा त्यांनी कोंकणीतून अनुवाद केला असून, त्यांच्या नावावर सुमारे ३२ पुस्तके आहेत. गोव्यात ३१ जुलै रोजी झालेल्या एका कार्यक्रमात त्यांना लोकसभा अध्यक्ष मीरा कुमार यांच्या हस्ते ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. साठ वर्षे सांस्कृतिक व साहित्य क्षेत्रात कार्य केलेले रवींद्रबाब हे आधुनिक कोकणीचे जनक होते. गोव्याची ओळख, कोकणी भाषा व रवींद्रबाब हे एक समीकरण झाले होते. गोव्याच्या महाराष्ट्रातील विलीनीकरणाला त्यांनी विरोध केला होता व त्या लढ्याचे नेतृत्वही त्यांनी केले होते. त्यांनी सुरू केलेले 'जाग' हे मासिक कोंकणातील सर्वांत जुने व पूर्णपणे साहित्याला वाहिलेले मासिक आहे.

कोंकणी भाषेने नवीन विषय हाताळण्याची गरज आहे, असे चार दशकांपूर्वी सांगणाऱ्या रवींद्रबाबनी स्वत: दुर्बिणीतून अवकाशाचे निरीक्षण करून 'ब्रम्हांडातले

तांडव' या उत्कृष्ट साहित्याची निर्मिती केली आहे. त्यांच्याच पुढाकाराने व मार्गदर्शनामुळे कोंकणी शब्दकोशाची निर्मिती झाली. त्यांच्या या कार्यामुळे अनेक पुरस्कार त्यांच्याकडे चालत आले. साहित्य अकादमी पुरस्कार विजेती 'हिमालयात' ही त्यांची साहित्यकृती उत्कृष्ट मानली जाते.

## * ज्येष्ठ कवयित्री डॉ. इर्लेकर

ज्येष्ठ कवयित्री, समीक्षक आणि संत साहित्याच्या अभ्यासक डॉ. सुहासिनी यशवंत इर्लेकर (वय ७८) यांचे निधन झाले.

सुहासिनी इर्लेकर या माहेरच्या लीला मंगळवेढेकर. त्यांचा जन्म २७ फेब्रुवारी १९३२ रोजी सोलापूर येथे झाला. सोलापूरच्या सेवासदन हायस्कूल येथे शालेय शिक्षण झाल्यावर त्यांनी कोल्हापूर येथील राजाराम महाविद्यालयातून मराठी विषय घेऊन बी.ए. केले. सेवादलाचेच कार्यकर्ते असलेले यशवंत इर्लेकर यांच्याशी त्यांचा प्रेमविवाह झाला. 'प्राचीन संत कवयित्रींचे वाङ्मयीन कार्य' हा विषय घेऊन त्यांनी डॉ. वा. ल. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. संपादन केली.

उस्मानाबाद येथील शासकीय कन्याशाळेत इर्लेकर यांनी मराठीचे अध्यापन केले. बीड येथील बलभीम महाविद्यालयात दोन तपे मराठीचे अध्यापन केले. उस्मानाबाद जिल्हा साहित्य संमेलन, मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. संजीवनी मराठे साहित्यसखी पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचा कविवर्य भा. रा. तांबे विशेष ग्रंथकार पुरस्कार, साहित्यप्रेमी भगिनी मंडळाचा मालतीबाई दांडेकर जीवनगौरव पुरस्कार त्यांना लाभले.

**इर्लेकर यांची साहित्यसंपदा :**

कवितासंग्रह - तृप्ती, चित्रांगण, अक्षर, गाथा, छांदस, आल्या जुळून तारा, मी माझी आई, आकाशाच्या अभिप्रायार्थ, बुद्धचरित गाऊ या, ह्या मौनजांभळ्या क्षणी.

बालकुमार साहित्य - मी भारतीय आहे, आजी आणि शेर्न वॉर्न, पाऊस गाणे, डॉक्टर डॉक्टर!

ललित गद्यलेखन - गाणारे देवघर, ज्ञानियांचा राजा, संत नामदेवांचे आत्मचरित्र, नाना फडणीसांचे आत्मचरित्र, साहित्यसंवाद, नरेंद्राचे रुक्मिणीस्वयंवर, गुरू-शिष्य संवाद आणि समाधी संकल्पना

समीक्षा - यादवकालीन मराठी काव्यसमीक्षा, महदंबेचे धवळे, प्राचीन मराठी कवयित्रींचे वाङ्मयीन कार्य, संत कवी आणि कवयित्री, जनाबाईचे निवडक अभंग, नाथांचे रुक्मिणीस्वयंवर, ज्ञानेश्वरीचे अंतरंग, तुकारामाची प्रभावळ, नामवदेकृत ज्ञानेश्वरचरित्र, समर्थ रामदासांची करुणाष्टके, संत जनाबाई अभंग सागरातील दीपस्तंभ.

## * नूतनगंधर्व अप्पासाहेब देशपांडे

शास्त्रीय संगीत, गंधर्व संगीतात स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करणारे भजनशिरोमणी नूतनगंधर्व विनायकराव ऊर्फ अप्पासाहेब देशपांडे यांचे ३ सप्टेंबर रोजी निधन झाले. ते ८६ वर्षांचे होते.

नूतनगंधर्वांचा जन्म संकेश्वर (बेळगाव) येथे २८ जानेवारी १९२५ रोजी झाला. लहान वयातच ग्रामोफोन ऐकून विविध गायकांची गीते हुबेहूब गाणे ही त्यांची आवड. अत्यंत खडतर परिस्थितीतून जयपूर, आग्रा, किराणा घराण्याचे शिक्षण त्यांनी घेतले. संकेश्वरला (कै.) शंकरराव पेंटर यांच्याकडे त्यांना प्राथमिक स्वरांचे मार्गदर्शन झाले. त्यानंतर पंडित उमामहेश्वर कुंदगोळकर, नागेंद्रबुवा पोतदार, पंडित निवृत्तिबुवा सरनाईक, गानदेवता आझमबाई संकेश्वरकर, पंडित कागलकरबुवा, पंडित जगन्नाथबुवा पुरोहित यांचे त्यांना मार्गदर्शन मिळाले. गानसम्राट अल्लादिया खॉसाहेब यांचे सुपुत्र भूर्जीखॉसाहेब यांच्याकडे गंडा बंधन करून त्यांनी शागिर्दी पत्करली. बालगंधर्व यांचा आदर्श समोर ठेवून त्यांचा नाट्यसंगीताचा अभ्यास सुरू झाला. संतसेवा आणि संतांच्या सहवासात रमताना त्यांना स्वामी महाराज श्रीधरस्वामी, हत्तरगीचे संत हरिकाका यांचेही मार्गदर्शन मिळाले. देशभरातील बहुतांश सर्व संगीत संमेलने त्यांनी गाजविली. १९३६ला हुबळीत झालेल्या बेळगाव काँग्रेस ग्रामोद्योग प्रदर्शनात महात्मा गांधी यांनी त्यांचे गायन ऐकले आणि गांधीजींनी स्वत: कातलेल्या सुताचा हार व हरिजन साप्ताहिकाचा अंक देऊन त्यांचा गौरव केला. १९३७ मध्ये केसरी कार्यालयात न. चिं. केळकर यांनी सुवर्णपदक देऊन त्यांचा सन्मान केला.

## * ख्यातनाम लेखिका वसुंधरा पटवर्धन

जुन्या पिढीतील ज्येष्ठ लेखिका वसुंधरा कृष्णाजी पटवर्धन यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ९४ वर्षांच्या होत्या.

पटवर्धन यांनी कथा, कादंबरी, नाटक, ललित अशा सर्व प्रकारचे लेखन केले आहे. त्यांचा जन्म १८ एप्रिल १९१७ सालचा. त्यावेळच्या व्हरनॅक्युलर फायनलपर्यंत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. त्या साहित्य विशारदही झाल्या होत्या. 'संसार शोभा' हा त्यांचा पहिला कथासंग्रह १९५१ मध्ये प्रकाशित झाला. त्यानंतर त्या अखंड लिहितच राहिल्या. स्त्रियांच्या प्रश्नांचे, त्यांच्या सभोवतालच्या स्थितीचे आणि त्यांच्या विचार करण्याच्या पद्धतींचे त्यांनी सखोल चित्रण केले. स्वातंत्र्यानंतरच्या काळात विविध बदलांना सामोरी जाणारी स्त्री त्यांनी सक्षमपणे रेखाटली.

त्यांनी ४० हून अधिक कथासंग्रह लिहिले. 'पैठणी', 'पिपाणी', 'चेहरा' आणि 'शोध' हे त्यांचे कथासंग्रह विशेष लोकप्रिय ठरले. 'अंतरपाट', 'संघर्ष', 'उपासना', 'ओळख' आदी त्यांचे कथासंग्रहही उल्लेखनीय होते. त्यांच्या 'हिरकणी' या नाटकाला

राज्य पुरस्कार मिळाला. ‘मी भटकते आहे’ हा त्यांचा लघुसंग्रह आणि ‘हाय!’ हे अमेरिकेचे प्रवासवर्णन गाजले.

पटवर्धन यांच्या लेखनात सहजता होती त्यामुळेच ते अनेकांना आपलेसे जवळचे वाटले. बालविवाह, परित्यक्तांच्या समस्या आपल्या लेखनातून मांडल्या. पु. भा. भावे साहित्य स्मृती समिती, महाराष्ट्र साहित्य परिषद आणि राज्य सरकारने त्यांचे लेखन गौरवले आहे.

*** क्रीडामहर्षी भाऊसाहेब झंवर**

नामवंत शारीरिक शिक्षण तज्ज्ञ, क्रीडा महर्षी बाबुलाल प्रेमराज तथा भाऊसाहेब झंवर यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९४ वर्षांचे होते. प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. मधुसूदन झंवर यांचे ते वडील होत.

भाऊसाहेबांनी ७५ वर्षे क्रीडापटूंना मार्गदर्शन केले. शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात कुस्ती, वेटलिफ्टिंग, शरीरसौष्ठव अशा खेळांच्या स्पर्धा त्यांनी गाजविल्या. ‘क्रीडा प्रशिक्षक’ या नात्याने त्यांनी अजोड कामगिरी केली. जलतरण, वेटलिफ्टिंग, ॲथलेटिक्स या खेळांमध्ये त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले अनेक खेळाडू राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकले. स. प. महाविद्यालयाचे १३ वर्षे ‘क्रीडा संचालक’ म्हणून काम पाहिलेल्या भाऊसाहेबांनी अखेरच्या श्वासापर्यंत क्रीडापटूंना मार्गदर्शन करण्याचा वसा सोडला नाही. ९३व्या वर्षांपर्यंत ते बिबवेवाडीतील स्नेहविकास व्यायामशाळेत तरुण खेळाडूंना मार्गदर्शन करीत. खेळाबद्दलची तळमळ, अचाट निरीक्षणशक्ती यामुळे भाऊसाहेब खेळाडूंमध्ये कमालीचे लोकप्रिय होते. खेळाला निसर्गोपचाराची जोड दिल्यामुळे त्यांचे मार्गदर्शन अधिकच प्रभावी झाले.

जुन्या पिढीतील सुरेश गुजराथी, राम भागवत, बापू गावडे, बंडू देखणे, जनार्दन ओक, माधव गुजर, चंद्रकांत गुजराथी, मुरलीकांत परेशा असे ॲथलेटिक्स, जलतरण, वेटलिफ्टिंगमधील अनेक नामवंत खेळाडू भाऊसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली तयार झाले. बापू नाडकर्णी, बाळ दाणी, नाना जोशी या प्रख्यात क्रिकेटपटूंनाही भाऊसाहेबांनी शारीरिक तंदुरुस्तीसाठी मार्गदर्शन केले होते. स्टेट बँकेने काही वर्षांपूर्वी जलद गोलंदाज तयार करण्याची योजना आखली होती. त्या योजनेत सहभागी झालेल्या खेळाडूंच्या शारीरिक तंदुरुस्तीची जबाबदारी क्रिकेट महर्षी प्रा. दि. ब. देवधर यांनी भाऊसाहेबांवर सोपविली होती.

महाराष्ट्रीय मंडळाने त्यांना ‘क्रीडा महर्षी शिवराम दामले’ पुरस्कार देऊन गौरविले होते. या पुरस्कारापोटी मिळालेल्या २१ हजाराच्या रकमेत त्यांनी आपल्या निवृत्ती वेतनातील ३० हजार रुपयांची भर घालून उत्कृष्ट धावपटूंसाठी पुरस्कार ठेवला होता.

*** ज्येष्ठ सिनेमॅटोग्राफर देबू देवधर**

हिंदी व मराठी चित्रपटसृष्टीतील छायाचित्रकार देबू देवधर यांचे १ सप्टेंबर रोजी ओशिवरा येथील निवासस्थानी निधन झाले. ते ६२ वर्षांचे होते. गेले सहा महिने ते फुप्फुसाच्या कर्करोगाने आजारी होते. त्यांच्या पश्चात पत्नी श्रावणी देवधर, मुलगी सई, जावई शक्ती आनंद असा परिवार आहे.

देबू देवधर यांचे मूळ नाव शंकर डी. देवधर. परंतु चित्रपटसृष्टीत ते देबू देवधर याच नावाचे ओळखले जात. चित्रपटसृष्टीतील त्यांच्या कारकीर्दीची सुरुवात १९७२ साली 'ललकार' या चित्रपटाने झाली. या चित्रपटासाठी त्यांनी सहाय्यक कॅमेरामनची भूमिका पार पाडली होती. त्यानंतर १९८१ साली प्रदर्शित झालेल्या 'आक्रित' या चित्रपटासाठी त्यांनी स्वतंत्रपणे सिनेमॅटोग्राफी केली होती. अमोल पालेकर यांनी दिग्दर्शित केलेल्या बहुतेक चित्रपटांना देबू देवधर यांचीच सिनेमॅटोग्राफी असे.

*** ज्येष्ठ पत्रकार दि. बा. खाडे**

ज्येष्ठ पत्रकार, मुंबई दूरदर्शनचे पहिले वृत्तसंपादक आणि मुंबई आकाशवाणीचे माजी वृत्तसंपादक दि. बा. खाडे यांचे मधुमेहाच्या विकाराने निधन झाले. ते ८२ वर्षांच होते. अर्धशतकाहून अधिक काळ पत्रकारिता केलेल्या दि. बा. खाडे यांची कारकीर्द मुख्यत्वे दूरदर्शन आणि आकाशवाणी येथे घडली. आकाशवाणीमध्ये प्रसिद्धी सहाय्यक म्हणून पत्रकारितेला सुरुवात केलेले खाडे हे मुंबई दूरदर्शनचे पहिले वृत्तसंपादक होते. त्यानंतर पुन्हा आकाशवाणीवर १९७९ पर्यंत खाडे यांनी खास प्रतिनिधी म्हणून काम पाहिले. बंगळुरू येथील 'डेक्कन हेराल्ड' या इंग्रजी दैनिकाचे मुंबईतील वार्ताहर आणि 'पुढारी'चे वार्ताहर म्हणून त्यांनी काम केले होते.

कोयना येथील भूकंप त्याचप्रमाणे जयप्रकाश नारायण यांच्या मृत्यूसंदर्भातील अफवा याबाबतच्या सजग पत्रकारितेमुळे ते विशेष नावाजले गेले होते. मुंबई मराठी पत्रकार संघाने १९९६ मध्ये गो. भा. गुजर स्मृती पुरस्काराने त्यांना सन्मानित केले होते.

*** ज्येष्ठ विधिज्ञ, सामाजिक कार्यकर्ते ग. नी. जोगळेकर**

ज्येष्ठ विधिज्ञ, करसल्लागार, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष, माजी नगरसेवक आणि पुण्यातील गणेश मंडळांचे आधारस्तंभ ॲड. गणेश नीलकंठ उर्फ ग. नी. जोगळेकर यांचे निधन झाले. ते ऐंशी वर्षांचे होते.

ग. नी. जोगळेकर यांचा जन्म २३ ऑगस्ट १९३० रोजी पुण्यात झाला. त्यांचे शालेय शिक्षण नूतन मराठी विद्यालयात झाले. बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयातून ते वाणिज्य शाखेचे पदवीधर झाले. त्यानंतर आय. एल. एस. विधी महाविद्यालयातून

त्यांनी कायद्याची पदवी संपादन केली. तेथे दोन वर्षे त्यांनी मानद प्राध्यापक म्हणूनही काम केले. पुढे त्यांनी वकिली सुरू केली आणि प्राप्तिकर सल्लागार म्हणूनही ते काम करू लागले. कायद्याचा सखोल अभ्यास आणि या क्षेत्रातील कामगिरीने त्यांचा नावलौकिक वाढला. दादरानगर हवेली मुक्तिसंग्रामात ते सहभागी झाले होते. रा. स्व. संघाचे पुणे शहर कार्यवाह म्हणूनही त्यांनी काम केले होते.

विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थांमध्येही जोगळेकर अनेक वर्षे सक्रिय राहिले. डेक्कन एज्युकेशन सोसायटीतील विविध पदांवर त्यांनी चाळीस वर्षे काम केले. सोसायटीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी १९९० ते ९३ या काळात काम केले होते. 'भारत गायन समाजा'चे ते विश्वस्त होते. जनसंघातर्फे निवडणूक लढवून ते प्रथम १९७४ मध्ये महापालिकेवर निवडून गेले. बेलबाग संस्थानच्या विष्णू मंदिराचे पुजारी ही जबाबदारी त्यांनी १९७७ पासून २४ वर्षे सांभाळली.

*** विश्वास सावरकर**

स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे सुपुत्र विश्वास सावरकर यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली जावई, नातवंडे असा परिवार आहे.

विश्वास सावरकर यांचा जन्म १७ मार्च १९२८ रोजी झाला. त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या आठवणींवर आधारित 'आठवणी अंगाराच्या' हे पुस्तक लिहिले. त्याशिवाय 'परिसस्पर्श स्वातंत्र्यवीरांचा', 'कथा क्रांतिकारकांच्या' या पुस्तकांचेही लिखाण त्यांनी केले. वालचंद हिराचंद समूहात ते प्रदीर्घ काळ नोकरीत होते. हिंदू महासभेचेही ते कार्यकर्ते होते. सावरकर सदन या वास्तूला ऐतिहासिक दर्जा मिळावा म्हणून ते अखेरपर्यंत प्रयत्नशील होते. वयोमानामुळे त्यांना प्रवास करणे शक्य नसतानाही ते हिंदू हितरक्षणासाठी कार्यरत असलेल्या संस्थांना भेटी देत आणि मार्गदर्शन करीत.

❒

# बालनगरी

अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| मैत्री | १०० |
| पावसाचं भूत | १०४ |




# मैत्री

एक बेडकाचं पिल्लू गवतामध्ये उड्या मारत होतं, बागडत होतं. खेळत असताना समोर रस्त्यामध्ये एक विचित्र, अजब,  चमत्कारिक प्राणी त्याला दिसला. तो प्राणी छान लांबसडक, सडसडीत होता. आणि इंद्रधनुष्यासारखी त्याची त्वचा चमकदार होती.

"राम, राम!" बेडकाच्या पिलाने त्याला साद घातली. "इथे माझ्या रस्त्यात तू काय करतोयस?"

"थोडा उबेत बसलोय रे, सूर्याच्या उन्हात." त्या अजब प्राण्याने प्रतिसाद दिला. त्याने स्वतःचे गुंडाळलेले अंग सरळ केले. 'माझं नाव सर्पिलू, तुझं काय रे?"

"अरे मी बेडुकलं. तुला माझ्याशी खेळायला आवडेल? चल आपण खेळूया." बेडकाच्या पिल्लाने मैत्रीचा हात पुढे केला. त्यानंतर दोघंजण गवतात खूप खेळले.

"हे बघ मी कसं करतो ते..." बेडुकल्याने गवतात उंच उडी मारून दाखवली. "तुला शिकवू?"

"हो कित्ती छान!"

मग दोघेजण मजेत उड्या मारत राहिले.

उड्या मारता मारता एकमेकांच्या अंगावर धडका धडकी, आपटा-आपटी करताना वेळ मजेत गेला.

"आता मी बघ काय गंमत करतो..." सर्पिलू म्हणाला. मग त्याने पोटाने घसरून झाडाच्या खोडावरून कसं सरपटायचं ते बेडुकल्याला शिकवलं. संपूर्ण सकाळभर दोघं एकमेकांशी मनसोक्त खेळले, गवतात हुंदडले. भूक लागल्यावर त्यांना आपापल्या घराची आठवण झाली.



दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा नक्की भेटायचं, मज्जा करायची असं ठरवून ते घरी गेले.

घरी गेल्या गेल्या बेडुकलं आनंदानं पोटावर सरपटत आईकडे बघतं ओरडलं, ''आई, बघ मी काय गंमत करतोय!'' त्याच्याकडे बघून आईला धक्काच बसला. 'कुठे शिकलास हे?' ती ओरडलीच.

''अगं सर्पिलूने शिकवलं मला. तो माझा नवीन मित्र आहे आणि मस्त आहे. ''मज्जा आली आज गवतात खेळताना!'' बेडुकल्याने खुशीतचं सांगितले.

''अगं बाई ग, अरे तुला माहिती नाही सोन्या, पण ते सर्प कुटुंब भारी दुष्ट आहे. त्यांच्या दातात विष असतं रे! त्यांच्या बरोबर जाऊ नको खेळायला आणि ते सरपटणं थांबव; आपल्यात असं करत नाहीत.''

इकडे सर्पिलू उड्या मारत मारतच घरी पोहोचलं. पण ते बघून आईला गंमत वाटण्याऐवजी रागच आला. ''कुणी शिकवलं तुला हे असलं?'' तिने विचारले.

''अगं, बेडुकल्यानं - माझ्या नवीन मित्रानं!'' त्याने कौतुकाने सांगितले.

"कसा रे तू? एवढंही माहित नाही तुला की त्यांचं आपलं ठीक नाही म्हणून? आज कित्येक वर्ष झाली त्यांच्याशी आपलं भांडण होऊन. खेळतोस कसला त्याच्याशी? उद्या तो खेळायला आला की पकड आणि गट्टम कर त्याला. उड्या मारणं थांबव आधी, असली घाणेरडी पद्धत नाही आपल्यात!" आईचा राग पाहून सर्पिलू गुपचुप वेटोळ्यात बसला.

दुसऱ्या दिवशी सकाळी सर्पिलू आणि बेडुकलं गवतात एकमेकांना दिसले खरे पण लांब लांबच राहिले एकमेकांपासून.

"मी नाही रे तुझ्याबरोबर सरपटू शकत." बेडुकलं लांबूनच उड्या मारत ओरडलं. सर्पिलूने आपल्या थंड डोळ्यांनी त्याच्याकडे पाहिलं. 'जर तो माझ्या जास्तच जवळ आला तरच आईनं सांगितलंय तसं खाऊन टाकीन त्याला."

काल सकाळी केलेली मजा त्याला आठवत राहिली. बेडुकल्याबरोबर उड्या मारताना कित्ती छान वाटतं होत!

जड अंतःकरणाने सरपटत तो जवळच्या झुडुपात शिरला.

त्या दिवसापासून बेडुकलं आणि सर्पिलू कधीही एकमेकांशी खेळले नाहीत. ते कुरणात खेळायला येतात, गवतात ऊन खात बसतात, एकमेकांबरोबर मजेत घालवलेला वेळ आठवतात. सर्वात महत्त्वाचं म्हणजे एकमेकांशी पुन्हा मैत्री जमावी अशी त्यांची उत्कट इच्छा आहे, पण...

सौ. रोहिणी गोखले
१९६१ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

# The Secret Seven द सीक्रेट सेव्हन

**धडाकेबाज छोट्या सात गुप्तहेरांची**
**१५ पुस्तकांची साहसपूर्ण मालिका...**

- द सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची साहसी मोहीम
- शाब्बास, सीक्रेट सेव्हन
- रहस्याच्या मागावर सीक्रेट सेव्हन
- आगे बढो, सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची यशस्वी कामगिरी
- सीक्रेट सेव्हनची सरशी
- सीक्रेट सेव्हन झिंदाबाद
- सीक्रेट सेव्हन आणि रहस्य
- सीक्रेट सेव्हन समोर कोडं
- सीक्रेट सेव्हनची आतषबाजी
- 'गुणवान' सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनला धक्का
- सावधान! सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची गम्मत जम्मत



**एनिड ब्लायटन | अनु. प्रियंका कुलकर्णी**

**किंमत प्रत्येकी ८०रु. | संपूर्ण सेटची किंमत ९९९रु.**
**एकत्रित पोस्टेज ४० रु.**




खरं सांगतो काल पाहिलं पावसाचं भूत
पांढरं पांढरं धोप आणि मिशीवरती तूप

हळुहळु आलं पसरुन आडवे-तिडवे हात
झाडं-बिडं, डोंगर-दरी घातलन् की घशात

केवढी मोठी भूक त्याची, केवढं मोठ्ठं पोट!
रस्तासुद्धा टाकला गिळून, सांगण्यात नाही खोट.

गाल-बिल फुगवून मग दिली त्याने ढेकर
''घसा सुकला, पाणी-बिणी आणा कुणी लौकर!''

गरगरीत आवाज त्याचा जमीन थरथर कापे
सगळीकडे अंधार गुडुप, सूर्य देखील लपे.

तेवढ्यात आली वीजबाई, ‘रामाची’ ताई
भूतबाबाच्या काळजाचं मग पाणी पाणी होई.

“का रे भाऊ, खादाडखाऊ, हवंय ना तुला पाणी?”
“नको बाई, धरणीताई, ‘त्याचं आलंय कोणी!”

कडाड्कड् वाजली कडक वीजताईंची छडी
घाईघाईत अंग आवरून भुताने मारली दडी.

खरंच सांगतो पाहिलं काल पावसाचं भूत
घाबरुन विरळ विरळ झालं,
त्याच्या मिशीवरलं तूप!

सौ. रोहिणी गोखले



## मेहता पब्लिशिंग हाऊसचे

# बालसाहित्य

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **चित्रमय रंगतदार कथा** | | |
| चतुर बोकोबा आणि इतर कथा | वृषाली पटवर्धन | ३० |
| नशीबवान शेखर आणि इतर कथा | वृषाली पटवर्धन | ३० |
| लोखंड खाणारे उंदीर आणि इतर कथा | वृषाली पटवर्धन | ३० |
| सुंठ बिस्किटाचा माणूस आणि इतर कथा | चारुता पुराणिक | ३० |
| हस्तिदंती छडी आणि गोष्टी देशोदेशीच्या | चारुता पुराणिक | ३० |
| सूर्याची चोरी आणि गोष्टी देशोदेशीच्या | चारुता पुराणिक | ३० |
| लैलाचा दिवा आणि गोष्टी देशोदेशीच्या | चारुता पुराणिक | ३० |
| निद्राराणी आणि इतर कथा | विजया देशपांडे | ३० |
| जादूचं खीरपात्र आणि इतर कथा | अरुंधती पंडित | ३० |
| टिंबक टू आणि इतर कथा | मंजूषा आमडेकर | ३० |
| गम्मत गोष्टी | मंजूषा आमडेकर | ३० |
| धमाल गोष्टी | मंजूषा आमडेकर | ५० |
| मजेदार लोककथा | मंजूषा आमडेकर | ३० |
| आदर्श लोककथा | मंजूषा आमडेकर | ३० |
| राजाचं गुपित आणि इतर कथा | मंजूषा आमडेकर | ३० |
| ढुम् ढुम् ढुमाक ढुम्ऽऽऽ आणि इतर कथा | मंजूषा आमडेकर | ३० |
| सोन्याचा पाऊस आणि मजेदार गोष्टी | मंजूषा आमडेकर | ३० |
| ड्रॅगनचं घर आणि मजेदार गोष्टी | मंजूषा आमडेकर | ३० |
| बुडबुड्यांचे विमान आणि इतर गोष्टी | अर्चना ओक | ३० |
| चालणारा हिमपुतळा आणि इतर गोष्टी | अर्चना ओक | ५० |

| | | |
|---|---|---|
| छोटुसा पांढरा ससुकला आणि इतर गोष्टी | अर्चना ओक | ५० |
| छोटू किल्लीवाला उंदीर आणि इतर गोष्टी | अर्चना ओक | ३० |
| गंपू चिंपू आणि इतर कथा | उमा खरे | ३० |
| मैत्रीचे मोल आणि इतर कथा | उमा खरे | ३० |
| सिंड्रेला आणि इतर कथा | उमा खरे | ३० |
| घारीची चलाखी आणि मस्त मस्त गोष्टी | उमा खरे | ३० |
| गर्विष्ठ घोडा आणि मस्त मस्त गोष्टी | उमा खरे | ३० |
| बदकाचे बूट आणि गम्मत गोष्टी | उज्ज्वला केळकर | ३० |
| गर्विष्ठ सूर्यफूल आणि गम्मत गोष्टी | उज्ज्वला केळकर | ३० |
| बंटू बसला ढगात आणि इतर कथा | राजीव तांबे | ५० |
| बंटूचा टिकटिक मित्र आणि इतर कथा | राजीव तांबे | ५० |
| घड्याळातली कोकिळा आणि गडबड गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| अस्वलाची शेपटी आणि गडबड गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| खट्याळ खलाशी आणि गडबड गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| जादूचं बटण आणि इतर गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| जादूचं रबर आणि इतर गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| जादूचं तळं आणि इतर गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| गोष्टी पानोपानी | ईशान पुणेकर | ३० |
| गोष्टी मनोमनी | ईशान पुणेकर | ३० |
| गोष्टी कानोकानी | ईशान पुणेकर | ३० |
| चालणारे बूट आणि मजेदार गोष्टी | संस्मिता गुप्ते | ५० |
| जादूचा अंगरखा आणि मजेदार गोष्टी | संस्मिता गुप्ते | ५० |
| पतंगाची करामत आणि मजेदार गोष्टी | संस्मिता गुप्ते | ५० |
| पिनू-चिनूची चतुराई आणि मजेदार गोष्टी | संस्मिता गुप्ते | ५० |

**फ्रँकलिन मालिका : पोलेत बूर्ज्वा**

| | | |
|---|---|---|
| फ्रँकलिन आणि दंतपरी | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |

| | | |
|---|---|---|
| फ्रँकलिन थाप मारतो | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन आणि अंधारगुडुप | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिनची दादागिरी | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन हरवतो | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिनचा पसारा | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन आणि फुटबॉल स्पर्धा | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन आणि पाळीव प्राणी | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| चल, आटप लवकर, फ्रँकलिन | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन आणि हरवलेला कॅमेरा | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन शाळेत जातो | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिनचं पांघरूण | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन आणि सण | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिनचा वाईट दिवस | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन सायकल चालवतो | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिनचा नवा मित्र | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन आणि वादळी पाऊस | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन आणि रात्रीची धमाल | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| शाळेच्या नाटकात फ्रँकलिन | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |

## आजीनं सांगितलेल्या चातुर्यकथा

| | | |
|---|---|---|
| हितोपदेश : बोधप्रद कथा | मोहन वेल्हाळ | ३० |
| हितोपदेश : मनोरंजक कथा | मोहन वेल्हाळ | ३० |
| हितोपदेश : प्रेरक कथा | मोहन वेल्हाळ | ३० |
| हितोपदेश : रोचक कथा | मोहन वेल्हाळ | ३० |
| जातक कथा : मनोरंजक | निर्मला सारडा | ३० |
| जातक कथा : प्रेरक | निर्मला सारडा | ३० |
| जातक कथा : रोचक | निर्मला सारडा | ३० |
| जातक कथा : शिक्षाप्रद | निर्मला सारडा | ३० |
| शेखचिल्लीचे किस्से | निर्मला सारडा | २५ |
| मन्नो | मंजूषा आमडेकर | २५ |

| | | |
|---|---|---|
| मोठ्यांच्या छोट्या गोष्टी | माधव मोर्डेकर | ३० |
| रमज्या गमज्या आणि जम्मत गोष्टी | अरुंधती महाम्बरे | ३० |
| ठकुबाई ठेंगे आणि जम्मत गोष्टी | अरुंधती महाम्बरे | ३० |
| बुटुकबैंगण विसरभोळे आणि जम्मत गोष्टी | अरुंधती महाम्बरे | ३० |

**तेनालीराम मालिका**

| | | |
|---|---|---|
| बुद्धिमान तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| जगावेगळा तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| चतुर तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| न्यायप्रिय तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| समयसूचक तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| लाडका तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| प्रसंगावधानी तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| निर्भय तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| राज्याचे भूषण तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| हजरजबाबी तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| हुशार तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| विनोदवीर तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| मजेदार तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| परोपकारी तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |

**बिरबल मालिका**

| | | |
|---|---|---|
| विनोदवीर बिरबल | निर्मला सारडा | ३० |
| लाजवाब बिरबल | निर्मला सारडा | ३० |
| बुद्धिमान बिरबल | निर्मला सारडा | ३० |
| चतुर बिरबल | निर्मला सारडा | ३० |

**छोटुश्या बब्बडच्या गमतीदार गोष्टी**

| | | |
|---|---|---|
| चंपी मालीश आणि था..था..था! | राजीव तांबे | ३० |
| दांडोबा राक्षस आणि गुळगुळीत मावशी | राजीव तांबे | ३० |

| | | |
|---|---|---|
| गुळाची ढेप आणि सरबत | राजीव तांबे | ३० |
| सू सुटका आणि रंगीत डोंगर | राजीव तांबे | ३० |

**ससोबा-हसोबा मालिका**

| | | |
|---|---|---|
| शेपटीवालं झाड आणि इतर कथा | राजीव तांबे | ५० |
| ससुल्या आणि इतर कथा | राजीव तांबे | ५० |
| शूर ससोबा आणि इतर कथा | राजीव तांबे | ५० |
| चला चहा पिऊया आणि इतर कथा | राजीव तांबे | ५० |
| छत्रीची जादू आणि इतर कथा | राजीव तांबे | ३० |
| (महाराष्ट्र राज्य पुरस्कार - कवी दत्त पुरस्कार - २००८-२००९) | | |
| झॅकपॅक शोध आणि इतर कथा | राजीव तांबे | ३० |

**जंगल जंमत मालिका**

| | | |
|---|---|---|
| जांभळे आंबे आणि जंमत गोष्टी | वैशाली कार्लेकर | ३० |
| फट्फजिती आणि जंमत गोष्टी | वैशाली कार्लेकर | ३० |
| गाढवाचं गाणं आणि जंमत गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| सिंहाचं उड्डाण आणि जंमत गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| सोनेरी चोच आणि जंमत गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| पिंटू पेलिकन आणि जंमत गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| तल्लख मोती आणि जंमत गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| लालतोंडी चोर आणि जंमत गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| उंटाची मान आणि जंमत गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| बूम बूम बैल आणि जंमत गोष्टी | अरुंधती महाम्बरे | ५० |
| तीन छोटे मासे आणि जंमत गोष्टी | अरुंधती महाम्बरे | ५० |

**जंगल कथा**

| | | |
|---|---|---|
| इमानी मित्र आणि इतर गोष्टी | शरद दळवी | ३० |
| पंचरंगी खार आणि इतर गोष्टी | शरद दळवी | ३० |

**गुरुशिष्य कथा**

| | | |
|---|---|---|
| कसोटी आणि इतर कथा | शरद दळवी | ३० |
| सत्त्वपरीक्षा आणि इतर कथा | शरद दळवी | ३० |

## बोधकथा

| | | |
|---|---|---|
| महाकवि कालिदास आणि बोधकथा | शरद दळवी | ३० |
| मोह आणि बोधकथा | शरद दळवी | ३० |
| न्याय आणि बोधकथा | शरद दळवी | ३० |

## चातुर्यकथा

| | | |
|---|---|---|
| बुद्धिरामाचा न्याय आणि चातुर्यकथा | शरद दळवी | ३० |
| प्रधानाची निवड आणि चातुर्यकथा | शरद दळवी | ३० |

## विज्ञान नवलाई

| | | |
|---|---|---|
| अंतराळ | डॉ. बाळ फोंडके | ३० |
| आपले पूर्वज | डॉ. बाळ फोंडके | ३० |
| भूगोल | डॉ. बाळ फोंडके | ३० |
| खगोल | डॉ. बाळ फोंडके | ३० |
| पशू-पक्षी | डॉ. बाळ फोंडके | ३० |
| प्राणिजगत | डॉ. बाळ फोंडके | ३० |

## कुमार साहित्य


| | | |
|---|---|---|
| प्रल्हाद | संपादक : अनंत पै | २५ |
| श्रीरामाची कथा | संपादक : अनंत पै | २५ |
| कर्ण | संपादक : अनंत पै | २५ |
| चाणक्य | संपादक : अनंत पै | २५ |
| खरा मित्र आणि इतर गोष्टी | शरद दळवी | ३० |
| एकमेका साह्य करु आणि इतर गोष्टी | शरद दळवी | ३० |
| आजीचं घर आणि इतर गोष्टी | शरद दळवी | ३० |
| पत्राचा प्रवास आणि इतर गोष्टी | शकुन्तला फडणीस | ३० |
| पैज जिंकली छोट्यानं आणि इतर गोष्टी | शकुन्तला फडणीस | ३० |
| आजीचा धडा आणि इतर गोष्टी | शकुन्तला फडणीस | ३० |

## युद्ध चित्रकथा

| | | |
|---|---|---|
| दहशतीचे बेट (इवो जिमाची लढाई) | अनु. प्रसाद बर्वे | ६० |
| साम्राज्याच्या पाडाव (सिडवेची लढाई) | अनु. निर्मला मोने | ६० |

| **सीक्रेट सेव्हन मालिका** मूळ लेखिका : एनिड ब्लायटन | | |
|---|---|---|
| द सीक्रेट सेव्हन | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सीक्रेट सेव्हनची साहसी मोहीम | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८० |
| शाब्बास, सीक्रेट सेव्हन | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८० |
| रहस्याच्या मागावर सीक्रेट सेव्हन | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८० |
| आगे बढो, सीक्रेट सेव्हन | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सीक्रेट सेव्हनची यशस्वी कामगिरी | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सीक्रेट सेव्हनची सरशी | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सीक्रेट सेव्हन झिंदाबाद | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सीक्रेट सेव्हन आणि रहस्य | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सीक्रेट सेव्हन समोर कोडं | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सीक्रेट सेव्हनची आतषबाजी : | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८० |
| 'गुणवान' सीक्रेट सेव्हन | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सीक्रेट सेव्हनला धक्का | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सावधान! सीक्रेट सेव्हन | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सीक्रेट सेव्हनची गम्मत जम्मत | अनु. प्रियंका कुलकर्णी | ८० |
| **संस्कारक्षम कथा / कविता** | | |
| सूर्यास्त | वि. स. खांडेकर | ३० |
| यज्ञकुंड | वि. स. खांडेकर | ३० |
| मध्यरात्र | वि. स. खांडेकर | ५० |
| घरटे | वि. स. खांडेकर | ४० |
| अस्थी | वि. स. खांडेकर | ४० |
| सैनिक हो, तुमच्यासाठी... | आनंद यादव | ३० |
| **हॅरी पॉटर मालिका** मूळ लेखिका : जे. के. रोलिंग | | |
| हॅरी पॉटर आणि परीस | बाळ ऊर्ध्वरेषे | १६५ |
| हॅरी पॉटर आणि रहस्यमय तळघर | मंजूषा आमडेकर | १९५ |
| हॅरी पॉटर आणि अझ्कबानचा कैदी | प्रियंका कुलकर्णी | १९५ |
| हॅरी पॉटर आणि अग्निचषक | मंजूषा आमडेकर | ३२५ |

# चित्र रंगवा



# ओळखा पाहू



जागतिक नेमबाजी स्पर्धेत सुवर्णपदक मिळविलेली नेमबाज

विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

आपली उत्तरे दिनांक ५ नोव्हेंबर २०१० पर्यंत आम्हाला मिळायला हवीत. बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल. निकाल डिसेंबर २०१०च्या अंकात जाहीर होईल.

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**

मेहता पब्लिशिंग हाऊस, माडीवाले कॉलनी, १९४१ सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.

'ऑगस्ट' अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

२६/११ च्या हल्ल्यात कसाबला जिवंत पकडणारे पोलिस निरीक्षक - तुकाराम ओंबाळे

स्पर्धेचे विजेते **- ओंकार लोखंडे - सांगली**

श्रीनिवास कुरणे, संजय कदम - कोल्हापूर, अजित पाटकर, प्राजक्ता गोरे, तुषार क्षिरसागर, वसंत तावडे - मुंबई, रविंद्र सराफ - जळगांव, आशा आठले - इन्दौर, भीमराव गुंडे - सोलापूर, आशिष पचलोड, वैशाली कुऱ्हेकर - अमरावती, संजय इंगळे - नाशिक, उत्तमराव औघडे - सातारा, रा.द. ढुमणे, किरण वाघमारे, अ.र. पाटील - पुणे, शशी त्रिभुवन - अहमदनगर, संदीप जाधव, सचिन शिंदे - रत्नागिरी, अनंत बळेल, चंद्रकांत अंबाडे - भुसावळ, नंदकिशोर शुक्ला - चाळीसगाव, संगिता कोकिळ - अकोला,

**प्रायोजक**

श्री.राजू जगदीशचंद्र मेहता, मे. हिराचंद नानचंद अँड कंपनी,

**साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी**

टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**

**सूचना -** प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

# मेहता मराठी ग्रंथजगत

**एप्रिल २००९ पासून वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत**

**एक वर्षाला २०% तीन वर्षांना २५% पाच वर्षांना ३०%**

**एक वर्षाची**
**वर्गणी १५०रु.**

**तीन वर्षांची**
**वर्गणी ३५०रु.**

**पाच वर्षांची**
**वर्गणी ५००रु.**

**तीन किंवा पाच**
**वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'चतुर बोकोबा' आणि 'नशीबवान शेखर'**
लेखिका : वृषाली पटवर्धन
प्रत्येकी ३० रु. ची
पुस्तके भेट!
पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'शिवणकला-एक छंद'**
(सलवार कमीज । स्कर्ट-ब्लाऊज
इव्हिनिंग गाऊन्स । मिडी)
लेखिका : हेमा कळके
हे ८० रु. चे
पुस्तक भेट!
पोस्टेज २०रु.







**भेट पुस्तके प्रती शिल्लक असेपर्यंतच**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739 Licence to post WITHOUT PREPAYMENT/
Regd.No.:L2/RNP/PNW/M/184/09-2011/ L.NO.LWP-50/Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 Oct. 2010


# वाचा 'मेहता मराठी ग्रंथजगत' दीपावली विशेषांकात!




डॉ. द.भि.कुलकर्णी,
शिरीष पै
डॉ. अशोक कामत
उत्तम कांबळे
डॉ. आनंद पाटील
रत्नाकर मतकरी
रेणू गावस्कर
दिपा महानवर
डॉ. छाया महाजन
रेखा बैजल,
इंदुमती जोंधळे,
माधुरी शानभाग
चंद्रमोहन कुलकर्णी,
नरेन्द्र चपळगावकर,
शांतीलाल भंडारी
अशा अनेक मान्यवरांचे अनुभव

## 'दिवस कॉलेजचे, पंख फुटण्याचे... जडणघडणीचे'


**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे – ३०. फोन – (०२०) २४४७६९२४

प्रति, ______________________

______________________

______________________

______________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.